४१ वा वर्धापन दिन

सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

४१ वा वर्धापन दिन

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | सोमवार, ४ ऑगस्ट २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक २६६ । पाने १२+१२ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com

आशीर्वाद



स्व.महादेव आवताडे

लोकप्रिय आमदार







सोलापूर

तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

४१ व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!



मा.सोमनाथ आवताडे

मा.सभापती, बाजार समिती



मा.विनायक यादव

लोकनियुक्त सरपंच



मा.संजय आवताडे

चेअरमन, आवताडे शुगर

मा.समाधानजी आवताडे साहेब

शुभेच्छुक

- मा.श्री.विनायक माधवराव यादव
  - लोकनियुक्त सरपंच मारापूर ग्रामपंचायत
  - अध्यक्ष, माणगंगा शिक्षण मंडळ संचलित, शरदचंद्र कृषी विद्यालय मारापूर, ता.मंगळवेढा

# युक्रेनचा रशियावर प्रचंड प्रहार

## आठ ठिकाणांवर ७६ ड्रोन्स, ७ क्षेपणास्त्रांचा मारा, तेल डेपो, पायाभूत सुविधा उद्ध्वस्त

◆ **मॉस्को, ३ ऑगस्ट**

युक्रेनच्या हवाई दलाने रविवारी रशियाच्या काळ्या समुद्रातील रिसॉर्ट सोचीजवळ तेल डेपोसह आठ ठिकाणांवर ७६ ड्रोन आणि सात क्षेपणास्त्राने केलेल्या हल्ल्यात तेल डेपोला आग लागली. याशिवाय रशियाच्या इतर भागात झालेल्या हल्ल्यात पायाभूत सुविधा आणि निवासी इमारतींचे प्रचंड नुकसान झाले. युक्रेनच्या कारवाईत २५ नागरिक जखमी झाल्याची पुष्टी रशियाच्या संरक्षण विभागाने केली आहे.



क्रॅस्नोडारचे प्रादेशिक गव्हर्नर वेनियामिव कोंड्राटयेव्हि यांनी समाज माध्यमावर लिहिलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, युक्रेनच्या लष्कराने डागलेले ड्रोन तेल डेपावर आदळल्याने तेथे मोठ्या प्रमाणात आग लागली. या हल्ल्यात तेल डेपो उद्ध्वस्त झाले आणि या भागातील पायाभूत सुविधांचे प्रचंटड नुकसान झाले. या हल्ल्यानंतर रोसावियात्सिया येथील सोची विमानतळावरील विमानांचे उड्डाणे थांबविण्यात आली. रशियाच्या संरक्षण विभागाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, युक्रेनच्या हवाई दलाने रविवारी पहाटे ७६ ड्रोन आणि सात क्षेपणास्त्रांनी उत्तरेच्या व्होरेनेझ आणि क्रॅस्नोडार भागात हल्ला केला. यातील अनेक ड्रोन हवाई संरक्षण प्रणालीने हवेतच नष्ट केले. या हल्ल्यात पायाभूत सुविधा, निवासी इमारती आणि तेल डेपोचे नुकसान झाले असून २५ नागरिक जखमी झाले.

**युक्रेनच्या अणुऊर्जा केंद्रावर हल्ला**

युक्रेनमधील झापोरिझिया भागातील एका अणुऊर्जा केंद्रावर रशियाने हल्ला केला.अणुऊर्जा केंद्राच्या एका भागातून धूर निघत असून स्फोटामुळे झालेल्या नुकसानाची माहिती अद्याप समोर आलेली नाही असे आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थेने एका निवेदनात म्हटले आहे. किरणोत्सर्गी पदार्थ बाहेर पडण्याची भीती व्यक्त करण्यात आली असून आमचे पथक तपासणी करीत असल्याचे संस्थेने म्हटले आहे. जानेवारी २०२३ मध्ये, युद्धाच्या पृष्ठभूमीवर आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थेने युक्रेनच्या सर्व अणुकेंद्रांवर आपले पथक तैनात केले आहे. (वृत्तसंस्था)

### रशियाचे जोरदार प्रत्युत्तर, ३१ जणांचा मृत्यू

युक्रेनच्या हल्ल्यानंतर रशियाच्या लष्कराने कीव शहरालगतच्या अनेक भागावर ड्रोन आणि क्षेपणास्त्राने हल्ले केले. या हल्ल्यात पाच मुलांसह ३१ जणांना मृत्यू आणि १५० पेक्षा अधिक जखमी झाले. युक्रेनच्या लष्कराने आरोप केला की, रशियाने निवासी इमारतींना लक्ष्य केले, यात निष्पाप नागरिकांना जीव गमवावा लागला. रशियाने डागलेले ६० ड्रोन हवेतच नष्ट करण्यात आले. १६ ड्रोन आणि सहा क्षेपणास्त्रे विविध भागात आदळल्याने मोठे नुकसान झाले आहे. अशातच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियाला शस्त्रविरामासाठी ८ ऑगस्टपर्यंतची मुदत दिली आहे. ■

# इस्रायलच्या हल्ल्यात हमासचा उपकमांडर सलाह ठार

## बोगद्यात लपलेल्या हमासच्या २५ दहशतवाद्यांचे आत्मसमर्पण

◆ **तेल अवीव, ३ ऑगस्ट**

हमास दहशतवादी संघटनेतील अल फुरकान बटालियनचा उपकमांडर सलाह उल दीन जारा ठार झाल्याची माहिती इस्रायलच्या लष्कराने दिली. एका बोगद्यात हमासचे दहशतवादी लपल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर कारवाई करण्यात आली. यात २५ पेक्षा अधिक दहशतवाद्यांनी आत्मसमर्पण केले.

इस्रायली लष्कराने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, सैन्याने उत्तर गाझाच्या बेत हनौन भागात एका बोगद्यात लपलेल्या हमासच्या दहशतवाद्यांवर गोळीबार केला. यात कमांडर सलाह अल-दीन जारा याला ठार मारण्यात आले, तर इतर २५ पेक्षा अधिक दहशतवाद्यांनी सैनिकांसमोर आत्मसमर्पण केले. जारा पहिल्या बटालियनच्या लढाऊ समर्थन कंपनीचा कमांडर होता. त्याने गाझा पट्टीमध्ये इस्रायली नागरिकांवर आणि सैन्यावर अनेक हल्ले केले होते. शरणागती पत्करलेल्या दहशतवाद्यांनी बेट हनौन परिसरातील



शाफ्टजवळील शस्त्रास्त्र डेपोची माहिती दिली, त्यानंतर दहशतवाद्यांनी इस्रायली सैन्याला तिथे नेले. इस्रायली सैन्याने घटनास्थळावरून अनेक शस्त्रे जप्त केली, ज्यात जॅकेट, काडतुसे, ग्रेनेड आणि शस्त्रे यांचा समावेश आहे. (वृत्तसंस्था)

# रशियाच्या कुरिल बेटांवर शक्तिशाली भूकंप

## रिश्टर स्केलवर ७.० तीव्रता; त्सुनामीचा इशारा

◆ **मॉस्को, ३ ऑगस्ट**

रशियातील कामचटकामध्ये ८.८ तीव्रतेच्या भूकंपानंतर शनिवारी रात्री कुरिल बेटांवर ७.० तीव्रतेचा शक्तिशाली भूकंप आला. या भूकंपानंतर रशियाच्या पूर्वेकडील कामचटकाच्या तीन भागात त्सुनामीचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. रशियाच्या आपत्कालीन सेवा मंत्रालयाने रविवारी यासंदर्भात इशारा जारी केला.

रशियाच्या आपत्कालीन सेवा मंत्रालयाने टेलिग्राम चॅनलवर प्रसिद्ध केलेल्या संदेशात म्हटले की, ७.० तीव्रतेच्या भूकंपानंतर पॅसिफिक समुद्रात उंच लाटा उसळण्याची शक्यता आहे. त्यामुळे या भागातील लोकांना समुद्रकिनाऱ्यांपासून आणि सखल भागातून सुरक्षित ठिकाणी जाण्याचे आवाहन केले आहे. पॅसिफिक त्सुनामी इशारा प्रणाली आणि यूएस भूगर्भ सर्वेक्षण विभागानेदेखील भूकंपाची पुष्टी केली आहे, परंतु त्यांनी सांगितले की या भूकंपामुळे त्सुनामीचा कोणताही



मोठा धोका नाही. या भूकंपानंतर काही तासांतच कामचटका प्रदेशात क्रॅशेनिनिकोव्ह ज्वालामुखीचा उद्रेक झाला. रशियाच्या सरकारी वृत्तसंस्था आणि शास्त्रज्ञांनी याची पुष्टी केली आहे. शास्त्रज्ञांच्या मते, सुमारे ४५० वर्षांत पहिल्यांदाच हा ज्वालामुखीचा उद्रेक झाला आहे. या भागात ज्वालामुखीचा उद्रेक यापूर्वी १५५० मध्ये झाला होता.

**ज्वालामुखीच्या उद्रेकानंतर आगीचे लोट**

क्रॅशेनिनिकोव्हमध्ये ज्वालामुखीच्या उद्रेकानंतर आगीचे लोट पसरल्याची माहिती रशियाच्या आपत्कालीन मंत्रालयाने दिली. विमानांच्या सुरक्षिततेला लक्षात घेऊन, ऑरेंज कोड अलर्ट जारी करण्यात आला आहे, जो हवाई वाहतुकीसाठी गंभीर धोक्याची स्थिती दर्शवितो. गेल्या काही दिवसांपासून कामचटका प्रदेशात भूगर्भीय हालचाली वाढत आहेत. प्रथम ८.८ तीव्रतेचा भूकंप, नंतर ४५० वर्षांनंतर ज्वालामुखीचा उद्रेक आणि आता त्सुनामीची शक्यता. (वृत्तसंस्था)

### पाकिस्तानमध्ये ४.८ रिश्टर स्केलचा भूकंप

पाकिस्तानमध्ये रविवारी रात्री उशिरा झालेल्या भूकंपामुळे जमीन हादरली. राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राने सांगितले की भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ४.८ इतकी मोजली गेली. भूकंपाचे केंद्र १० किलोमीटर खोलीवर होते. याआधी शनिवारीही खैबर पख्तुनख्वा, पंजाब आणि इस्लामाबादसह पाकिस्तानच्या काही भागात ५.४ रिश्टर स्केलच्या भूकंपाने खळबळ उडाली होती. ■

# लेफ्टनंट कर्नल पुरोहित यांचे पुण्यात जोरदार स्वागत

◆ **पुणे, ३ ऑगस्ट**

मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणातून निर्दोष सुटका झाल्यानंतर लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित यांचे येथील त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी तसेच समर्थकांनी रविवारी परतल्यानंतर जोरदार स्वागत केले.

मालेगावात झालेल्या बॉम्बस्फोट खटल्याचा निकाल सुमारे १७ वर्षांनी लागला. मुंबईतील विशेष न्यायालयाने गुरुवारी पुरोहित, प्रज्ञासिंह ठाकूर आणि इतर पाच जणांची निर्दोष मुक्तता केली. त्यांच्याविरोधात



कोणतेही विश्वसनीय आणि ठोस पुरावे आढळले नाहीत, असे न्यायालयाने हा निर्णय देताना स्पष्ट केले. रविवारी पुरोहित पुण्यात परतले तेव्हा त्यांचे मित्र, कुटुंबातील सदस्य, समर्थक वविध संघटनांचे सदस्य आणि इतर लोक त्यांचे वास्तव्य असलेल्या लॉ कॉलेज रोडवरील शांतीशील हाऊसिंग सोसायटीच्या बाहेर जमले होते. त्यांनी त्यांचे जल्लोषात स्वागत केले आणि या प्रकरणातून निर्दोष मुक्तता झाल्याचा आनंद साजरा केला.

त्यांची खुल्या जीपमधून मिरवणूक काढण्यात आली. त्यांच्यासोबत पत्नी होती तसेच ढोल-ताशांचा निनाद करण्यात आला व त्यांच्यावर पुष्पवृष्टीही करण्यात आली. मिरवणुकीत सहभागी झालेल्यांनी 'जय श्री राम' असा घोषणा दिल्या. दीर्घकालीन न्यायालयीन लढ्यानंतर त्यांच्या झालेल्या सुटकेसाठी लोकांनी आनंद व्यक्त केला. माझे या पद्धतीचे झालेले स्वागत पाहून मला अतिशय आनंद झाला. माझे संपूर्ण कुटुंब माझी प्रतीक्षा करीत होते. मी जिथे वाढलो, तिथे आज माझे संपूर्ण कुटुंब एकत्र आले आहे. हे सर्व लोक मला भेटण्यासाठी येथे आले, अशी प्रतिक्रिया लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित यांनी व्यक्त केली. (वृत्तसंस्था)

# भारतीय शेतकरी चुकून गेला पाकिस्तानात

## न्यायालयाने सुनावली तुरुंगवासाची शिक्षा

◆ **फिरोजपूर, ३ ऑगस्ट**

पंजाबमधील फिरोजपूर जिल्ह्यातील रहिवासी असलेला २३ वर्षीय शेतकरी अमृतपालसिंह हा चुकून पाकिस्तानात गेला, त्याला आता पाकिस्तानमधील न्यायालयाने एका महिन्याची तुरुंगवासाची शिक्षा सुनावली आहे. अमृतपालचे वडील जुगराज सिंह यांनी याबाबत माहिती दिली. अमृतपालच्या वडिलांनी केंद्र आणि पंजाब सरकारला त्यांच्या मुलाला भारतात परत आणण्यासाठी योग्य पावले उचलण्याची विनंती केली आहे.

अमृतपाल सिंह हा फिरोजपूर जिल्ह्यातील खैरेच्या उत्तर गावातील रहिवासी आहे. तो २१ जून रोजी भारत-पाक सीमेजवळील त्याचे शेत पाहण्यासाठी गेला होता, जे सीमा सुरक्षा दलाच्या (बीएसएफ) देखरेखीखाली राणा या सीमा चौकीजवळ काटेरी कुंपणाच्या पलीकडे आहे. संध्याकाळी पाच वाजता सीमा द्वार बंद होणार होते पण अमृतपाल परतला नाही. तो विवाहित असून त्याला एक मुलगी आहे.

अमृतपालकडे सुमारे ८.५ एकर जमीन आहे, जी भारतीय सीमेवर आहे. बीएसएफ जवानांना पाकिस्तानच्या दिशेने जाणाऱ्या काही पाऊलखुणा आढळल्या, ज्यामुळे तो अनवधानाने सीमा ओलांडून गेला असल्याचा संशय आणखी बळावला. (वृत्तसंस्था)



गंगा नदीने रौद्ररूप धारण केले असून पुराचे पाणी प्रयागराज शहरातील अनेक भागांत घुसले आहे. राजापूर परिसरात घरांमध्ये पाणी घुसले असून मुके प्राणी सैरभैर झाली आहेत.

# मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन सेवा लवकरच : अश्विनी वैष्णव

◆ **भावनगर, ३ ऑगस्ट**

भारतातील पहिली बुलेट ट्रेन सेवा लवकरच सुरू होणार आहे. यामुळे मुंबई व अहमदाबाद या दोन शहरांमधील प्रवासासाठी लागणारी वेळ केवळ दोन तास आणि सात मिनिटांवर येणार आहे, अशी माहिती रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी रविवारी दिली. अश्विनी वैष्णव यांनी भावनगर टर्मिनस येथे झालेल्या कार्यक्रमात आभासी स्वरूपात अयोध्या एक्सप्रेस, रिवा-पुणे एक्सप्रेस आणि जबलपूर-रायपूर एक्सप्रेसला हिरवा झेंडा दाखवला. या कार्यक्रमाला मध्यप्रदेश आणि छत्तीसगडचे मुख्यमंत्री अनुक्रमे मोहन यादव व विष्णू देव साय उपस्थित होते. मुंबई ते अहमदाबाद बुलेट ट्रेन लवकरच सुरू होईल आणि या प्रकल्पाचे काम वेगाने सुरू आहे. जेव्हा ही सुरू होईल, त्यावेळी मुंबई येथून अहमदाबादच्या प्रवासाची वेळ केवळ दोन तास सात मिनिटांवर येईल, असे अश्विनी वैष्णव यांनी सांगितले. मुंबई ते अहमदाबाद या मार्गावरील पहिल्या बुलेट ट्रेनची लांबी ५०८ किमी असेल. मुंबई येथून याचा प्रवास बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स येथून सुरू होईल आणि गुजरातमधील वापी, सुरत, आणंद, वडोदरा आणि अहमदाबाद या स्थानकांवर ती थांबेल. ही गाडी ३२० किमी प्रती तास या वेगाने धावेल. अश्विनी वैष्णव यांनी यावेळी गुजरात्या पोरबंदर आणि राजकोट येथे सुरू होणाऱ्या नवीन रेल्वेगाड्यांबद्दल माहिती दिली. (वृत्तसंस्था)

# सावधान! डाएट सोडा वाढवेल मधमेहाचा धोका

## १४ वर्षे घेतला ३६ हजारांपेक्षा अधिक प्रौढांचा मागोवा ● कृत्रिमरीत्या गोड केलेली पेये आरोग्यास धोकादायक

◆ **कॅनबेरा, ३ ऑगस्ट**

दररोज केवळ एक कॅन डाएट सोडा पिल्याने टाइप २ मधुमेह होण्याचा धोका ३८ टक्के वाढू शकतो, असे एका नवीन ऑस्ट्रेलियन अभ्यासात असे आढळून आले आहे. कृत्रिमरित्या गोड केलेल्या शीतपेयांचा धोका नियमित साखरयुक्त पेयांपेक्षाही जास्त आहे. यांचा धोका २३ टक्के जास्त असल्याचे अभ्यासातून असे दिसून आले आहे.

मोनाश विद्यापीठ, आरएमआयटी विद्यापीठ आणि कर्करोग परिषद व्हिक्टोरिया येथील संशोधकांनी जवळजवळ १४ वर्षे ३६,००० हून अधिक ऑस्ट्रेलियन प्रौढांचा मागोवा घेतला. या



अभ्यासाचे नेतृत्व प्राध्यापक बारबोरा डी कोर्टेन, असोसिएट प्रोफेसर ॲलिसन हॉज आणि पीएचडी विद्यार्थी रोबेल हुसेन काबथिमर यांनी केले. डायबिटीज ॲण्ड मेटाबोलिझम या नियतकालिकेमध्ये प्रकाशित झालेल्या निष्कर्षांमुळे साखरेचे गोड आणि डाएट ड्रिंक्सच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामांबद्दल नवीन चिंता निर्माण झाल्या आहेत. या संशोधनातून कृत्रिमरित्या गोड केलेली पेये साखरेचे पेय म्हणून सुरक्षित पर्याय नाहीत, हे सिद्ध झाले आहे. दररोज यापैकी एक किंवा अधिक पेये पिणे, मग ती साखरेसह गोड असोत किंवा कृत्रिम पर्याय असोत, टाइप २ मधुमेह होण्याची शक्यता लक्षणीयरीत्या वाढवते, असे हुसेन काब्थिमर म्हणाले.

मधुमेहाचा धोका असलेल्या लोकांना आरोग्यदायी पर्याय म्हणून कृत्रिम गोड पदार्थांची शिफारस केली जाते, परंतु या संशोधनाच्या निकालांवरून असे दिसून येते की ते स्वतःच्या आरोग्यासाठी अधिक धोके निर्माण करू शकतात, असे ते म्हणाले. शर्करायुक्त पेये आणि मधुमेह यांच्यामुळे लठ्ठपणा येतो, हे स्पष्ट झाले आहे. कृत्रिम गोड पेये आणि टाइप २ मधुमेह यांच्यातील संबंध शरीराच्या वजनानुसार समायोजित केल्यानंतरही मजबूत राहिला. यामुळे चयापचयवर थेट परिणाम होण्याची शक्यता आहे. या निष्कर्षांचे सार्वजनिक आरोग्य धोरणासाठी महत्त्वाचे परिणाम आहेत, असे प्राध्यापक डी कोर्टेन म्हणाले. (वृत्तसंस्था)


### जगभरात ५०० दशलक्षाहून अधिक लोकांना मधुमेह

भविष्यातील धोरणांमध्ये सर्व गैर-पोषक पेयांचे सेवन कमी करण्यासाठी व्यापक दृष्टिकोन असावा. अभ्यासात ४० ते ६९ वर्षे वयोगटातील सहभागींचा समावेश असलेल्या दीर्घकाळ चालणाऱ्या मेलबर्न कोलॅबोरेटिव्ह कोहॉर्ट स्टडी, याला हेल्थ २०२० म्हणूनही ओळखले जाते. यामधील डेटाचे विश्लेषण केले गेले. आहार, व्यायाम, शिक्षण आणि आरोग्य इतिहासासाठी समायोजित केले गेले. टाइप २ मधुमेह सुमारे १.३ दशलक्ष ऑस्ट्रेलियन आणि जगभरात ५०० दशलक्षाहून अधिक लोकांना प्रभावित करतो. यापैकी बहुतेक प्रकरणे आहार आणि जीवनशैलीशी संबंधित आहेत. ■

# चित्रपट वार्ता

## कार्तिक आर्यन वादाच्या भोवऱ्यात

**मुंबई** : कार्तिक आर्यन १५ ऑगस्ट रोजी ह्युस्टनमध्ये होणाऱ्या स्वातंत्र्यदिनाच्या समारंभात सहभागी होणार आहे, जो एका पाकिस्तानी कंपनीने आयोजित केला आहे. या घोषणेपासून फिल्म फेडरेशनने यावर आक्षेप घेतला होता. आता ऑल इंडिया सिने वर्कर्स असोसिएशनने देखील याचा तीव्र निषेध केला आहे. तर कार्तिकने आधीच एक निवेदन जारी करून या प्रकरणाचे स्पष्टीकरण दिले आहे. आयोजकांची पृष्ठभूमी आम्हाला माहिती नव्हती, असे त्याच्या टीममध्ये म्हटले आहे. यावर असोसिएशनने म्हटले आहे की, तुमच्या टीमने एक निवेदन जारी केले आहे की तुम्हाला आगा रेस्टॉरंटच्या पाकिस्तानी पार्श्वभूमीची माहिती नव्हती, परंतु तुमच्यासारख्या कलाकाराच्या परवानगीशिवाय तुमचा चेहरा असलेले अधिकृत पोस्टर्स प्रसिद्ध केले जातात यावर विश्वास ठेवणे अत्यंत कठीण आहे. तुमच्या देशाचे रक्षण करण्यासाठी बलिदान देणाऱ्यांच्या जीवापेक्षा कोणतेही परकीय चलन मौल्यवान असू शकत नाही. ■




## इम्तियाज अली मैत्रीवर बनवणार चित्रपट



**मुंबई** : चित्रपट निर्माते इम्तियाज अली आणि महावीर जैन यांनी एका नवीन चित्रपटाची घोषणा केली आहे. चित्रपटाचे नाव साइड हिरोज आहे. या चित्रपटात अभिषेक बॅनर्जी, अपारशक्ती खुराणा आणि वरुण शर्मा पहिल्यांदाच एकत्र दिसणार आहेत. चित्रपटाची कथा हलकीफुलकी आणि भावनिक असेल जी तीन बालपणीच्या मित्रांभोवती फिरते. वर्षानुवर्षे, हे तिघेही एका पुनर्मिलनात भेटतात. कथा येथून सुरू होते, जिथे मैत्री, स्वप्ने, प्रेम आणि आठवणींमधून ते जीवनाचा खरा अर्थ पुन्हा शोधतात. ■

## मीना कुमारीला दारूसाठी रागवायचा सावत्र मुलगा

**मुंबई** : हिंदी सिनेसृष्टीतील 'ट्रॅजिडी क्वीन' मीना कुमारी हिचे वैयक्तिक आयुष्यही अतिशय खडतर राहिले. शेवटच्या काळात तर व्यसनामुळे तिची प्रकृती खालावली होती. तिची आठवण सांगताना तिचा सावत्र मुलगा ताजदार अमरोहीने अभिनेत्रीच्या अकाली मृत्यूबाबत तीव्र संवेदना व्यक्त केली. तो म्हणाला, त्या जेव्हा आमच्यासोबत राहायच्या तेव्हा त्यांच्या दारूच्या व्यसनाविषयी आम्हाला कल्पना नव्हती. त्या आम्हाला सोडून गेल्या तेव्हा या गोष्टी समजल्या. त्यावेळी मी त्यांना भेटायला त्यांच्या घरी जात असे. अनेकदा मी त्यांना कडक शब्दात समज दिली होती की, त्यांनी दारूला हात लावू नये. अनेकदा आमची भांडणं व्हायची. मात्र, ती आमच्यातील प्रेमामुळे व्हायची. मी इतरांपासून तिचा बचाव करण्यात अयशस्वी ठरलो. लोकांनी तिला आधार देण्याऐवजी दारूचे व्यसन लावले. काही लोक तिला स्वस्त दारू पाजायचे. छोटी अम्मी खूप निरागस होती, असेही अमरोहीने सांगितले. ■



४१ वा वर्धापन दिन
सोलापूर तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
४१ वा वर्धापन दिन



## विचारपुष्प



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या रूपाने हिंदूंना संघटित करण्याचे डॉ. हेडगेवार यांचे स्वप्न निश्चित आणि ठोस ऐतिहासिक तथ्यांवर आधारित आहे. आपले राष्ट्र अत्यंत प्राचीन आहे. कोणालाही त्याच्या उत्पत्तीचे मूळ माहीत नाही. जगात विविध राष्ट्रे जेव्हा अस्तित्वात आली, त्यापूर्वी आपले राष्ट्र एक महान राष्ट्र होते आणि वैभवाच्या शिखरावर होते. खरं तर, जगातील बहुतेक देशांना आपल्या राष्ट्राच्या महान व्यक्तींकडून ज्ञान प्राप्त झाले आहे.

**यादवराव कृष्ण जोशी**
रा. स्व. संघाचे पूर्व सह सरकार्यवाह

# मोहनजी, योगींना गोवण्यासाठी माझा छळ

## निवृत्त मेजर रमेश उपाध्याय यांचा दावा

◆ **बलिया, ३ ऑगस्ट**
रा. स्व. संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत, इंद्रेश कुमार आणि उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना मालेगाव बॉम्बस्फोटात गोवण्यासाठी तुरुंगात आपला अनन्वित छळ करण्यात आला होता, असा धक्कादायक दावा या प्रकरणात न्यायालयात निर्दोष सोडलेले सेवानिवृत्त मेजर रमेश उपाध्याय यांनी रविवारी केला.



चौकशीदरम्यान पोलिसांनी वारंवार डॉ. मोहनजी भागवत, योगी आदित्यनाथ, श्री श्री रविशंकर आणि इंद्रेश कुमार यांची नावे घेतली होती, असे उपाध्याय यांनी सांगितले. मी निर्दोष असल्याचे मला पहिल्या दिवसापासून माहीत होते. माझी तीन वेळा नार्को आणि पॉलिग्राफ चाचणी घेण्यात आली. मात्र, एटीएसने त्याचा अहवाल कधीच न्यायालयात सादर केला नाही, असे उपाध्याय यांनी वृत्तसंस्थेला सांगितले.

उपाध्याय मूळचे उत्तरप्रदेशातील बलिया जिल्ह्यातील रामनगर गावचे आहेत. मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात ताब्यात घेतल्यानंतर चार दिवसांनी म्हणजे २८ ऑक्टोबर २००८ रोजी त्यांना अटक केल्याचे दाखवण्यात आले होते. कोठडीत घेतल्यापासून अत्यंत गंभीर मानसिक आणि शारीरिक छळ सहन करावा लागला, असे उपाध्याय यांनी सांगितले.

वर्षानुवर्षे मला एकांतवासात ठेवण्यात आले. दया दाखवायची असेल आणि सुटका व्हावी इच्छा असेल, तर त्या मोबदल्यात राजकीय आणि आध्यात्मिक नेत्यांची नावे घ्यावी लागतील, असा दबाव माझ्यावर आणल्याचा आरोप त्यांनी केला. मी मालेगावात कधीच गेलो नव्हतो आणि त्या घटनेसोबत माझा संबंधही नव्हता. या प्रकरणाचा तपास हा राजकीय प्रेरित होता आणि त्यावर तत्कालीन संपुआ सरकारचा प्रभाव होता. सोनिया गांधी, दिग्विजयसिंह आणि सुशीलकुमार शिंदे यांच्या दबावात अधिकारी होते, असा आरोप उपाध्याय यांनी केला.

**माफीचा साक्षीदार होण्याचा प्रस्ताव**

माफीचा साक्षीदार होण्याचा प्रस्ताव माझ्यासमोर ठेवण्यात आला होता. मात्र, मी खोटे बयाण देण्यास नकार दिला. माझ्यावर २५ आरोप ठेवण्यात आले होते. ते खोटे असल्याचे न्यायालयात सिद्ध झाले. अखेर १७ वर्षांनी न्याय मिळाला, असे उपाध्याय यांनी सांगितले. ◀(वृत्तसंस्था)

### एटीएस अधिकाऱ्यांकडून अमानुष छळ : साध्वी प्रज्ञा ठाकूर



मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात अटक झाल्यानंतर माजी आयपीएस अधिकारी परमबीरसिंह आणि इतर एटीएस अधिकाऱ्यांनी अमानवी छळ केला. पंतप्रधान मोदी आणि मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासह काही जणांची नावे गोवण्यासाठी प्रचंड दबाव आणला होता, असा आरोप भाजपाच्या माजी खासदार साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर यांनी केला. परमबीरसिंह अमानुष व्यक्ती आहे. माझ्यावर दबाव आणण्यासाठी त्याने सर्व मर्यादा ओलांडल्या होत्या, असे ठाकूर यांनी सांगितले. ■

## तपासासाठी मतदार कार्ड सोपवा

◆ **पाटणा, ३ ऑगस्ट**
तपासासाठी मतदार ओळखपत्र सोपवण्यात यावे, असा आदेश निवडणूक आयोगाने राजदचे नेते तेजस्वी यादव यांना रविवारी दिला. मतदार ओळखपत्र अधिकृतपणे जारी केले नसतानाही त्याब्यात ठेवल्याचा दावा आयोगाने केला.



ईपीआयसी क्रमांकाने ऑनलाईन सर्च दाखवत तेजस्वी यादव यांनी पुनरीक्षणातून आपले नाव गहाळ केल्याचा आरोप शनिवारी केला. अधिकाऱ्यांनी हा आरोप फेटाळल्यानंतर आपला ईपीआयसी क्रमांक बदलण्यात आल्याचा दावा त्यांनी केला.

२ ऑगस्ट रोजीच्या पत्रकार परिषदेत आपण दाखवलेला ईपीआयसी क्रमांक अधिकृतरीत्या जारी करण्यात आलेला नसल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले.

त्यामुळे तुम्ही सविस्तर चौकशीसाठी मूळ मतदार ओळखपत्र सादर करावे, अशी विनंती केली जात असल्याचे दिघा मतदारसंघासाठी असलेले निवडणूक नोंदणी अधिकारी पाटणा-सदरचे उपविभागीय न्यायदंडाधिकाऱ्यांनी तेजस्वी यादव यांना पाठवलेल्या पत्रात म्हटले. त्यानंतर तेजस्वी यादव यांनी ईपीआयसी क्रमांक बदलण्यात आला, असा दावा केला. मात्र तो जिल्हा दंडाधिकारी त्यागराज एसएम यांनी तो फेटाळला. मतदार यादीतील ईपीआयची क्रमांक २०२० च्या विधानसभा निवडणुकीसाठी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात तेजस्वी यादव यांनी सादर केला आहे. ◀(वृत्तसंस्था)

# वैनगंगा-नळगंगा प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम वर्ष अखेरीस

## मुख्यमंत्र्यांची घोषणा ● मत्स्य विज्ञान महाविद्यालयाचे भूमिपूजन

◆ **अमरावती/ मोर्शी, ३ ऑगस्ट**
नागपूर, अमरावती, वर्धा, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, वाशीम या जिल्ह्यांतील सिंचन, उद्योग आणि पिण्याच्या पाण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरणाऱ्या वैनगंगा-नळगंगा प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम या वर्षाच्या अखेरपर्यंत किंवा पुढच्या वर्षाच्या सुरुवातीला सुरू करण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

मोर्शी येथे रविवारी नवीन शासकीय मत्स्य विज्ञान महाविद्यालयाच्या भूमिपूजन सोहळ्यानंतर आयोजित कार्यक्रमांमध्ये ते बोलत होते. यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मत्स्य विकास मंत्री नितेश राणे, खा. अनिल बोंडे, आ. चैनसुख संचेती, आ. उमेश यावलकर, आ. प्रताप अडसड, आ. राजेश वानखेडे, आ. प्रवीण तायडे, आ. केवळराम काळे, माजी खासदार नवनीत राणा, रामदास तडस, मत्स्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील, भाजपा जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख, डॉ. नितीन धांडे, प्रभुदास भिलावेकर यांच्यासह इतर नेते उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले, नळगंगा-वैनगंगा प्रकल्पाच्या माध्यमातून ५०० किलोमीटरची नदीच आपण तयार करतो आहोत. ३१ धरणे त्यावर राहणार आहेत. दहा लाख एकर जमीन सिंचनाखाली येईल. एक लाख कोटीचा खर्च या प्रकल्पावर होणार आहे. मासेमारीला आपण आता मत्स्य शेतीचा दर्जा दिल्याने सर्व सुविधा मिळणार आहेत. पशुपालन व मत्स्य शेती शेतकऱ्यांसाठी जोडधंदा म्हणून अतिशय उपयुक्त आहे. खा. अनिल बोंडे यांच्या पाठपुराव्यामुळे हे मत्स्य महाविद्यालय उभे होत आहे. मत्स्य शेतीच्या विकासासाठी ते उपयुक्त ठरेल.

मोर्शी येथील रखडलेल्या संत्रा प्रक्रिया प्रकल्पावर येत्या काळात प्राधान्याने लक्ष केंद्रित करून उभारी देण्यात येईल. गारपीटग्रस्तांना नुकसान भरपाई लवकरच देण्याची घोषणा मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केली. ◀(तभा वृत्तसेवा)



मत्स्य विज्ञान महाविद्यालय इमारत कोनशिलेचे अनावरण करताना मुख्यमंत्र्यांसह मान्यवर

### महाराष्ट्रात येणाऱ्या प्रत्येकाचे स्वागत

देशाच्या संविधानाने देशात कुठेही फिरण्याचा अधिकार दिला आहे. त्यामुळे महाराष्ट्रात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे स्वागतच आहे. पण इथे येऊन कोणी मराठीचा अपमान करत असेल तर ते सहन केले जाणार नाही. एखाद्याला भाषा बोलता येत नाही म्हणून त्याला मारण्याचा अधिकारही कोणाला नाही. मंत्री संजय शिरसाट व मेघना बोर्डीकर यांच्या वक्तव्यासंदर्भात त्यांनी मंत्र्यांनी सार्वजनिक ठिकाणी बोलताना जबाबदारीने बोलावे. माधुरी हत्तीण संदर्भात एक उच्चस्तरीय बैठक घेऊन चर्चा करण्यात येणार असल्याचे कार्यक्रमानंतर पत्रकारांशी संवाद साधताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले. ■

## महत्त्वाचे

### ऑक्सिस म्युच्युअल फंडच्या व्यवस्थापकाला अटक

**नवी दिल्ली :** फ्रन्ट रनिंग करून गुंतवणूकदारांची २०० कोटी रुपयांनी फसवणूक केल्याशी संबिधित प्रकरणात बेकायदेशीर सावकारी प्रतिबंधक कायद्याच्या अंतर्गत कारवाई करीत अंमलबजावणी संचालनालय अर्थात् ईडीने ॲक्सिस म्युच्युअल फंडच्या माजी मुख्य व्यवसाय व निधी व्यवस्थापकाला अटक केल्याची महिति अधिकाऱ्यांनी दिली. त्याला ८ ऑगस्टपर्यंत ईडीच्या कोठडीत ठेवण्याचा आदेश विशेष न्यायालयाने शनिवारी दिला. या प्रकरणात ईडीने १ ऑगस्टपासून दिल्ली, मुंबई, गुरुग्राम, लुधियाना, अहमदाबाद, भावनगर, भूज आणि कोलकातात छापेमारी सुरू केली.

### २००० इराणी धर्मगुरूंकडून ट्रम्पच्या हत्येची मागणी

**तेहरान :** इराणमधील २000 हून अधिक धर्मगुरूंनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या हत्येची उघडपणे मागणी केली आहे. या धर्मगुरूंनी ट्रम्प यांचे रक्त हलाल असल्याचे म्हटले आहे, म्हणजेच जर कोणी त्यांना मारले तर तो गुन्हा नाही. जनरल कासिम सुलेमानी यांच्या हत्येचा बदला घेणे हे प्रत्येक मुस्लिमाचे कर्तव्य आहे, असे धर्मगुरूंनी म्हटले आहे. इराणमधील सर्वात मोठे धार्मिक शिक्षण केंद्र असलेल्या कोम सेमिनरीने हे निवेदन जारी केले. त्यात म्हटले आहे की,आता संयमाचा काळ संपला आहे. ट्रम्प यांचे रक्त आणि त्यांची मालमत्ता आता हलाल आहे. सुलेमानीच्या हौतात्म्याचा बदला घेणे प्रत्येक मुस्लिमाचे कर्तव्य आहे. इराणमधील २000 हून अधिक धर्मगुरूंनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या हत्येची उघडपणे मागणी केली आहे. या रक्तरंजित गुन्हेगाराला आता सोडले जाणार नाही. जग गप्प बसणार नाही. बदला नक्कीच घेतला जाईल.

# कारंजा-दारव्हा मार्गावर भीषण अपघात, दोघांचा मृत्यू

## दोन गंभीर जखमी ● भरधाव पिकअपची तीन दुचाकींना धडक

◆ **कारंजा लाड, ३ ऑगस्ट**
येथे कारंजा दारव्हा मार्गावरील पॉवर हाऊस जवळ आज सकाळी १० वाजता भीषण अपघात घडला. एका भरधाव पिकअपने दोन दुचाकींना जबरदस्त धडक दिली. त्यामुळे दोघांचा मृत्यू झाला, तर दोन जण गंभीर जखमी झाले.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, अपघात इतका भीषण होता की, एक दुचाकी रस्त्याच्या कडेला फेकली गेली, तर दुसरी दुचाकी खाली पडली. नाना जयसिंगपुरे आणि सुभाष किसन चव्हाण अशी मृतांची नावे, तर जया नाना जयसिंगपुरे आणि प्रभू माणिक राठोड असे जखमीचे नाव आहे.



घटनेची माहिती मिळताच कारंजा शहर पोलिस घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर रुग्णवाहिका चालक शंकर रामटेके, रमेश देशमुख व शिवम खोंड यांनी जखमींना तातडीने उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. तपासणीनंतर यातील दोघांना डॉक्टरांनी मृत घोषित केले. दोघांवर प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी बाहेर गावी पाठविले.

या अपघातामुळे परिसरात शोककळा पसरली असून नागरिकांमध्ये वाहनचालकांच्या बेफिकिरीविषयी तीव्र संताप व्यक्त होत आहे. कारंजा दारव्हा मार्ग हा नेहमीच वर्दळीचा असून, अनेकवेळा भरधाव वाहनांमुळे अपघात घडत आहेत. ◀(तभा वृत्तसेवा)

# वाहन कालव्यात कोसळून ११ ठार

### उत्तरप्रदेशातील गोंडा येथे भीषण अपघात

◆ **गोंडा, ३ ऑगस्ट**
उत्तरप्रदेशातील गोंडा जिल्ह्यातील एका कालव्यात रविवारी एसयूव्ही कोसळून झालेल्या अपघातात ११ जण ठार, तर चार जण गंभीर जखमी झाले, अशी माहिती पोलिसांनी दिली.

काही भाविक शियागाव येथून खर्गुपूर येथील मंदिरात अभिषेक करण्यासाठी जात असताना बेलवा भाटुआ येथे हा भीषण अपघात झाला, अशी माहिती इटियाडोह पोलिस ठाण्याचे ठाणेदार कृष्ण गोपाल राय यांनी दिली.

या एसयूव्हीत चालकासह १५ लोक प्रवास करीत होते, असे राय यांनी सांगितले. गावकरी आणि बचाव दलाच्या मदतीने बुडालेल्या वाहनातून ११ मृतदेह बाहेर काढण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी झालेल्या जीवितहानीबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले आणि मृतांच्या नातेवाईकांना पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून दोन लाख रुपयांची मदत जाहीर केली. जखमींना ५० हजार रुपयांची मदत दिली जाईल, अशी घोषणा त्यांनी केली.



अपघातानंतर कालव्यात कोसळलेले वाहन

उत्तरप्रदेशातील गोंडा येथील अपघातात झालेल्या जीवितहानीबद्दल मिळालेल्या माहितीने तीव्र दुःख झाले. या अपघातात ज्यांनी आपले प्रियजन गमावले, त्यांच्याबद्दल संवेदना. जखमी लवकर बरे व्हावेत, अशी सदिच्छा व्यक्त करतो, असे मोदी यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी या अपघातावर तीव्र दुःख व्यक्त केले. ◀(वृत्तसंस्था)

### निसरड्या रस्त्यावरून घसरले वाहन

अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांत सहा महिला, दोन पुरुष आणि तीन बालकांचा समावेश आहे, अशी माहिती पोलिस अधीक्षक विनीत जयस्वाल यांनी दिली. अपघातात जखमी झालेल्या चालकासह एकूण चार जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. सकाळी झालेल्या पावसामुळे रस्ता निसरडा झाला होता. कालव्याच्या शेजारी असलेल्या रस्त्यावरून वाहन जात होते. चालकाने ब्रेक दाबताच, वाहन रस्त्यावरून घसरून कालव्यात कोसळले, अशी माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली. ■

# झारखंडमध्ये नक्षल्यांनी रेल्वे रुळावर घडविला स्फोट

### गस्त घालणाऱ्या रेल्वे कर्मचाऱ्याचा मृत्यू



◆ **रांची, ३ ऑगस्ट**
झारखंड-ओडिशा सीमेला लागून असलेल्या पश्चिम सिंहभूम जिल्ह्यातील चक्रधरपूर रेल्वे विभागाच्या बिमलगड येथे रेल्वे रुळावर नक्षलवाद्यांनी स्फोट घडवून आणला, यात गस्तीवर असलेल्या एका रेल्वे ट्रॅकमनचा मृत्यू झाला, तर दुसरा जखमी आहे. रविवारी सकाळी साडेदहा वाजताच्या सुमारास ही घटना समोर आली. यानंतर सुरक्षा दलाने शोधमोहिम सुरू केली. या घटनेमुळे या मार्गावरील रेल्वे वाहतूक काही काळ बाधित झाली, रेल्वे प्रशासनाच्या सतर्कतेने मोठा अपघात टळला.

रेल्वे प्रशासनाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले, झारखंड-ओडिशा सीमेलगत बिमलगड येथे नक्षलवाद्यांनी रेल्वे रुळावर स्फोट घडवून आणला. यात रेल्वे रुळाची पाहणी करण्यासाठी गस्तीवर असलेले दोन ट्रॅकमन गंभीर जखमी झाले. त्यांना चक्रधरपूर येथील रेल्वे रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी ५८ वर्षीय एटवा ओरांव यांना मृत घोषित केले. ◀(वृत्तसंस्था)

# आता घरोघरी पोहचू शकेल आयुर्वेदिक आहार

## एफएसएसएआयने दिली मान्यता ● आयुर्वेदिक खाद्यपदार्थांची यादी जाहीर

◆ **नवी दिल्ली, ३ ऑगस्ट**
आयुर्वेद आता ग्रंथांपर्यंतच मर्यादित राहणार नाही, तर घराघरातील अगदी जेवणाच्या ताटापर्यंत पोहोचणार आहे. आयुर्वेदिक आहाराला एफएसएसएआयने मान्यता दिली आहे. भारतीय खाद्य सुरक्षा आणि मानक प्राधिकरण (एफएसएसएआय) यांच्या वतीने आयुष्य मंत्रालयाच्या सल्ल्यानुसार आयुर्वेद आहार श्रेणी अंतर्गत आयुर्वेदिक खाद्य पदार्थांची यादी जाहीर केली आहे. याद्वारे भारतीय शाश्वत संस्कृती आणि आरोग्य याची योग्य ती सांगड घालण्यास मदत मिळणार आहे.

आयुर्वेद आहार म्हणजे असे खाद्य पदार्थ असतात जे आयुर्वेदाच्या सिद्धांतानुसार तयार केले जातात. यामध्ये अगदी भाज्यांच्या मसाल्यापासून विशेषतः आयुर्वेदिक व्यंजन आणि औषधी गुणांच्या खाद्य पदार्थांचाही समावेश होतो. हे पदार्थ निसर्गासोबत योग्य ती सांगड घालून तयार केलेले असतात, ज्यात पोषण, संतुलन आणि परंपरेचे मिश्रण असते. यातून आरोग्यपूर्ण आहार तयार होऊन स्वस्थ जीवनाची प्राप्ती होऊ शकते. आयुष मंत्रालयाने म्हटले आहे की, नव्या यादीद्वारे प्रमाणित आयुर्वेदिक ग्रंथांमधून व्यंजन आणि प्रक्रिया केलेले खाद्य पदार्थ मिळाले आहेत. २०२२ मध्ये खाद्य सुरक्षा आणि मानक (आयुर्वेद आहार) विनियमांची सुरुवात झाली. त्यानंतर भारताचे पारंपरिक खाद्य ज्ञान घरोघरी पोहोचविण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल मानले जात आहे.



**विश्वसनीय आणि सुरक्षित आयुर्वेद आहार**

आयुर्वेदिक पदार्थांची यादी देशातील खाद्य व्यावसायिकांनाही दिली जाईल. त्यांनी या पदार्थांचा जास्तीत जास्त प्रचार, प्रसार करावा, अशी अपेक्षा राहणार आहे. या माध्यमातून त्यांनाही रोजगार मिळेल. शिवाय विश्वसनीय आणि सुरक्षित आयुर्वेद आहार नागरिकांना प्राप्त होऊ शकेल. या आयुर्वेद आहाराला अ श्रेणीत समाविष्ट करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. भविष्यात तेही होईल. नागरिकांनी आयुर्वेद आहाराला आपल्या जीवनक्रमात सहभागी करून घ्यावे, असे आवाहनही आयुष मंत्रालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे, यापूर्वीच नोव्हेंबर २०२३ मध्ये वर्ल्ड फूड इंडियाच्या उद्‌घाटन समारंभात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही भारतीय खाद्य संस्कृतीचे जतन करण्यावर भर दिला होता. हजारो वर्षांच्या यात्रेमुळे भारतीय खाद्य पद्धती अधिक विकसित आणि समृद्ध झाल्याचे त्यांनी म्हटले होते. ◀(वृत्तसंस्था)

### यादीतील काही पदार्थ

- गुलकंद
- इंदरिका (इडली)
- हंसिनी (मसाला दूध )
- कढी
- खिचडी
- क्षीर (बिना साखरेचे आटवलेले दूध)
- मसाला ताक
- लाप्शी
- मंदा (शिजवलेले तांदळाचे पाणी) ■

# टॅरिफनंतर भारताची अमेरिकेकडून तेल आयात दुप्पट

● **एप्रिल-जूनमध्ये ३२ हजार कोटींचे कच्चे तेल खरेदी केली, तरीही ट्रम्प यांनी दंड ठोठावला**

**नवी दिल्ली, दि.३ ऑगस्ट-**
अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एप्रिलमध्ये टॅरिफ जाहीर केल्यानंतर भारताने अमेरिकेकडून कच्च्या तेलाची खरेदी दुप्पट केली आहे. एप्रिल-जून तिमाहीत, वार्षिक आधारावर त्यात ११४% वाढ झाली आहे.

एप्रिल ते जून २०२४ दरम्यान भारताने अमेरिकेकडून सुमारे १५ हजार कोटी रुपयांचे तेल खरेदी केले. एप्रिल ते जून २०२५ दरम्यान हा आकडा दुप्पट होऊन ३२ हजार कोटी रुपयांवर पोहोचला. वृत्तसंस्था एएनआयने ही माहिती दिली आहे. जानेवारी ते जून २०२५ दरम्यान भारताने अमेरिकेकडून दररोज २.७१ लाख बॅरल कच्चे तेल खरेदी केले. २०२४ मध्ये जानेवारी ते जून दरम्यान हा आकडा दररोज १.८ लाख बॅरल होता. जुलै २०२५ मध्येच जूनच्या तुलनेत अमेरिकेतून २३% जास्त कच्चे तेल आले. भारताच्या एकूण तेल आयातीत अमेरिकेचा वाटाही ३% वरून ८% पर्यंत वाढला. रशियाकडून तेल खरेदी केल्याबद्दल भारतावर दंड ठोठावण्यात आला आहे.

३० जुलै रोजी, ट्रम्प यांनी भारतावर २५% कर लावण्याची घोषणा करताना म्हटले होते की, भारताने नेहमीच त्यांची बहुतेक लष्करी उपकरणे रशियाकडून खरेदी केली आहेत आणि तो रशियाचा सर्वात मोठा तेल खरेदीदार आहे. रशिया-युक्रेन युद्ध थांबावे अशी प्रत्येकाची इच्छा असताना हे सर्व घडत आहे. हे सर्व बरोबर नाही. त्यामुळे भारताला रशियासोबतच्या व्यापारावर २५% कर आणि दंड भरावा लागेल. भारत सध्या रशियाकडून त्याच्या गरजेच्या सुमारे ४०% तेल आयात करतो. अहवालांनुसार, भारत सध्या रशियाकडून दररोज १.१५ दशलक्ष बॅरल कच्चे तेल खरेदी करतो. अमेरिकेच्या दबावामुळे आणि वाढत्या किमतींमुळे भारताने रशियाकडून तेल खरेदी करणे जवळजवळ बंद केले आहे, असा दावा रॉयटर्सच्या वृत्तात करण्यात आला आहे. यानंतर, शुक्रवारी संध्याकाळी भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने पत्रकार परिषद घेतली. मात्र, या दाव्यात किती तथ्य आहे हे स्पष्ट करण्यात आले नाही. रॉयटर्सने ३० जुलै रोजी वृत्त दिले की, इंडियन ऑइल कॉर्पोरेशन, हिंदुस्तान पेट्रोलियम आणि भारत पेट्रोलियम सारख्या भारतीय तेल कंपन्यांनी सवलती कमी होत असल्याने आणि शिपिंग समस्यांमुळे रशियाकडून तेल खरेदी थांबवली आहे. गेल्या एका आठवड्यात रशियाकडून कच्च्या तेलाची मागणी नसल्याचेही त्यात म्हटले आहे. भारतीय रिफायनरीज कमी रशियन कच्चे तेल खरेदी करत आहेत, कारण तिथून मिळणारी सवलत २०२२ नंतरची सर्वात कमी झाली आहे.



**भारत रशियाकडून तेल खरेदी करणे थांबवेल**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी शुक्रवारी सांगितले की, भारत रशियाकडून जास्त काळ तेल खरेदी करणार नाही अशा बातम्या येत आहेत. तथापि, त्यांनी सांगितले की, हे अहवाल खरे आहेत की नाही हे त्यांना माहित नाही. पण जर असे झाले तर ते चांगली गोष्ट असेल.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## अग्रलेख...

# यांना काय कळणार 'सनातन'?

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला राज्यात सर्वाधिक जागा मिळाल्या. अर्थात महाविकास आघाडीमध्ये हा पक्ष लढल्याने मुस्लिम, दलित आणि उबाठाचे एकनिष्ठ मतदार यांच्यामुळे काँग्रेसला बऱ्यापैकी यश मिळाले. ज्याप्रमाणे उबाठाच्या एकनिष्ठ मतदारांचा फायदा काँग्रेसला झाला तसाच फायदा भारतीय जनता पक्षाच्या एकनिष्ठ मतदारांचा फायदा त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीत शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसला झाला. सर्वाधिक नुकसान झाले ते काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे. उबाठाला मिळालेले मानसिक समाधान एवढेच की महाविकास आघाडीत सर्वाधिक २० जागा कशाबशा पदरात पडल्या. महायुतीच्या पदरात राज्यातील मतदारांनी भरभरून मत टाकले. गाड्यासोबत नळ्याचीही जत्रा झाली. महाविकास आघाडीतील मोठ मोठ्या नेत्यांना मतदारांनी घरचा रस्ता दाखविला. आजी-माजी मुख्यमंत्री, सतत सत्तेच्या वर्तुळात राहणारे, वर्षानुवर्षे मंत्रिपदे भोगणारे तर काही नुसते जात आणि धर्माच्या तर काही आई-वडिलांच्या पुण्याईने सत्तेच्या खुर्च्या उबवणारे या सर्वांना जनतेने चांगलाच हिसका दाखविला. २०१४ पासून राज्यातच नव्हे तर देशभरात भारतीय जनता पक्षाला जनतेचे भरभरून प्रेम मिळत आहे. मतदार तोच आहे पण असा काय बदल झाला की काँग्रेससह विरोधकांना पराभवाला सामोरे जावे लागत आहे? कारण एकच आहे आणि ते म्हणजे हिंदू आता जागृत झाला आहे. तो एका झेंड्याखाली एकवटत आहे. एवढी वर्षे जातिपातीत विखुरलेले, प्रादेशिक पक्षांच्या पालख्या वाहणाऱ्या हिंदूच्या डोक्यात प्रकाश पडतो आहे. सोबतच काँग्रेससह अन्य विरोधी पक्षांच्या नेत्यांच्या मनात आणि डोक्यात सनातन हिंदू धर्माबद्दल किती द्वेष कुटून भरलेला आहे, हेही उघड होत आहे. राहुल गांधी, दिग्विजय सिंह, जयराम रमेश, कपिल सिब्बल, मणिशंकर अय्यर, पी. चिदंबरम् आणि त्यांचं कार्ट कार्ती, सुशीलकुमार शिंदे हे काँग्रेसचे नेते सातत्याने हिंदू धर्मावर टीका करीत आले आहेत. त्यात भर पडली आहे ती महाराष्ट्रातील काँग्रेसचे वरिष्ठ नेते, माजी केंद्रीय मंत्री आणि माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या रूपाने. मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणाचा तपास हिंदू धर्माला बदनाम करण्याचा उद्देश डोळ्यासमोर ठेवून तत्कालीन काँग्रेस-राष्ट्रवादीच्या नेतृत्वातील आघाडी सरकारने केला होता. या घटनेच्या आडून तत्कालीन गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी भगवा दहशतवाद या शब्दाचा प्रथमच वापर केला इस्लामिक दहशतवाद्यांच्या कृत्यावर पांघरूण घालण्यासाठी. हिंदूही कसे दहशतवादी आहेत, हे जगाला पटवून देण्यासाठी काँग्रेसने भगवा दहशतवाद या शब्दांचा घाट घातला होता. पण, काँग्रेसच्या या सर्व बाटग्यांचे मनसुबे २०१४ पासून जनतेने उधळायला प्रारंभ केला आहे. राज्यात जे काही काँग्रेसचे मोजके नेते उरले आहेत त्यात पृथ्वीराज चव्हाणांचे नाव घेतले जाते. एक कठोर शिस्तीचा नेता, ज्याने २०१३ मध्ये तत्कालीन राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांच्या विरोधातही कारवाई करण्यास मागेपुढे पाहिले नव्हते, म्हणून ओळख आहे, पण हा नेताही हिंदुविरोधी असल्याचे उघड झाले. हिंदू आणि हिंदुत्व हे वेगवेगळे आहेत, असा शोध प्रथम काँग्रेसचे युवराज राहुल गांधी यांनी लावला होता. शब्दांच्या याच जाळ्यात उच्चशिक्षित असलेले पृथ्वीराज चव्हाण अडकले. मालेगाव बॉम्बस्फोट खटल्याचा निकाल लागून त्यात सर्व आरोपींची न्यायालयाने निर्दोष सुटका केली. यावर एका वृत्तवाहिनीशी बोलताना पृथ्वीराज चव्हाण सर्व आरोपी निर्दोष झाल्याने भ्रमिष्ट झाल्याचे वाटले आणि यापुढे हिंदू दहशतवाद असे न म्हणता हिंदुत्ववादी किंवा सनातन दहशतवादी म्हणावे, असे दोन पर्यायी शब्द दिले. सनातन, हिंदू आणि हिंदुत्व हे वेगवेगळे असल्याचा उच्चकोटीचा (?) शोध लावत या महाशयांनी स्वहस्ते अकलेचे दिवाळे काढले. म्हणजे ज्या धर्मात जन्म झाला त्या धर्माविषयी एवढी आस्था आणि द्वेष मुख्यमंत्री राहिलेली व्यक्ती बाळगत असेल तर तिचे कार्यकर्ते कसे असतील, हे यावरून लक्षात येते.

खरे तर काँग्रेसच्या राजकारणाचा पायाच हिंदुद्वेष आहे. आतापर्यंत जातिपातीचे राजकारण करीत, दिल्लीची चाकरी करीत सत्ता उपभोगलेल्या या हिंदुद्वेष्ट्यांना सनातन अथवा हिंदू या शब्दांचा अर्थ काय कळणार? सनातन म्हणजे शाश्वत, सनातन म्हणजे अनादी. ज्याचा प्रारंभ नाही आणि अंतही नाही, असा जो तो म्हणजे सनातन. हा शब्द केवळ आणि केवळ पंचमहाभूते आणि हिंदू धर्माबाबत वापरला जातो. सनातन हा हिंदू धर्माचा समानार्थी आहे आणि हा विशाल हिंदू केवळ एक धर्म नाही तर जीवन जगण्याची पद्धत आणि तत्त्वज्ञान आहे. हिंदुत्व म्हणजे कर्तव्य, नैतिकता आणि शाश्वत मूल्ये होय. जगातील प्रत्येक धर्माचे कुळ आणि मूळ सापडते पण सनातन धर्म अनादी आहे. हिंदू धर्माचा आणखी एक महत्त्वाचा भाग आहे तो जीवनशैली, ज्यात काळाच्या ओघात बदल होत असतात. हिंदूंनी काळाच्या सुसंगत बदल आपसूकच स्वीकारले आहेत. निसर्ग आणि काळानुरूप जो स्वतःत बदल करतो, त्याअनुरूप वागतो त्याचे अस्तित्व कधीही पुसले जात नाही. जगात ज्या ज्या धर्मांचा उदय झाला तेव्हा सनातन हिंदू धर्म अस्तित्वात होताच. या धर्माने कुण्याही धर्माला रोखले नाही. कोणताही धर्म हा स्वतःसोबत एक संस्कृती घेऊन येत असतो. या संस्कृतीत जीवन जगण्याची पद्धती आणि मूल्ये समाविष्ट असतात. जगात जे धर्म उदयास आले त्या सर्वांनी प्रथम प्रहार हिंदू धर्मावर करण्याचा प्रयत्न केला आणि हे प्रयत्न अजूनही थांबलेले नाहीत.

पृथ्वीराज चव्हाण यांनी एक गोष्ट लक्षात ठेवावी की तुमच्यासारखे किती आले आणि किती गेले तरी या सनातन धर्माचे कुणीही वाकडे करू शकले नाही. वर्षभरापूर्वी तामिळनाडूतील एक मंत्री उदयनिधी स्टॅलिन याने चेन्नईच्या कामराज मैदानात प्रगतिशील लेखक आणि कलाकारांसमोर बोलताना हिंदू धर्माविषयी गरळ ओकली होती. सनातन धर्माला केवळ विरोध केल्याने काही होणार नाही तर हा धर्म नष्ट करायला हवा, असे अक्कलशून्य विधान तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांचा दिवटा पुत्र असलेल्या उदयनिधीने केले. उदयनिधीची री पृथ्वीराज चव्हाण यांनी ओढली आहे. मालेगाव बॉम्बस्फोटातील आरोपींना त्याच भारतीय न्यायव्यवस्थेने न्याय दिला, ज्या न्यायव्यवस्थेने मुंबई उपनगरीय रेल्वे बॉम्बस्फोटातील आरोपींचीही निर्दोष मुक्तता केली. रेल्वे बॉम्बस्फोटातील आरोपींना निर्दोष सोडले तेव्हा पृथ्वीराज चव्हाण मूग गिळून गप्प होते. काँग्रेसच नव्हे, तर सनातन हिंदू धर्माचा द्वेष करणाऱ्यांनी हे पक्के ध्यानात ठेवावे की आपलं ते बाबू अन् दुसऱ्याचं ते कार्ट हे धोरण आता चालणार नाही. हिंदूंना टार्गेट करून राजकारण करण्याचे, सत्ता मिळविण्याचे दिवस कधीचेच संपले आहेत. गेल्या सत्तर-पंचाहत्तर वर्षांत हिंदू धर्मीयांचे जेवढे नुकसान करायचे होते ते काँग्रेसवाल्यांनी केले. घटनेत हिंदुविरोधी कायदे घुसविले, धोरणे आखलीत पण हा आता भूतकाळ झाला आहे. काँग्रेसला जर उरले सुरले अस्तित्व राखायचे असेल तर न्यायाने वागावे. इतर धर्मीयांचा ज्याप्रमाणे सन्मान केला जातो तसाच सन्मान हिंदूंचाही केला पाहिजे. शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड सातत्याने पुरोगामी असल्याचा आव आणत सातत्याने सनातनवर टीका करीत असतात. आव्हाड यांनी तर पृथ्वीराज चव्हाण यांच्यावरही मात केली. आव्हाडालाही सनातन आणि हिंदू धर्म वेगळा वाटतो. जणू हिंदुद्वेषाची कावीळ झाली. बुद्धी भ्रष्ट झाल्यागत सनातन नावाचा कुठलाही धर्म नाही, सनातन धर्मामुळे वर्णव्यवस्था रुजली, मी केवळ हिंदू धर्माला मानतो, अशी निरर्थक आणि हास्यास्पद बडबड आव्हाड यांनी केली. जग कुठे चालले आणि हा भलत्याच रंगात रंगलेला स्वतःला नेता म्हणविणारा आव्हाड अजूनही अस्तित्वात नसलेल्या वर्णव्यवस्थेतच अकडून पडलेला आहे. पृथ्वीराज चव्हाण असोत की जितेंद्र आव्हाड, सनातन हिंदू धर्म हजारो वर्षांची आक्रमणे अंगावर झेलूनही हिमालयासारखा अडीग उभा आहे. केवळ निवडणुकीत विजय मिळविण्यासाठी आणि मंत्रिपदे राखण्यासाठी लांगूलचालन करणाऱ्या या तथाकथित नेत्यांना काय कळणार सनातन हिंदू धर्म आणि संस्कृती?

## दिल्ली दिनांक

# भारत-रशिया-चीन युती?

**रवींद्र दाणी**

अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांनी अखेर भारताच्या विरोधात 'टेरिफ' म्हणजे आयात कर नावाचे हत्यार उपसलेच. त्यात रशिया नावाचा 'दंड'ही जोडला. विशेष म्हणजे भारत, रशिया आणि चीन यांच्या युतीची चर्चा केली जात असताना हा घटनाक्रम घडला.

भारत, रशिया, चीन यांची युती सध्या तरी अशक्य वाटत असली तरी या युतीची चर्चा पुन्हा सुरू झाली, ती परराष्ट्रमंत्री डॉ. जयशंकर यांच्या चीन भेटीनंतर. चिनी नेत्यांसोबत झालेल्या त्यांच्या चर्चेनंतर भारताने चिनी नागरिकांना पुन्हा व्हिसा देणे सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. भारत-चीन संबंध सामान्य होण्याची प्रक्रिया याने सुरू होईल असे मानले जाते. यातूनच या नव्या युतीची चर्चा सुरू झाली. भारत, रशिया आणि चीन यांनी एकत्र येण्याची चर्चा नवी नाही. मात्र, या चर्चेला बळ मिळत आहे ते अमेरिकेच्या भारतविरोधी भूमिकेनंतर.

**बलाढ्य व अजिंक्य!** : भारत, रशिया, चीन यांची युती होणे सध्या तरी शक्य वाटत नसले तरी अशी युती झाल्यास ती जगातील सर्वांत बलाढ्य व अजिंक्य युती असेल असे मानले जाते. युरोपियन युनियन वा नाटो या सर्वांना धक्का देण्याची ताकद या युतीत असेल असे मानले जाते.

**एक पंचमाश भूभाग** : जगात एकूण १९५ देश असले तरी भारत, रशिया, चीन या तीनच देशांचा पृथ्वीतलावरील एकूण भूभाग पृथ्वीच्या एकूण भूभागाच्या एक पंचमांश आहे. आणि या तीन देशांची लोकसंख्या ३६ टक्के म्हणजे एकूण जागतिक लोकसंख्येच्या एक तृतीयांश आहे. एवढा प्रचंड भूभाग व मनुष्यबळ असलेले तीन देश एकत्र आले तर अमेरिका व युरोपसाठी ते मोठे आव्हान ठरू शकतात. रशियाजवळ नैसर्गिक संपत्तीचा अमाप साठा आहे, तंत्रज्ञानाच्या बाबतीत चीनने अमेरिकेला केव्हाच मागे टाकले आहे आणि भारत एक झपाट्याने विकसित होणारी अर्थव्यवस्था आहे. भारत, चीन, रशिया यांची एकूण लष्करी ताकद उर्वरित साऱ्या जगापेक्षा जादा असल्याचे मानले जाते.

**भारत-रशिया** : भारत आणि रशिया यांचे संबंध अतिशय विश्वासाचे राहिले आहेत. माजी राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन् रशियात भारताचे राजदूत असताना या संबंधाचा पाया घातला गेला, तो आजही कायम आहे. तत्कालीन सोवियत युनियनचे राष्ट्रपती लिनोनिद ब्रेझनेव्ह व भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे संबंध बहीण-भावाचे होते. ब्रेझनेव्ह-इंदिरा गांधी यांच्यात झालेला २५ वर्षांचा मैत्री करार भारत-रशिया मैत्रीचा कळस मानला जातो. याच आधारावर इंदिरा गांधींनी १९७१ च्या युद्धाचा जुगार खेळला होता. अमेरिका पाकिस्तानच्या बाजूने युद्धात उतरला तर सोवियत युनियन गप बसणार नाही असे ठोस आश्वासन ब्रेझनेव्ह यांनी इंदिरा गांधींना दिले होते. त्यामुळे अमेरिकेच्या धमक्यांनी जराही विचलित न होता इंदिरा गांधी पाकिस्तानचे दोन तुकडे करण्याच्या निर्णयावर ठाम राहिल्या होत्या. काळाच्या कसोटीवर भारत-रशिया मैत्री अबाधित राहिली.

**चीन-रशिया** : चीन-रशिया दोन्ही देश साम्यवादी विचारांचे. पण, त्यांचे आपसात पटत नव्हते. दोन्ही देशांमध्ये एक युद्धही झाले. त्यात रशियाने चीनला मार दिला होता. आता परिस्थिती बदलली आहे. रशिया कमजोर तर चीन बलवान झाला आहे. अमेरिकेच्या विरोधात दोन्ही देशांनी ही युती केली आहे. रशियाची नाकेबंदी करण्यासाठी अमेरिका व युरोपातील देशांनी या देशावर आर्थिक निर्बंध लावले असले तरी रशियाला दिलासा देणारे दोन देश होते भारत व चीन. या दोन देशांच्या सहकार्यामुळेच रशियाला युक्रेनचे युद्ध लढणे शक्य होत आहे अन्यथा रशियाला केव्हाच युद्ध थांबवावे लागले असते. रशिया-चीन यांचे संबंध दिवसेंदिवस घनिष्ठ होत आहेत.

**प्रश्न चीनचा** : भारत-रशिया यांनी एकत्र येण्यास काहीच समस्या नाही तसेच रशिया-चीन यांनी एकत्र येण्यात समस्या नाही. प्रश्न आहे तो चीनचा. तिबेट-लडाख-अरुणाचल प्रदेश हे प्रश्न दोन्ही देशांनी जवळ येण्यात काही महत्त्वाचे अडथळे आहेत. आणि हे अडथळे सहजासहजी पार करता येतील असे नाहीत. भारत-चीन सीमा विवाद फार जुना आहे. त्यावर तोडगा शोधण्याचे अनेक प्रयत्न झाले. त्यात कुणालाही यश मिळाले नाही. भारत-चीन यांच्यात आजवर दोन लष्करी चकमकी झडल्या. १९६२ चे युद्ध व २०२० चा गलवानमधील संघर्ष.

**पाकिस्तानला पाठिंबा** : भारत-चीन जवळ येण्यास सर्वांत मोठी अडचण पाकिस्तानची आहे. नुकत्याच झडलेल्या भारत- पाकिस्तान संघर्षात पाकिस्तानने वापरलेल्या शस्त्रांपैकी ८१ टक्के शस्त्रास्त्रे चिनी बनावटीची होती ही बाब भारताच्या उपलष्करप्रमुखांनी सांगितली आहे. चीन पाकिस्तानला भारताच्या विरोधात वापरत आला आहे. किंबहुना भारताविरोधात शेजारी देशांना उभे करण्याचे एक अघोषित धोरण चीन मागील काही वर्षांपासून राबवित आहे.

**ब्रह्मपुत्रेवर धरण** : चीनच्या भारतविरोधी भूमिकेत पडलेली ताजी भर म्हणजे ब्रह्मपुत्रेवर एक महाप्रचंड धरण बांधण्याचा चीनचा निर्णय. भारत-चीन सीमेपासून केवळ ३० किलोमीटरवर बांधण्यात येत असलेले हे धरण जगातील सर्वांत मोठे धरण राहणार आहे. जवळपास १५ लाख कोटी रुपये खर्चून बांधल्या जाणाऱ्या या धरणाचा भूमिपूजन समारंभ मागील आठवड्यात पार पडला. दहा वर्षांत हे धरण बांधले जाणार आहे. आणि पायाभूत प्रकल्प बांधण्यात चीनचा वेग पाहता तो हे धरण वेळेपूर्वी पूर्ण करील असे मानले जाते. चीनच्या यावलंग टांसगपो नदीवर हे धरण बांधले जात आहे. भारतात प्रवेश केल्यानंतर या नदीचे नामकरण ब्रह्मपुत्रा होते तर भारतातून बांगलादेशात गेल्यानंतर ती जमुना होते.

**तिप्पट मोठे** : चीनच्या हुबई प्रांतातील यांगत्सी नदीवर बांधण्यात आलेले थ्री जार्जेस धरण हे जगातील सर्वांत मोठे धरण आहे. त्या धरणापेक्षा हे धरण तिप्पट मोठे राहणार असल्याचे समजते. या प्रकल्पात पाच जलविद्युत प्रकल्प चीन उभारणार आहे. यासाठी अनेक बोगदे तयार केले जाणार असून त्यातून पाण्याचा प्रवाह वळविला जाणार आहे.

**पूर आणि दुष्काळ** : भारताने यापूर्वीच या प्रकल्पाबाबत आपली चिंता व्यक्त केली आहे. पण, चीन भारताच्या भूमिकेचा विचार करण्यास तयार नाही असे दिसते. ब्रह्मपुत्रेवर हे धरण बांधून चीन केव्हाही भारताच्या अरुणाचल भागात महापूर वा दुष्काळ दोन्ही प्रकारची स्थिती निर्माण करू शकतो. बहुधा यामुळेच या धरणाला 'वॉटर बॉम्ब' म्हटले जाते.

तिबेट परिसराला वीजपुवठा करण्यासाठी याचा वापर केला जाणार असल्याचे चीनने सांगितले आहे. या धरणामुळे या भागातील पर्यावरण धोक्यात येईल असे जागतिक पर्यावरण तज्ज्ञांना वाटत आहे. चीनची भारत विरोधी भूमिका पाहता सध्या तरी रशिया, भारत, चीन अशी युती होण्याची चिन्हे नाहीत.

**अमेरिकेला जोर!** : अमेरिकला याची चांगली कल्पना असल्याने त्याने भारताला आपल्यासोबत ठेवण्याऐवजी भारताच्या विरोधात भूमिका घेण्याचे ठरविले आहे. भारत-चीन यांना एकाच पारड्यात ठेवण्याचे नवे धोरण ट्रम्प यांनी घेतले आहे. वास्तविक राष्ट्रपती ट्रम्प यांनी आपल्या पहिल्या कार्यकाळात भारताशी चांगले संबंध ठेवले होते. पण, दुसऱ्या कार्यकाळात त्यांची भूमिका एकदम बदलली असल्याचे दिसते. रशियाकडून कच्चे तेल आयात केल्याचा परिणाम म्हणून अमेरिका व युरोप यांनी भारताच्या विरोधात आर्थिक निर्बंध लावण्याची भाषा उच्चारली आहे. अमेरिका या टोकाला जाणार नाही अशी आशा केली जात असतानाच, ट्रम्प यांनी भारताने रशियाकडून आयात केलेल्या तेलाबाबत भारतावर 'दंड' लावण्याचा निर्णय घेतला आहे. ट्रम्प भारताच्या विरोधात आणखी काय काय करतात हे येणाऱ्या दिवसांत दिसणार आहे.

## वेध

**सोनाली पवन ठेंगडी**

# नात्यांत व्हावी मैत्री

ऑगस्ट महिन्याचा पहिला रविवार हा जगभरात मैत्री दिन (नव्हे फ्रेंडशिप डे) म्हणून साजरा केला जातो. या दिवशी तरुणाई एकमेकांना फ्रेंडशिप बॅण्ड बांधतात, चॉकलेट देतात, पार्टी करतात. आपापल्या पद्धतीने ते हा दिवस साजरा करतात. आपण यात पाश्चिमात्य पद्धती वगैरे वादात न पडता फक्त मैत्रीचा विचार केला तर एखादा दिवस आपल्या अशा जीवलगांना दिला पाहिजे, हे मनाला नक्कीच पटेल. मुळात, मैत्रीचे नाते असेच असते की जिथे कोणतीही मर्यादा राहत नाही. एकमेकांसाठी धावून येणे, मित्राच्या सुखात आणि दुःखात पहिले हजेरी लावणे, एकमेकांसाठी करताना कोणताही व्यावहारिक विचार न करणे हा सर्व मैत्रीच्या नात्याचा आयाम आहे. त्याला स्थळ, काळाचे बंधन नाही आणि एकमेकांविषयी असूया, ईर्ष्या तर दूरदूरपर्यंत नसते. असे निकोप मैत्रीचे नाते जगण्याचा आधार होते. एवढेच नाही तर आपले जगणेही अधिक सुंदर करते.

मैत्रीच्या नात्याचा विचार करताना एक मुद्दा सहजच मनाला स्पर्श करून गेला की मैत्रीचे नाते असते पण, मग नात्यांमध्ये मैत्री का नसावी? आज नात्यांविषयी नको तितकी उदासीनता आलेली दिसते. अगदी स्पष्ट सांगायचे तर आता नात्यांमध्ये व्यवहार हावी झाला आहे. पैशाच्या तराजूत नाते मोजले जाते. मग जे नातेवाईक सधन, संपन्न आहेत त्यांच्याशी सगळेच गोड वागतात. पण, ज्यांच्याकडे पैसा नसेल किंवा जे प्रतिकूलतेत जगत असतील, ते कितीही जवळचे नातेवाईक असले तरी त्यांच्याविषयी बेपर्वाईचे धोरण असते. त्यांच्याविषयी विचार करण्याची कोणाला गरजही वाटत नाही. ही भावना केवळ जवळच्या नात्यातच नव्हे तर अगदी सख्ख्यांमध्ये सुद्धा शिरली आहे. दोन दिवसांपूर्वी न्यायालयातील एका प्रकरणाची बातमी समोर आली की, एका मुलाने वृद्ध आईला महिन्याकाठी दोन हजार रुपये देण्यास नकार दिला. दुसरा भाऊ तिला सांभाळतो आहे तर मग मी कशाला तिला पैसे देऊ, असा त्याचा युक्तिवाद होता. त्यासाठी तो न्यायालयात पोहोचला होता. त्याला न्यायालयाने चांगलीच चपराक दिली. न्यायाधीश म्हणाले, आईविषयी जो मुलगा असा विचार करत असेल तो माणूस म्हणवून घेण्याच्या लायकीचा नाही. न्यायालयाचा मुद्दा अगदी योग्य आहे. दुसऱ्या एका प्रकरणात तीन मुले असतानाही त्यांनी आईला सांभाळण्यास नकार दिला. शेवटी पोलिसांनी तीन भावांना आईची काळजी घेण्यासाठी चार-चार महिने वाटून दिले. जी आई तीन मुले एकाच वेळी लहानाचे मोठे करते, तिला तीन मुले मिळूनही सांभाळू शकत नाहीत, ही शोकांतिका आहे.



बहीण-भावांचे नातेही असेच कुठेतरी गढूळ झाले आहे. लग्न झालेल्या बहिणीसाठी भावाने काही केले तर ते त्याचे तिच्यावर उपकार ठरतात. भाऊ सधन असेल आणि बहिणीवर प्रतिकूल स्थिती आली तर तो तिच्याकडे पाहतही नाही, तिची वास्तपुस्तही करत नाही. उलट, पूर्वी काहीतरी केलेले उपकार जाणवून देईल, असे वागतो. घरातील भावजयीला नणंदेचे घरात येणेही मान्य नसते. कुठे नणंदेला भावजयी पसंत नसते. जावांच्या बाबतीत तर 'जावा तिथे हेवा' असे म्हटलेच जाते. आज न्यायालयात बहुतांश खटले नात्यांमधलेच आहेत, ही अतिशय भयानक स्थिती आहे. नात्यांमध्ये आलेला हा कोरडेपणा कुठेतरी प्रत्येकाच्या अहंपणामुळेच दिसतो आहे. नात्यांमध्ये प्रेमापेक्षा 'पैसा झाला मोठा' सोबतच 'इगो झाला मोठा' असे म्हणावे लागेल. पण, इतके निराशाजनक चित्रही रेखाटण्यात अर्थ नाही. कारण शेवटी रक्त हे पाण्यापेक्षा घट्टच असतं, म्हणतात ना तेच खरं. आजही अनेक कुटुंबे अशी आहेत जिथे नात्यांनी एकमेकांना सावरले आहे, प्रत्येकाने प्रत्येकाच्या कठीण काळात खंबीरपणे साथ दिली आहे. मग ते भाऊ-भाऊ असो, बहीण-भाऊ असो किंवा मुलगी-जावई, सुना असो... जिथे सासू-सुना, जावा-जावा, नणंद-भावजय, बहीण-भाऊ, भाऊ-भाऊ, मुलगा-वडील यांच्यात मैत्रीचे नाते निर्माण झाले तिथे वादाला फारसा थारा राहणार नाही. वाद हे केवळ मतभेदाच्या मर्यादेत राहतील आणि त्यामुळे संवादात विघ्न येणार नाही. नाते सुंदर करायचे तर त्याला मैत्रीचा आयाम द्यायला काय हरकत आहे? जसे आपण मैत्रीत आपल्या मित्र किंवा मैत्रिणीला समजून घेतो तीच भावना नात्यात निर्माण झाली तर आगामी काळात निकोप, सुंदर, देखणी कुटुंबव्यवस्था अस्तित्वात येईल. आता सणांचे दिवस आहेत. या शुभ दिवसांमध्येच याची सुरुवात करायला काय हरकत आहे...शुभस्य शीघ्रम्...!

७७५५९३८८२२

# २५ टक्के शुल्काचे उत्तर : आत्मनिर्भर भारताचे जागतिक गान

## प्रासंगिक

**श्याम जाजू : माजी राष्ट्रीय उपाध्यक्ष (भाजपा)**

भारत हा जगातील तिसरा सर्वात मोठा औषध उत्पादक देश आहे. अमेरिकेच्या बाजारपेठेत जेनेरिक औषधांची मोठी मागणी आहे आणि भारत त्यांचा प्रमुख पुरवठादार आहे. ट्रम्पच्या आयात शुल्कामुळे अमेरिकेत या औषधांची किंमत वाढू शकते, परंतु ही एक संधी देखील आहे. भारताचे नाव ग्लोबल हेल्थ गारंटी म्हणून करण्याची शक्यता आपण निर्माण करू शकतो. भारताच्या लसीकरण राजनैतिकतेमुळे कोविड-१९ काळात भारताला १५०+ देशांमध्ये लस पोहोचवता आल्या आहेत. ह्या मॉडेलचे आता डिजिटल आरोग्य, वैद्यकीय उपकरणे आणि एआय-डायग्नोस्टिक्ससाठी अनुकरण करता येईल.


चीनवरील अवलंबित्व कमी करण्याच्या जागतिक ट्रेंडमध्ये, एक विश्वसनीय उत्पादन केंद्र आपल्याला होण्याची अभूतपूर्व संधी मिळाली आहे. आदरणीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखालील सरकार तंत्रज्ञानाच्या कूटनीतिद्वारे(टेक्नोलॉजी डिप्लोमेसी) इलेक्ट्रॉनिक सुट्ट्या भागांमध्ये पुढे जाण्यासाठी काम करतच आहे. सेमीकंडक्टर मिशन आणि डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, उझ्रख जसे आधार, भीम, कोविन च्या धर्तीवर हार्ड डीपीआय, म्हणजेच भारतात सेमीकंडक्टर , आयओटी सेन्सर्स , इलेक्ट्रॉनिक घटकांचे उत्पादन किंवा भारत एटीएमपी (असेंब्ली टेस्टिंग मार्किंग आणि पॅकेजिंग) युनिट्ससाठी एक समर्पित झोन बनला पाहिजे.

जगातील सर्वात शक्तिशाली देशाला आता मेड इन इंडिया आयफोन हवे आहेत .ट्रम्पच्या २५% टॅरिफच्या धमकीनंतरही, ॲपलने भारतावर विश्वास व्यक्त केला आणि भारताने ते सिद्ध केले आहे. मार्च ते मे २०२५ दरम्यान भारतातून पाठवलेल्या आयफोनपैकी, ९७% आयफोन अमेरिकेत पोहोचले, ज्याचे मूल्य <२७,००० कोटी होते. फक्त मे महिन्यातच ८,६०० कोटी किमतीचे आयफोन अमेरिकेत पाठवण्यात आले. जानेवारी ते मे या कालावधीत एकूण निर्यात ३७,००० कोटींपेक्षा जास्त झाली,२०२४ पेक्षा खूपच जास्त. जिथे एकेकाळी अमेरिकेतील अर्धे आयफोन भारतात बनवले जात होते, आता जवळजवळ ९७% म्हणजेच सर्व अमेरिकन आयफोन धारक हे भारतातून निर्यातीत हॅंडसेट वापरणारे आहेत. हा केवळ व्यापार नाही तर तो भारताच्या ताकदीचा, विश्वासाचा आणि तांत्रिक नेतृत्वाचा जाहीरनामा आहे. आज, भारत केवळ निर्मिती करत नाही तर आपल्या धैर्याने, कौशल्याने आणि दृढनिश्चयाच्या बळावर जागतिक तंत्रज्ञानाचे भविष्य घडवत आहे.

**आत्मनिर्भर भारत पासून वैश्विक रक्षा शक्ति पर्यंत**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची रणनीती स्पष्ट आहे की भारत आता जगातील संरक्षण वस्तू व सेवांचा आयातदार नसावा, तर एक मजबूत आणि विश्वसार्ह संरक्षण निर्यातदार म्हणूनही उदयास यावा. ही केवळ एक रणनीती नाही तर भारताच्या जागतिक भूमिकेची पुनर्रचना करण्याचा प्रवास आहे. अलिकडच्या काळात, जेव्हा भारत आणि रशियामधील धोरणात्मक संबंध अधिक दृढ झाले, तेव्हा अमेरिकेकडून भारतावर दबावाचे राजकारण देखील दिसून आले. परंतु भारताने धोरण आणि नाविन्यपूर्णतेने त्याला प्रतिसाद दिला. शस्त्रांवरील अवलंबित्व सोडून स्वतःच्या भूमीवर शक्ती निर्माण करण्याचा मार्ग स्वीकारला. 'मेक इन इंडिया - डिफेन्स एडिशन' अंतर्गत, एक औद्योगिक क्रांती सुरू झाली, ज्याने DRDO, HL, BEL सारख्या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांना आणि टाटा एरोस्पेस, ढ्ढ डिफेन्स, कल्याणी ग्रुप सारख्या खाजगी कंपन्यांना एका समान दृष्टिकोनातून जोडले.

भारत केवळ ड्रोन, क्षेपणास्त्र प्रणाली आणि इलेक्ट्रॉनिक युद्ध तंत्रज्ञानात स्वयंपूर्ण झाला नाही तर जागतिक बाजारपेठेतही स्पर्धात्मक बनला आहे. हा बदल अचानक आला नाही. आवश्यक नीतिगत बदल, स्पर्धात्मक आणि मार्गदर्शक धोरण, सखोल संशोधन आणि दृढनिश्चयाद्वारे दशकांचे आयात-अवलंबन तोडण्याचा हा परिणाम आहे. २०१३-१४ मध्ये भारताची संरक्षण निर्यात फक्त १,९४० कोटी रुपये होती, तर २०२४-२५ मध्ये ही संख्या २३,६२२ कोटी रुपये झाली आहे, निर्यातीने हे सिद्ध केले आहे की भारत आता इतरांवर अवलंबून नाही, तर इतरांच्या गरजा पूर्ण करणारा देश बनला आहे.



आदरणीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजी म्हणतात , भारत आता केवळ आपल्या सीमांचे रक्षण करणार नाही तर जगाला सुरक्षित करण्यात भागीदार बनेल, तेही भारतीय तंत्रज्ञान, परंपरा आणि विश्वासाच्या सहाय्याने. त्यांचे स्वप्न आहे की भारत केवळ त्याच्या लष्करी सामर्थ्यासाठीच नव्हे तर त्याच्या दृढनिश्चय, नाविन्यपूर्णता आणि विश्वसार्ह संरक्षण उत्पादनांसाठी ओळखला जावा. विकसित भारताचे स्वप्न आता फक्त एक कल्पना राहिलेला नाही तर तो एका ठोस कृती आराखड्यामध्ये आणि स्पष्ट यशांमध्ये रूपांतरित झाला आहे. भारत नेक्स्टचे २०२९ पर्यंत ५०,००० कोटी रुपयांची संरक्षण निर्यात करण्याचे उद्दिष्ट आहे. हे केवळ एक आर्थिक आकडा नाही तर नवीन भारताच्या जागतिक विश्वसार्हतेचे, आत्मविश्वासाचे आणि तांत्रिक नेतृत्वाचे प्रतीक आहे. भारत स्वतःसाठी नाही तर संपूर्ण जगासाठी, सुरक्षित, सक्षम आणि स्वावलंबी भविष्यासाठी कोणत्या दिशेने वाटचाल करत आहे याची ही पुष्टी आहे.

टॅरिफ संकट नाही , तर तो रणनीतिक पुनर्रचनेचा काळ आहे. ट्रम्प यांच्या २५% कर धोरणामुळे भारत एका महत्त्वाच्या टप्प्यावर आला आहे. एकीकडे दबाव आहे, तर दुसरीकडे संधीचे दारही उघडते. भारताचा इतिहास साक्षी आहे की प्रत्येक बाह्य दबावाने आपल्याला आतून अधिक मजबूत बनवले आहे. १९९८ च्या अणुनिर्बंधांप्रमाणे, आज ही टॅरिफ धोरण देखील भारतासाठी धोकादायक आहे पण डिजिटल, आर्थिक आणि धोरणात्मक शक्ती म्हणून उदयास येण्याची संधी देत आहे. ग्रामीण भारताचा आत्मा असलेल्या एम एसएमई आणि हस्तकला क्षेत्रावर तात्काळ परिणाम होईल. कोट्यवधी कारागिरांचे जीवन कापड, कार्पेट, चामडे, काच आणि हस्तकला यासारख्या उत्पादनांशी जोडलेले आहे. परंतु या संकटाच्या काळात ब्रँडिंग, मूल्यवर्धन आणि विविधीकरण या मार्गाने भारताला अधिक मजबूत बनवू शकतो. डिजिटल इंडिया हा काळ त्यांच्यासाठी सुवर्णकाळ बनू शकतो. एआय, सायबरसुरक्षा, हेल्थटेक, डेटा ॲनालिटिक्स आणि योग भारत अशा क्षेत्रात ग्लोबल डिजिटल गुरुकुल म्हणून उदयास येऊ शकतो. Skilled Migration Ecosystem द्वारे आपण केवळ ज्ञान निर्यात करू शकत नाही तर जागतिक नेतृत्वाची प्रतिष्ठा पुनर्स्थापित करू शकतो.

भारताला आता एक Post-Tariff Era Strateg अंतर्गत नवीन बाजारपेठा, पर्यायी निर्यात केंद्रे शोधणे आवश्यक आहे. युरोप, आफ्रिका, लॅटिन-अमेरिकेत मेड-इन-इंडिया च्या वस्तू आणि सेवांचा पुरवठा करण्याची हि योग्य संधी असू शकते. स्ट्रॅटेजिक टेक अलायन्स च्या अंतर्गत जपान, फ्रान्स, युएई, इस्रायल सारख्या भागीदारांशी नव्याने सखोल संबंध निर्माण करणे गरजेचे वाटते. ही वेळ घाबरण्याची नाही, तर आपला दृष्टिकोन बदलण्याची आहे. आदरणीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत या टॅरिफ संकटाचे सकारात्मक निराकरण नक्कीच करेल आणि हा बदल केवळ आर्थिक नाही तर तो राष्ट्र उभारणीतील एक क्रांतिकारी अध्याय बनू शकतो.

## आपण मोबाईलवर पाहतो काय?

मोबाईलचे इंटरनेट प्रोग्राम वापरामुळे मानसिक आरोग्य आणि धेय प्रेरणा यावर दिवसेंदिवस प्रभाव पडतो आहे. आज मोबाईल हा केवळ एक संवादाचे साधन न राहता, आपले मनाचे दार बनले आहे. आपण दिवसभरात किती वेळ मोबाईल वापरतो, यापेक्षा आपण त्यावर 'काय' पाहतो हे जास्त महत्त्वाचे झाले आहे.

जर आपण सकारात्मक विचार, प्रेरणादायक कथा, ध्यान, अभ्यास, मन समजून घेणाऱ्या गोष्टी पाहू लागलो, तर हळूहळू मन स्थिर, समंजस आणि उद्दिष्टांकडे वळू लागतं. मनाला जे खाऊ घालाल, तसेच ते बनते. मोबाईलवर काही क्षण हसण्यासाठी जरूर वापरा, पण त्याचे संपूर्ण आयुष्य खाऊ देऊ नका. थोडा वेळ मानसिक पोषणासाठीही ठेवा. मनोरंजनात हरवू नका, अभ्यासात उभे राहा. मोबाईल तुमचे साधन आहे, व्यसन नव्हे.

**मुनीश्वर मलेवार**/९४०५५१३३२४

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### गांधीनाथा रंगजीमध्ये गुंजोटीकर व जोशी यांचे मार्गदर्शन

**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

गांधीनाथा रंगजी जैन जनमंगल प्रतिष्ठान संचलित, गांधी नाथा रंगजी विद्यालय मराठी माध्यमिक व प्राथमिक विभागात सहशालेय उपक्रम अंतर्गत मुली वयात येताना घ्यावयाची काळजी या विषयावर महिला पालकांना व इ. ५वी ते ७वीच्या मुलींना डॉक्टरांनी म ार्गदर्शन केले. प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ. मीना गुंजोटीकर व केतकी जोशी या दोन मान्यवर डॉक्टरांनी स्लाईड शोच्या माध्यमातून माहिती सांगितली. महिला पालकांनी, मुलींनी प्रश्न विचारुन शंकांचे निरसन करून घेतले. याप्रसंगी मुख्याध्यापिका सरोजना मुलिंटी यांनी सत्कार केला. कार्यकम यशस्वी करण्यासाठी अनघा कुलकर्णी व सहकारी शिक्षिकांनी परिश्रम घेतले.



### राष्ट्रविकास विद्यामंदिरात लो. टिळक, अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

राष्ट्रविकास प्राथमिक विद्यामंदिरात लोकमान्य टिळक यांचा स्मृतिदिन आणि लोकशाहीर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. मुख्याध्यापिका मंगला नाईकनवरे-मोरे यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी ज्युनिअर कॉलेजचे प्रा. संजय जाधव व भारती कुलकर्णी, मंजुश्री जमखंडीकर, जनाबाई आवताडे उपस्थित होते. प्रारंभी पहिली ते चौथीमधील विद्यार्थी-विद्यार्थीनींनी महापुरुषांबद्दल विचार व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी नयना कंडारकर, अनुबाई सुगुरे, मनीषा आवताडे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन कांचन कुलकर्णी यांनी केले. सोनाली जाधव यांनी आभार मानले.



### रेल्वे स्थानकावरील आरोग्य तपासणी शिबिरास उत्फूर्त प्रतिसाद

**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने वैद्यकीय पथकाच्या गतिमान नेतृत्वाखाली लातूर रेल्वे स्थानकावर व्यापक बहु-विशेष आरोग्य तपासणी शिबिराचे यशस्वीरित्या आयोजन केले होते. यावेळी डॉक्टरांच्या बहु-विषय पथकाने तज्ञांचा सल्ला आणि तपासणी सेवा प्रदान केली. या शिबिराचा १५७ रेल्वे लाभार्थ्यांनी सेवांचा लाभ घेतला. सोलापूरचे मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ. जी.एस. मंजुनाथ यांच्या मार्गदर्शनाखाली आणि लातूरचे विभागीय वैद्यकीय अधिकारी डॉ. सूर्या यांच्या समन्वयाने नियोजन आणि अंमलबजावणीमुळे शिबिराचे यशस्वी झाले. नेत्रतज्ज्ञ डॉ. देवीलाल, अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. रतन, सहाय्यक विभागीय वैद्यकीय अधिकारी डॉ. सबाहानी आणि विवेकानंद रुग्णालय, लातूर येथील भेट देणाऱ्या तज्ज्ञांनी यावेळी योगदान दिले. ज्यामध्ये स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. अमृता पाटील, वैद्यकीय अधिकारी डॉ. अभय आणि डॉ. मिथिला यांचा समावेश होता. त्यांनी आरोग्य तपासणी केली आणि सल्लामसलत केली. त्यांना मुख्य नर्सिंग पर्यवेक्षक स्नेहलता ओकाली, बिबिन आणि शरत; फार्मासिस्ट राजू, आरोग्य परिचारिका मोहसिन, वीरपाल, महेश आणि कल्पना आणि हाऊस कीपिंग असिस्टंट अजित यांनी मदत केली.

# महात्मा गांधी प्राणी संग्रहालयाची कामे दर्जेदार अन् वेळेत करा

### महापालिका आयुक्त डॉ. ओम्बासे यांच्या अधिकाऱ्यांना सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

महात्मा गांधी प्राणी संग्रहालय परिसराच्या सुरक्षिततेसाठी व सौंदर्यीकरणासाठी महत्त्वाचे असलेली कामे वेळेत व दर्जेदार व्हावीत.

सुरक्षिततेच्या दृष्टीने ही संरक्षक भिंत आवश्यक असून, प्रवेशद्वाराचे आकर्षक स्वरूप आणि मजबुती यावर भर देण्यात यावा, अशा स्पष्ट सूचना महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी पाहणीदरम्यान अधिकाऱ्यांना दिल्या.

विजापूर रोडवरील महात्मा गांधी प्राणी संग्रहालय येथील संरक्षक भिंत व मुख्य प्रवेशद्वाराचे बांधकाम सध्या प्रगतिपथावर असून, या काम ाची सोलापूर महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आज प्रत्यक्ष पाहणी केली.



यावेळी नियंत्रण अधिकारी तपन डंके, चेतन प्रचंडे, अभिजित बिराजदार आदी उपस्थित होते. यावेळी महापालिका आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी बांधकामाचा दर्जा, साहित्याचा वापर, कामाचा वेग याची माहिती घेतली. सुरक्षिततेच्या दृष्टीने ही संरक्षक भिंत आवश्यक असून, प्रवेशद्वाराचे आकर्षक स्वरूप आणि मजबुती यावर भर देण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या. दरम्यान, श्रावण महिन्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील आज आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी श्री रेवणसिद्धेश्वर मंदिर येथे भेट देऊन दर्शन घेतले. या प्रसंगी देवस्थानचे पुजारी शिंगारे यांनी आयुक्त डॉ सचिन ओम्बासे यांचा सत्कार केला. यावेळी श्री सिद्धेश्वर देवस्थान पंच कमिटीचे अध्यक्ष धर्मराज काडादी, माजी गटनेते किसन जाधव यांनी मंदिर परिसरातील सोई सुविधा संदर्भात माहिती दिली. सध्या श्रावण महिना सुरु असून दर रविवारी या ठिकाणी मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी होते. त्या अनुषंगाने आवश्यक त्या सोयी - सुविधा करण्याची मागणी केली.

### श्री रेवणसिद्धेश्वर मंदिर परिसरात सोयी सुविधा उपलब्ध करा : आयुक्त

यावेळी आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी विभागीय अधिकारी जावेद पानगल यांना श्री रेवणसिद्धेश्वर मंदिर परिसरातील स्वच्छता, लाईट,रस्ता या संदर्भात तत्काळ काम करण्याच्या सूचना दिल्या.भाविकांना कोणत्याही अडचणी न येता सुरक्षित आणि सुलभ दर्शन व्हावे, यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात. या मंदिर परिसरात आवश्यक त्या उपाय योजना करण्यात येतील असेही त्यांनी स्पष्ट केले.

# केमिकल कंपन्यांच्या दूषित पाण्यामुळे शेतजमिनी नापीक झाल्याचा आरोप

### आजपासून बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा शेतकऱ्यांनी दिला इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

चिंचोली काटी येथील केमिकल कंपन्यांमुळे या परिसरातील शेतजमीन नापिक झाली आहे. त्याची नुकसान भरपाई द्यावी तसेच जमीन सुपीक करून द्यावी. या मागणीसाठी येथील नुकसानग्रस्त शेतकरी चिंचोली एमआयडीसी कार्यालयासमोर सोमवार दि. ४ ऑगस्टपासून बेमुदत धरणे आंदोलन करणार आहेत, अशी माहिती शेतकरी किसन धोत्रे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मोहोळ तालुक्यातील चिंचोली काटी येथे केमि कल कंपन्या मोठ्या संख्येने आहेत. या कंपन्यांचे रसायन युक्त पाणी या शिवारातील सर्व शेतजमिनीत मुरते. यामुळे येथील शेतजमिनी नापीक झाल्या आहेत. टँकरद्वारेही या कंपन्या परिसरात खड्ड्यांमध्ये हे केमिकलचे पाणी सोडतात. ते पाणी विहिरींना, बोअरला पाझरते. शेतात पिण्यायोग्य पाणी नाही. यामुळे शेतजमिनी नापीक झाले आहेत. परिणामी शेतकऱ्यांची उपासमार होत आहे. आर्थिक भुर्दड सहन करावा लागत आहे. याला चिंचोली एम आयडीसी जबाबदार आहे. त्यामुळे या एमआयडीसीने शेतकऱ्यांना ताबडतोब नुकसान भरपाई द्यावी. शेतजम ीन सुपीक करून द्यावी. या मागणीसाठी चिंचोली एमआयडीसी कार्यालयासमोर येत्या सोमवारपासून बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. तरीही न्याय न मिळाल्यास मुंबई मंत्रालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही किसन धोत्रे यांनी दिला आहे. या पत्रकार परिषदेस उद्धव भोसले, विक्रम धोत्रे, शिवाजी परीट, सरफोद्दीन शेख, कैलास कोळी आदी उपस्थित होते.

# साईनगर शिर्डी आणि तिरुपती दरम्यान १८ विशेष गाड्या धावणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ ऑगस्ट-**

रेल्वेची भक्तांसाठी खास भेट साईनगर शिर्डी आणि तिरुपती दरम्यान १८ विशेष सेवा चालवण्यात येणार आहेत. या ट्रेनमुळे दोन महत्त्वाच्या धार्मिक स्थळांमध्ये थेट जोडणी होणार असून, श्री साईबाबा आणि श्री वेंकटेश्वर स्वामींच्या दर्शनाची संधी निम ार्ण होणार आहे.



ट्रेन क्र. ०७६३८ साप्ताहिक विशेष दर सोमवारी ४ ऑगस्ट ते २९ सप्टेंबर २०२५ या कालावधीत १९.३५ वाजता साईनगर शिर्डी येथून प्रस्थान करेल आणि तिसऱ्या दिवशी १.३० वाजता तिरुपती येथे पोहोचेल. ट्रेन क्र. ०७६३७ साप्ताहिक विशेष दर रविवारी ०३ ऑगस्ट २०२५ ते २८ सप्टेंबर २०२५ या कालावधीत ०४.०० वाजता तिरुपती येथून प्रस्थान करेल आणि दुसऱ्या दिवशी १०.४५ वाजता साईनगर शिर्डी येथे पोहोचेल. या रेल्वे गाड्यांसाठी कोपरगाव, मनमाड, नागरसोल, औरंगाबाद, जालना, सेलू, परभणी, गंगाखेळ, परळी वैजनाथ, लातूर रोड, उदगीर, भाळकी, बीदर, झहीराबाद, विकाराबाद, लिंगमपल्ली, सिकंदराबाद, नलगोंडा, मिर्यालगुडा, नाडीकुडे, पिडुगुरल्ला, सत्तेनपल्ले, तेनाली, चिराला, ओंगोल, गुडूर आणि रेणिगुंटा असे थांबा असतील तर दोन वातानुकूलित द्वितीय श्रेणी, चार वातानुकूलित तृतीय श्रेणी, ६ शयनयान, ४ सामान्य द्वितीय श्रेणी, १ द्वितीय आसन व्यवस्था असलेला गार्ड ब्रेक व्हॅन आणि १ जनरेटर व्हॅन अशी संरचना असेल. गाडी क्रमांक ०७६३८ या विशेष गाडीच्या आरक्षणाची सुविधा ०१ ऑगस्ट पासून सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर तसेच www.irctc.co.in (http://www.irctc.co.in) या संकेतस्थळावर उपलब्ध झाले आहेत.



# मुलांच्या स्वप्नपूर्तीसाठी पालकांनी पाठबळ द्यावे : उपायुक्त नागेश चौगुले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट -**

प्रतिकूल परिस्थितीवर मात करून विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश खरेच कौतुकास्पद पात्र आहे. मात्र विद्यार्थ्यांनी यावरच न थांबता मोठी स्वप्ने पाहावीत आणि ती स्वप्ने पूर्ण करण्याची जबाबदारी पालकांनी आपल्या खांद्यावर घेऊन त्या विद्यार्थ्यांना पाठबळ द्यावे, असे आवाहन सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक विभागाचे उपायुक्त तथा सांगली जिल्ह्याचे जात पडताळणी समितीचे सदस्य नागेश चौगुले यांनी व्यक्त केले.

मी वडार महाराष्ट्राचा, वडार ज्ञाती संस्था, श्री रूपाभवानी खाण क्रशर संघटना, सोलापूर शहर जिल्हा वडार समाज युवक संघटना, विद्यार्थी आणि महिला संघटना यांच्यावतीने आयोजित केलेल्या वडार समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्यात अध्यक्ष स्थानावरून चौगुले बोलत होते. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक राजू शिंदे, सहायक वाहन निरीक्षक विद्यादेवी जाधव, पोलीस पल्लवी देवरे, संतोष कलगुटगी, लक्ष्मण विटकर, मनोहर मुधोळकर, पंकज गुंजोटी, बाबुराव निंबाळकर, प्रतिभा मुदगल, राजू लिंबोळे, शंकर चौगुले, रवी शिंदे, रेणुका निंबाळकर, ज्योती चौगुले, अंजली विटकर, सुरेखा मंजुळकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक रवी देवकर यांनी केले. यावेळी विविध परीक्षांमध्ये अव्वल गुणांकन मिळवलेल्या ८२ गुणवंत विद्यार्थ्यांचा तसेच पोलीस निरीक्षक राजू शिंदे, सहायक पोलीस उपनिरीक्षक दिलीप चौगुले व दिलीप जाधव, वरिष्ठ लिपिक चंद्रकांत साळुंखे यांचा सेवानिवृत्ती निमित्त तसेच रवी शिंदे, महेश अलकुंटे, काशिनाथ आनंदकर, लहू बंदपट्टे यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल तसेच पत्रकार तेजस मुद्दे यांची निवड झाल्याबद्दल सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्रक, पुष्पगुच्छ व लेखणी देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. सूत्रसंचालन सुनील शिंदे यांनी केले. प्रशस्तीपत्रकाचे लेखन षण्मुखानंद दाते यांनी केले तर काशिनाथ आनंदकर यांनी आभार मानले.

# अनुभव रत्न पुरस्काराचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

अनुभव प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणारे अनुभव रत्न पुरस्कार वितरण सोहळा रविवारी लोकमान्य टिळक सभागृह, पार्क चौक येथे पार पडला. यावेळी



व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार उमेश कदम, सेवानिवृत्त सहाय्यक आयुक्त एम्प्लॉयमेंट रमेश हुमनाबादकर,स्त्रीरोग व प्रसूती तज्ञ डॉ सुनीता देगावकर, गांधी आश्रम शाळामाजी अधीक्षक संजीव ढोपरे. प्रतिष्ठानचे अध्यक्ष महेश भाईकट्टी, महिला अध्यक्ष श्वेता कालदीप आदी उपस्थित होते. संस्थेचे महिला अध्यक्ष श्वेता कालदीप यांनी प्रशस्ताविक केले. सूत्रसंचालन गणेश येळमेली, सुनंदा भाईकट्टी यांनी केले तर महेश भाईकट्टी यांनी आभार मानले.

### यांचा झाला पुरस्काराने गौरव

राहुल बिराजदार (सम ाजसेवक), अनीश सहस्त्रबुद्धे (उद्योजक), दौला ठेंगिल (डॉक्टर), प्रशांत जोशी (पत्रकार) अश्विनी तडवळकर (कलाक्षेत्र), संगीता गोटे (शिक्षिका), योगेश हवले (डेव्हलपर्स), अभिषेक शिरसीकर (वकील), श्वेता धर्माधिकारी (महिला पोलिस) आदी मान्यवरांचा अनुभव रत्न पुरस्काराने गौरव करण्यात आला. शाल, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व पुष्पगुच्छ या पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्काराचे हे दुसरे वर्ष आहे. विशेष सत्कार -राहुल तंबाके व कुमारी यशश्री आमणे या दोघांना विशेष सन्मान देऊन गौरव करण्यात आला..

**KATARE SPINNING MILLS LIMITED**
REGD. OFFICE: 14/30 GROUND FLOOR, B WING, KATARE COMPLEX, GANDHINAGAR, BL. NO. 10 Solapur MH- 413006.
CIN: L17119PN1980PLC022962
Email: katarespinningmills@gmail.com

**NOTICE**

In pursuant to Regulation 29 read with Regulation 33 and other applicable regulations of Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, Notice is hereby given that a meeting of the Board of Directors of the Company is scheduled to be held on Monday, 11thAugust, 2025 at 04.00 P.M. at the registered office of the Company to, inter alia, consider and approve the Un-Auditedstandalone financial results of the Company for the quarter ended on June 30, 2025.

A copy of this notice is also posted on the website of the Company **www.katarespinningmillslimited.com** and also on the website of the stock exchange at **www.bseindia.com**.

FOR KATARE SPINNING MILLS LIMITED

Place: Solapur.
Date: 03/08/2025

SD/-
KISHORE KATARE
MANAGING DIRECTOR
(DIN- 00645013)

**जाहीर प्रसिध्दीकरण**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ३८/२०२५
पुढील ता. ३०/०८/२०२५ नि. ७

**अक्कलकोट येथील मे. दिवाणी न्यायाधीश क. स्तर यांचे कोर्टात**

१) **श्रीमती गुरूबाई मल्लिनाथ बिराजदार**
वय : ५३ वर्षे, धंदा : घरकाम
२) **गजानंद मल्लिनाथ बिराजदार**
वय : ३५ वर्षे, धंदा : शेती
दोघे रा. हालहळ्ळी (अ), पो. कर्जाळ, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर — **अर्जदार**
विरुध्द
**कोणी नाही** - **सामनेवाला**

ज्याअर्थी अर्जदारांनी कै. मल्लिनाथ निलप्पा बिराजदार या दि. २०/०३/२०१२ रोजी हालहळ्ळी (अ), अक्कलकोट येथे मयत असून त्यांचे वारसदार असल्याचे ठरवून मिळण्यासाठी इकडील कोर्टाकडे अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाबाबत कोणाचेही काहीही म्हणणे अगर हरकत असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात अथवा नेमलेल्या तारखेस ३०/०८/२०२५ रोजी प्रत्यक्ष स्वतः अथवा विधिज्ञामार्फत हजर राहून म्हणणे, हरकत सादर करावेत. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्सास इकडील कोर्ट पुढील योग्य ते आदेश पारित करतील. हे जाहीर प्रसिध्दीकरण केले. ता. ०३/०८/२०२५

सही/-
कनिष्ठ लिपिक

कोर्टाचा शिक्का

हुकूमावरून
सही/-
सहा. अधीक्षक
दि. न्या. क. स्तर, अक्कलकोट

**जाहीरनामा**

कि.अर्ज क्र. ५७९/२०२५
नि.नं. ६

**सोलापूर येथील दिवाणी न्यायाधीश क. स्तर यांचे कोर्टात**
**श्रीमती. ए.एस. जाधव सो कोर्ट**

**वारसांचे प्रमाणपत्र/वारसाहक्क प्रमाणपत्र मिळणेबाबत**

ज्यापेक्षा बाबुराव सिद्रामप्पा बिराजदार हे दिनांक १२/०३/२०२५ रोजी अश्विनी सहकारी रुग्णालय व संशोधन केंद्र सोलापूर, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर येथे मयत झाले असुन त्यांचे वारस अर्जदार **१)** विनित बाबुराव बिराजदार, वय ४६ वर्षे, धंदा - वैद्यकीय व्यवसाय, रा. बिराजदार हॉस्पीटल मागे, ३८ डीए/ए-२ मुरारजी पेठ, सोलापूर ४१३००१, **२)** निलेश बाबुराव बिराजदार, वय ४२ वर्षे, धंदा - वैद्यकीय व्यवसाय, रा. बिराजदार हॉस्पीटल मागे, प्लॉट नं. ३, पांजरापोळ चौक, मुरारजीपेठ, सोलापूर, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर ४१३००१, **३)** स्मिता आलमप्रभु गुब्बेवाड, वय ४७ वर्षे, धंदा - घरकाम, रा. १०५, बी ब्लॉक, श्रीराम सृष्टी अपार्टमेंट बैंगलोर, कर्नाटक ५६००३२, **४)** जयश्री बाबुराव बिराजदार, वय ७१ वर्षे, धंदा - घरकाम, रा. बिराजदार हॉस्पीटल मागे, ३८ डीए/ए-२ मुरारजी पेठ, सोलापूर ४१३००१, त्यांनी बाबुराव सिद्रामप्पा बिराजदार हे मयत झाले आहे म्हणून त्यांचे सर्व हक्क मिळण्यासाठी वारसांचे प्रमाणपत्र/वारसाहक्क प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

त्यापेक्षा अर्जदार **१)** विनित बाबुराव बिराजदार, वय ४६ वर्षे, धंदा - डॉक्टर, रा. बिराजदार हॉस्पीटल मागे, ३८ डीए/ए-२ मुरारजी पेठ, सोलापूर ४१३००१, **२)** निलेश बाबुराव बिराजदार, वय ४२ वर्षे, धंदा - डॉक्टर, रा. बिराजदार हॉस्पीटल मागे, प्लॉट नं. ३, पांजरापोळ चौक, मुरारजी पेठ, सोलापूर, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर ४१३००१, **३)** स्मिता आलमप्रभु गुब्बेवाड, वय ४७ वर्षे, धंदा - घरकाम, रा. १०५, बी ब्लॉक, श्रीराम सृष्टी अपार्टमेंट बैंगलोर, कर्नाटक ५६००३२, **४)** जयश्री बाबुराव बिराजदार, वय ७१ वर्षे, धंदा - घरकाम, रा. बिराजदार हॉस्पीटल मागे, ३८ डीए/ए-२ मुरारजी पेठ, सोलापूर ४१३००१ हे वारस असुन सदरहू मयताचे वारसदार नव्हे असे कोणास कळविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार त्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत केल्यास त्यांना बाबुराव सिद्रामप्पा बिराजदार, रा. सोलापूर यांचे वारस असल्याचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

पुढील नेमलेली तारीख :- ०२/०९/२०२५
दिनांक :- ०२/०८/२०२५

सही/-
लिपीक
दिवाणी न्यायालय,
क. स्तर, सोलापूर

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय,
क. स्तर, सोलापूर

**विठ्ठल प्रतिष्ठान निमगाव (टे.) संचलित व महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी मान्यताप्राप्त**

**आर्या कृषी महाविद्यालय**

**मानेगाव, ता. माढा, जि. सोलापूर ४१३४१०**
**B.Sc. (Hons.) Agriculture पदवी**

**प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रिया कार्यक्रम २०२५-२६**

**कॉलेज कोड : ११३१८**
**केंद्रीयभूत प्रवेश प्रक्रिया वेळापत्रक**

| | |
|---|---|
| प्रथम प्रवेश फेरी प्राधान्यक्रम देण्याचा कालावधी | ०६/०८/२०२५ व ०७/०८/२०२५ |
| द्वितीय प्रवेश फेरी प्राधान्यक्रम देण्याचा कालावधी | १३/०८/२०२५ व १४/०८/२०२५ |
| तृतीय प्रवेश फेरी प्राधान्यक्रम देण्याचा कालावधी | २०/०८/२०२५ व २१/०८/२०२५ |
| रिक्त जागांकरिता केंद्रीयभूत केंद्रनिहाय प्रवेश फेरी | २९/०८/२०२५ ते ०३/०९/२०२५ |
| महाविद्यालयस्तरीय प्रवेश फेरी | ०४/०९/२०२५ व ०८/०९/२०२५ |

**अधिक माहितीसाठी**
**सीईटी सेल संकेतस्थळ** : https://agri2025.mahacet.org/
**संपर्क** : डॉ. नितीन उबाळे प्राचार्य (९९७५६७८१७५)
**प्रवेश प्रक्रिया विभाग प्रमुख** : प्रा. तुषार नामदे (८२७५९२३७८९)
**ई-मेल** : vitthalpratishthan555@gmail.com

कै. सुशिलाताई गायकवाड बहुउद्देशीय संस्था
**भारतरत्न इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग**
सोलापूर-पुणे नॅशनल हायवे नं. ९, गट नं. ५८/३, केगाव, सोलापूर-४१३२५५
(Approved by AICTE New Delhi. Approved by DTE Maharashtra. Approved by DBATU, Lonere)

**College code No. EN - 6219**

**प्रथम व थेट द्वितीय वर्ष डिप्लोमा प्रवेश प्रक्रिया २०२५-२६ संस्थास्तरीय प्रवेश जागासाठी**
१. इलेक्ट्रीकल डिप्लोमा इंजिनिअरिंग
२. मेकॅनिकल डिप्लोमा इंजिनिअरिंग
कॅप राउंडमधून शिल्लक राहणाऱ्या संस्थास्तरीय प्रवेश जागांसाठी अर्ज करण्याची अंतिम तारीख
**प्रथम वर्ष दि. ०५/०८/२०२५**
**द्वितीय वर्ष दि. ०७/०८/२०२५**

| | |
|---|---|
| Display of Provisional Merit List | 13/08/2025 At 10.00 a.m. |
| Display of Final Merit List | 13/08/2025 At 5.00 p.m. |
| Last Date of Admission | 14/08/2025 Upto 5.00 p.m |

Principal
**(Dr. Anil Deshmane)**
9822553157

President
**(Er. Ravindra D. Gaikwad)**

**E-mail -** ksgbs.bigco@gmail.com
**Website -** www.bigce.in
**Contact** 9922067744, 9372008140, 7767046219

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### भारताच्या ऑलिम्पिक भविष्यासाठी दिग्गज एकत्र




**हैदराबाद** : भारतीय क्रीडा क्षेत्रासाठी अशाच प्रकारच्या पहिल्याच प्रशासन उपक्रमात दिग्गज खेळाडू कपिल देव, बायचुंग भुतिया, अभिनव बिंद्रा, पुलेला गोपीचंद आणि गगन नारंग एकत्र आले आहेत. या एकात्मिक दृष्टिकोनाचे उद्दिष्ट तळागाळातील प्रतिभेला बळकटी देणे, पायाभूत सुविधांना अनुकूल करणे व मजबूत, समग्र क्रीडा विकासासाठी उत्कृष्टता वाढवणे आहे. खेळाडूंसाठी मार्ग तयार करून आणि राज्याच्या प्रगतीशील क्रीडा धोरणाशी जुळवून घेऊन, हा उपक्रम तेलंगणाला भारताच्या क्रीडा महत्त्वाकांक्षेच्या आघाडीवर ठेवतो, देशव्यापी क्रीडा क्रांतीचे नेतृत्व करतो. हे क्रीडा दिग्गज, आघाडीचे प्रशासक आणि उच्च उद्योगातील व्यक्तींसह तेलंगणा क्रीडा विकास निधीच्या नव्याने स्थापन झालेल्या प्रशासक मंडळाचे सदस्य आहेत. हे अग्रगण्य सार्वजनिक-खाजगी मॉडेल तळागाळातील प्रणाली मजबूत करण्यासाठी, विविध विषयांमध्ये उत्कृष्टतेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि भारताच्या पुढील पिढीच्या विजेत्यांचे पालनपोषण करण्यासाठी राष्ट्रीय आराखडा म्हणून काम करण्यासाठी तयार केलेले आहे.

### झिम्बाब्वे कसोटीतून न्यूझीलंडचा स्मिथ बाहेर

**बुलावायो** : न्यूझीलंडचा वेगवान गोलंदाज नॅथन स्मिथ पोटाच्या दुखापतीमुळे उर्वरित झिम्बाब्वे कसोटी मालिकेतून बाहेर झाला आहे. बुलावायो येथील पहिल्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी फलंदाजी करताना स्मिथला दुखापत झाली आणि त्यानंतरच्या एमआरआयमध्ये त्याच्या पोटात दुखावल्याचे स्पष्ट झाले आहे, त्यामुळे बरे होण्यासाठी सुमारे दोन ते चार आठवडे लागतील. झिम्बाब्वेच्या पहिल्या डावात स्मिथने २० धावांत ३ बळी घेतले होते, यजमान संघ १४९ धावांवर संपुष्टात आला होता. त्याने ७९ चेंडूत २२ धावा काढल्या होत्या व त्यानंतर तो निवृत्त झाला होता. यामुळे न्यूझीलंडने पहिल्या डावात ३०७ धावा केल्या आणि ९ गड्यांनी विजय मिळवला आणि दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. झिम्बाब्वे आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या टी-२० त्रिकोणी मालिकेत नुकतीच खेळलेल्या झॅक फॉल्केसला स्मिथच्या जागी त्याच्या पहिल्या कसोटी संघात बोलावण्यात आले आहे, असे न्यूझीलंड क्रिकेटने रविवारी एका निवेदनात सांगितले.

### व्हिक्टोरिया एमबोकोकडून कोको गॉफचा पराभव

**टोरोंटो** : रविवारी व्हिक्टोरिया एमबोकोने ओम्नियम बँक नॅशनल टेनिस स्पर्धेत प्रथम मानांकित अमेरिकेच्या कोको गॉफला एका तासापेक्षा कमी वेळात ६-१, ६-४ असे पराभूत करून सोमवारी होणाऱ्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. तीन वर्षांपूर्वी गॉफनंतर येथे एलिट आठव्यात स्थान मिळवणारी ती सर्वात तरुण महिला टेनिसपटू आहे. २००६ मध्ये स्टेफनी दुबॉइस (किम क्लिस्टर्स विरुद्ध) नंतर कॅनेडियन ओपनमध्ये अव्वल मानांकित खेळाडूला हरवणारी एमबोको ही ओपन एरामधील दुसरी वाईल्ड कार्डधारी टेनिसपटू आहे. २००९ मध्ये एटीपी १००० फॉरमॅट सुरू झाल्यापासून ती अव्वल मानांकित खेळाडूला हरवणारी पाचवी सर्वात तरुण खेळाडू आहे. गॉफ (रोम २०२१), मीरा ॲण्ड्रिव्हा (इंडियन वेल्स २०२५), बेलिंडा बेन्सिक (टोरंटो २०१५) व काई चेन चांग (टोकियो २००९) यांच्यापेक्षा केवळ वयाने मोठी आहे. रेकॉर्डनुसार १९८७ मध्ये हेलेन केलेसीनंतर एमबोको ही कॅनेडियन ओपनमध्ये सर्वात तरुण कॅनेडियन उपांत्यपूर्व फेरीत पोहोचली आहे.

### पाकिस्तानच्या खेळाडूंच्या विश्व लीजेंड्स क्रिकेट सहभागावर बंदी

**लाहोर** : पाकिस्तान क्रिकेट मंडळाने (पीसीबी) रविवारी प्रौढ क्रिकेटपटूंच्या जागतिक विश्वचषक लिजेंड्स क्रिकेट स्पर्धेतील आपल्या खेळाडूंच्या सहभागावर संपूर्ण बंदी घालण्याची घोषणा केली आहे.यासोबतच पीसीबीने स्पर्धा आयोजकांवर 'पक्षपाती' व क्रीडा प्रामाणिकपणाचा अभाव असल्याचा आरोप केला. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर शेजारी देशाशी असलेल्या द्विपक्षीय क्रीडा संबंधांविरुद्धच्या भूमिकेचा हवाला देत, भारतीय संघाने पाकिस्तानविरुद्धच्या गट साखळी फेरीतील सामना व उपांत्य सामना असे दोन्ही गमावल्याच्या घटनांच्या मालिकेनंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्ड जाहीर करतो की ते आम्ही वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लीजेंड्स मध्ये भविष्यात सहभागी होण्यास पूर्णपणे बंदी घालत आहे, असे पीसीबीने एका निवेदनात म्हटले आहे. पीसीबीनेही डब्ल्यूसीएलने भारताला गुण देण्याच्या निर्णयावर तीव्र आक्षेप घेतला आणि तो निर्णय 'ढोंगीपणा व पक्षपाताने कलंकित' असे म्हटले. भारत व पाकिस्तान गट साखळी सामन्यात खेळणार होते, परंतु भारताच्या ऑपरेशन सिंदूर नंतर राष्ट्रीय भावनांचा हवाला देत खेळण्यास नकार दिला.

# ब्रुक, रूटच्या शतकाने इंग्लंडचे ॲण्डरसन-तेंडुलकर चषक निश्चित




**लंडन, ३ ऑगस्ट**

हॅरी ब्रुक व जो रुटच्या दमदार शतकाच्या बळावर इंग्लंडने ओव्हल मैदानावर सामन्याच्या चौथ्याच दिवशी भारतावर आपला विजय जवळपास निश्चित केला. शेवटचे वृत्त आले तेव्हा वाईट प्रकाशामुळे खेळ थांबला, त्यवेळी इंग्लंडने ७६.२ षटकांत ६ बाद ३३९ धावा काढल्या होत्या. त्यांना विजयासाठी ३५ धावांची गरज होती व त्यावेळी जेमी स्मिथ नाबाद २ धावांवर, तर जॅमी ओव्हर्टन शून्यावर खेळत होते. सध्या ॲण्डरसन-तेंडुलकर चषक पाच सामन्यांची कसोटी मालिकेत इंग्लंड २-१ ने आघाडीवर आहे. भारताने इंग्लंडसमोर विजयासाठी ३७४ धावा काढण्याचे लक्ष्य ठेवले होते. इंग्लंडने १ बाद ५० धावांवरून पुढे चौथ्या दिवसाच्या खेळास सुरुवात केली. कालचा नाबादवीर बेन डकेटने ऑली पोपच्या मदतीने आपले अर्धशतक साजरे केले, मात्र डकेट ५४ धावांवर खेळत असताना प्रसिध कृष्णाने त्याला राहुलकडून झेलबाद केले. बेन डकेटने आपल्या अर्धशतकी खेळीत ८३ चेंडूत ६ चौकार ठोकले. पुढे ऑली पोपने जो रुटसोबत तिसऱ्या गड्यासाठी २४ धावांची भागीदारी केली. मोहम्मद सिराजने पोपला पायचित करून तंबूत परत पाठविले. पुढे जो रूट व हॅरी ब्रुकने उपहारापर्यंत इंग्लंडला ३ बाद १६४ धावांवर पोहोचवले. उपहारानंतर हॅरी ब्रुकने आपले शतक साजरे केले असताना आकाश दीपने त्याची घोडदौड संपविली. हॅरी ब्रुकने ९८ चेंडूंत १४ चौकार व २ षट्कारांसह १११ धावांची खेळी केली. ब्रुकचे हे दहावे कसोटी शतक ठरले. ब्रुकने रुटसोबत चौथ्या गड्यासाठी १९५ धावांची भागीदारी केली.

पुढे जो रूट व जेकब बेथेलने चहापानापर्यंत ४ बाद ३१७ धावांची नोंद करून इंग्लंडच्या विजयाच्या आशा पल्लवीत ठेवल्या. दरम्यान जो रूटनेही १३७ चेंडूंत १२ चौकारांसह आपले शतक साजरे करत इंग्लंडला विजयाच्या समीप आणून सोडले. जो रूटचे हे ३९ वे कसोटी शतक ठरले. याचदरम्यान प्रसिध कृष्णाने बेथेलचा (५) त्रिफळा उडवून इंग्लंडला धक्का दिला. मात्र जो रुट एक बाजू सांभाळत स्मिथच्या मदतीने इंग्लंडला विजयाच्या दिशेने नेत होता, त्यावेळी इंग्लंडला आणखी ५२ धावा काढण्याची गरज होती. अशातच प्रसिध कृष्णाने इंग्लंडला आणखी एक धक्का दिला व त्याने जो रूटला (१०५) यष्टीमागे ध्रुव जुरेलकडे झेल सोपवण्यास भाग पाडले. इंग्लंडची स्थिती ७२.६ षटकांत ६ बाद ३३७ अशी होती व त्यांना विजयासाठी ३७ धावांची गरज होती. जॅमी स्मिथ व ओव्हर्टनवर भिस्त होती.

### कसोटी क्रिकेटध्ये पहिल्यांदाच असं घडलं!

लंडन : भारत आणि इंग्लंड यांच्यात सुरू असलेल्या कसोटी मालिकेत दोन्ही संघांतील फलंदाजांनी धावांचा पाऊस पाडला आहे. या मालिकेत फलंदाजी करताना भारतीय फलंदाजांनी १२ तर इंग्लंडच्या फलंदाजांनी ७ असे एकूण १९ शतकं झळकावले आहेत. भारतीय संघाकडून फलंदाजी करताना एकट्या गिलने ४ शतकं झळकावली आहेत. या शतकांसह त्याने ४०० धावांचा पल्ला गाठला आहे. गिल या मालिकेत सर्वाधिक धावा करणारा फलंदाज आहे. त्याच्या नावे ७५४ धावा करण्याची नोंद आहे. यादरम्यान या मालिकेत एक दुर्मिळ विक्रम बनवला गेला आहे. या मालिकेत भारतीय कर्णधार शुबमन गिलसह आणखी ४ फलंदाजांनी ४०० धावांचा टप्पा गाठला आहे. भारताकडून ५, तर इंग्लंडकडून एकूण ४ फलंदाजांनी ४०० पेक्षा अधिक धावा केल्या आहेत.



### सीबीएसई लॉन टेनिस स्पर्धेत केशव भैया व तनुज संचेती यांना कांस्य पदक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

बंगळुरू येथे दक्षिण विभागांतर्गत झालेल्या १४ वर्षाखालील मुलांच्या आंतर सीबीएसई शालेय लॉन टेनिस स्पर्धेत येथील के.एल.ई स्कूलचे विद्यार्थी केशव भैया (इयत्ता ६ वी) व तनुज संचेती (इयत्ता ७ वी) यांनी कांस्य पदक प्राप्त केले. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचा व त्यांचे प्रशिक्षक उमेश बडगेर आणि बालाजी केदार यांचा सत्कार भारताचे जेष्ठ प्रशिक्षक मुंबईच्या डोसा रामाराव व ताहिर अली यांच्या हस्ते सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेच्या वतीने क्रीडा साहित्य देऊन करण्यात आला.

याप्रसंगी जिल्हा लॉन टेनिस संघटनेचे मानद सचिव राजीव देसाई, संध्याराणी बंडगर, सुरेशकुमार भैया, पूजा संचेती व रोहिणी भैया उपस्थित होते.

# खेळामुळे आरोग्य तंदुरुस्त : पीआय राजकुमार डांगे

### मंद्रूप महाविद्यालयात तालुका तायक्कांदो स्पर्धेचा समारोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

खेळामुळे आरोग्य सदृढ राहते. खेळामुळे आपल्यात चपळता येते. व्यक्तिमत्त्वाचा विकासही होतो. प्रत्येकाने एका तरी खेळात पारंगत असले पाहिजे, असे प्रतिपादन मंद्रूपचे पोलिस उपनिरीक्षक राजकुमार डांगे यांनी केले.

मंद्रूपमधील संतोष भीमराव पाटील महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित तालुकास्तरीय तायक्कांदो स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एम. एन. जगताप होते. या वेळी मुख्य समन्वयक प्रा. डॉ. जवाहर मोरे, शारीरिक शिक्षण संचालक डॉ. एस. एस. तोरवी, प्रा. डॉ. एन. डी. बनसोडे आदी उपस्थित होते. विविध वजनी गटात स्पर्धा घेण्यात आली. पंच म्हणून शिवराज मुगळे, नेताजी पवार यांनी काम पाहिले. स्पर्धेचा अंतिम निकाल (प्रथम, द्वितीय व तृतीय)



**आठ वर्षांखालील : मुली :** स्वप्नाली पवार, शुक्राना नराफ, सानवी हाडलगी. वजनी गट : १६ ते १८ किलो : आराध्या पाठक, आरती सोलापुरे, रुकसना नदाफ. १८ ते २० किलो : क्रिशा पवार, राधिका श्रीनामे. २० ते २४ किलो : रिदिशा पवार, श्रुती कोळेकर. २४ ते २७ किलो : संस्कृती कादे, प्रतीक्षा देविदास. **मुले :** अमिर राठोड, ध्रुव परदेशी. वजनी गट : १६ ते १८ किलो : यश बोरडे, श्रीधर सोलापुरे. २७ ते ३० किलो : कार्तिक परांडे, यश धवले.

# रेड रन स्पर्धेत करण रोकडे, सुकेशनी येरवडेला प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

पाच किलोमीटरच्या जिल्हा रेड रन स्पर्धेत करण सुधाकर रोकडे याने प्रथम क्रमांक पटकाविला. यश श्रीकांत खटके व बजरंग क्रिपालसिंग कतारी यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय स्थान मिळविले. मुलींच्या गटात सुकेशनी केरबा येरवडेला, वर्षा भिमराव राठोड व वसुंधरा अशोक शिंदे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय स्थान मिळविले.

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था मुंबई, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग सोलापूर व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त जिल्हास्तरीय रेड रिबन क्लबच्या विद्यार्थ्यांची ही स्पर्धा आयोजित केली होती.



दयानंद कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. बी. एच. दामजी व फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे चेअरपर्सन प्रा. डॉ. एन.बी. तेली यांनी हिरवा झेंडा दाखवून या स्पर्धेचे उदघाटन केले. दयानंद काशिनाथ असावा प्रशालेचे प्राचार्य संतोष हम्पे, दयानंद कला व विज्ञान महाविद्यालय एन.एस.एस. विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुचित्रा पाटणकर, डॉ. विजया महाजन, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभागाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी कृष्णा सकट, फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे ब्रांच मॅनेजर सुगतरत्न गायकवाड, सांख्यिकी विभाग प्रमुख दिनेश राठोड, क्लस्टर प्रिव्हेन्शन ऑफिसर ब्रह्मदेव श्रीमंगले यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक आलेल्यास अनुक्रमे दोन हजार, पंधराशे व एक हजार आणि मेडल, मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. स्वागत ब्रह्मदेव श्रीमंगले यांनी केले. सूत्रसंचालन समुपदेशक कपिल भालेराव यांनी केले.




### नॅशनल पॉवरलिफ्टिंग स्पर्धेसाठी येमूल आणि सरगर यांची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट -**

कोझीखोडा (केरळ) येथे २ ते ७ ऑगस्ट दरम्यान होणाऱ्या राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेसाठी येथील राजमहेंद्र येमूल आणि सांगोला तालुक्यातील विष्णू सरगर यांची महाराष्ट्र संघात निवड झाली. येमूल यांनी राज्य स्पर्ध्येत मास्टर तीन गटातील ८३ किलो गटात ३७०किलो वजन उचलुन सुवर्ण पटकाविले. विष्णु सरगर हे ७० ते ८० वयोगटातून ९४ किलो गटातून गेल्या ८ वर्षापासून राज्य स्पर्धातून सुवर्ण पदक मिळवले आहेत. या कामगिरीवर त्यांची निवड झाली. येथील छ. शिवाजी नाईट कॉलेजमध्ये झालेल्या ज़िल्हा स्पर्धेतुन निवड झाली होती. त्यांच्या निवडीबद्दल जिल्हा संघटनेचे सचिव प्रा संतोष गवळी, प्रा. सचिन गायकवाड, मारुती घोडके, श्री गोरे, विलास बेलदार यांनी शुभेच्या दिल्या.

### रिया जाधवची राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

इंडियन मॉडेल स्कूल सीबीएसईमध्ये इयत्ता दहावी मध्ये शिकणाऱ्या रिया जाधव हिची हरियाणा येथे होणाऱ्या राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली.



सीबीएसई साऊथ झोन २ तर्फे फ्युचर स्कूल, लाखनी, भंडारा येथे झालेल्या बॉक्सिंग स्पर्धेत रिया ने १७ वर्षाखालील ५२ ते ५४ किलो वजनी गटात रौप्य पदक मिळवले. या कामगिरीवर तिची निवड झाली. तिचे इंडियन मॉडेल स्कूलचे सचिव अमोल जोशी, श्री साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी, मुख्याध्यापिका अपर्णा कुलकर्णी, अचला राचर्ला, ममता बसवंती यांनी अभिनंदन केले. तिला क्रीडाशिक्षक सचिन ढवाण व राजकुमार माने यांचे मार्गदर्शन लाभले.

# दिलीपराव माने चषक सोळा वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन

### १२ ऑगस्टपासून स्पर्धेस सुरवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष व माजी आमदार दिलीप रावजी माने यांच्या वाढदिवसानिमित्त सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशन तर्फे सोळा वर्षाखालील मुलांच्या क्रिकेट स्पर्धेचे उदघाटन इंदिरा गांधी पार्क स्टेडियम येथे करण्यात आले. हे सामने साखळी पद्धतीने होणार आहेत.



या स्पर्धा १२ ऑगस्टपासून दयानंद कॉलेजच्या मैदानावर सुरु होणार आहेत. इच्छुक संघानी १० ऑगस्टपर्यंत शिवानंद अकलूजकर यांच्याकडे नावे नोंदवावीत. ही स्पर्धा साखळी पद्धतीने होणार आहे. स्पर्धेतील सर्व चेंडू सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशन देणार आहे. स्पर्धेतील खेळाडूंची कट ऑफ डेट १ सप्टेंबर २०१० ते ३१ ऑगस्ट २०१२ अशी आहे. इच्छुक संघानी १० ऑगस्ट पर्यंत शिवानंद अकलूजकर (मो. ९८८१७८६५७८) यांच्याकडे नोंदणी करावी, असे जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सचिव चंद्रकांत रेम्बर्सो यांनी कळविले आहे.

या स्पर्धेचे उद्घाटन अलंकार ट्रेडिंग कंपनीचे मालक राजासाहेब बागवान, डी. एम. क्रिकेट अकॅडमीचे सुनील चव्हाण व एन.जी. क्रिकेट ॲकॅडमीचे निलेश गायकवाड यांनी पुरस्कृत केल्या आहेत. रणजी खेळाडू व सध्या रणजी क्रिकेट स्पधचे निवड समिती सदस्य रोहित जाधव व नुकतेच आयपीएल स्पर्धेत पंच म्हणून कामगिरी केलेले व सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अंपायर कमिटीचे चेअरमन अनिस सहस्त्रबुद्धे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी १६ व १९ वर्षाखाली निवड समितीचे चेअरमन सुनील मालप, १४ वर्षाखालील निवड समितीचे चेअरमन राजेंद्र गोटे, सोलापूर क्रिकेट असोसिएशनचे टूर्नामेंट कमिटी चेअरमन संजय वडजे, निवड समिती सदस्य उदय डोके व संजय मोरे, राजू रंगम, क्रिकेट पंच चिराग शहा तसेच सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे खजिनदार संतोष बडवे, विहान क्रिकेट अकॅडमीचे कोच योगेश कोम्पल, युनायटेड क्रिकेट क्लबचे कोच सुदर्शन लोखंडे व मल्लिनाथ चौधरी, विनोद पाटील, राहुल मेहेत्रे हे उपस्थित होते. प्रस्तावना सुनील चव्हाण यांनी केले. सूत्रसंचालन सुनील मालप यांनी केले. विष्णू गायकवाड यांनी आभार मानले.

# शालेय क्रीडा स्पर्धा क्रीडा शिक्षकांच्या मदतीने होणार; पालिकेस प्रभारी क्रीडाधिकारी, क्रीडा कार्यालयात फक्त तीनच स्टाफ

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

शालेय शहर व जिल्हा क्रीडा स्पर्धा क्रीडा शिक्षकांच्या मदतीने घेण्याचे आवाहन जिल्हा क्रीडाधिकारी नरेंद्र पवार यांनी क्रीडा शिक्षकांना केले आहे.

पालिकेचे क्रीडाधिकारी भूषण जाधव यांनी अचानक राजीनामा दिल्यामुळे आणि जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालयात पवार यांच्यासह तीन स्टाफ आहे.

सोलापूर महानगरपालिका क्रीडा कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषद सोलापूर, जिल्हा क्रीडा कार्यालय यांच्या वतीने यंदाच्या शैक्षणिक वर्षातील शालेय क्रीडा स्पर्धेच्या तयारीसंदर्भात बैठकीत त्यांनी क्रीडाशिक्षकास हे आवाहन केले आहे. क्रीडा शिक्षकांना शिक्षण खात्याकडून ऑर्डर काढण्यात येईल व ४९ खेळाचे नियोजन करण्यात येणार आहे. या प्रसंगी व्यासपीठावर क्रीडा अधिकारी नदीम शेख, प्रभारी क्रीडा अधिकारी मच्छिंद्र घोलप, शारीरिक शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष दशरथ गुरव, शहर शारीरिक शिक्षण क्रीडा शिक्षक महासंघाचे शहर अध्यक्ष प्रा.संतोष खेंडे हे उपस्थित होते.



**शासनांच्या विविध योजनांचा लाभ घ्या**

शासनांकडून मैदानासाठी (सात लाख), क्रीडा साहित्यासाठी (तीन लाख), व्यायाम शाळा बांधकामासाठी (१४ लाख) अनुदान मिळते. शाळांसाठी विविध प्रकारचे अनुदान आहे. क्रीडांगण विकासासाठी साडे तीन कोटींचा, क्रीडा सुविधेसाठी एक कोटी २० लाख निधी उपलब्ध आहे. तरी शाळांनी याचा लाभ घ्यावे, असेही आवाहन श्री. पवार यांनी केले आहे.

**शिक्षकांनी मांडल्या या अडचणी**

दशरथ गुरव यांनी स्पर्धेच्या वेळी स्वच्छतागृह स्वच्छ असावे, वैद्यकीय पथक असावे, मैदान आखण्यासाठी कंत्राटी कामगार नेमावेत.

डॉ. उज्वल मलजी यांनी शालेय स्पर्धेसाठी प्रशिक्षकांची मागणी केली. विभागीय व राज्य स्पर्धा सोलापुरात घेण्याची मागणी केली. प्रा.संतोष खेंडे यांनी शालेय क्रीडा स्पर्धा पार्क मैदानावर घ्याव्यात, असे सुचविले.

सुहास छंचुरे यांनी स्पर्धेच्या दरम्यान मैदानावर महानगरपालिकेची तांत्रिक समिती सदस्य असणे गरजेचे आहे. स्पर्धेतील प्राविण्य प्राप्त खेळाडूंना स्पर्धा संपल्यानंतर रोख रक्कम स्वरूपात किंवा ट्रॉफी देऊन खेळाडूंना सन्मानित करावे.

स्पर्धेच्या दरम्यान प्रथमोपचार पेटीची व्यवस्था करावी. विरेश अंगडी यांनी स्पर्धेच्या दरम्यान कमीत कमी दोन तांत्रिक सदस्य नेमावेत.

मैदानावर खेळाडूंसाठी पाण्याची सोय करावी. १४ व १७ वर्षे वयोगटाच्या स्पर्धा लवकर सुरू कराव्यात. स्पर्धेच्या वेळी पोलिस बंदोबस्त ठेवावा.

### स्व. विष्णुपंत कोठे स्मृती चषक शालेय जिल्हा बुद्धिबळ स्पर्धा १० ऑगस्टला

**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

राज मेमोरियल इंग्लिश स्कूल व सोलापूर चेस अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनच्या मान्यतेने 'स्व. विष्णुपंत तात्यासाहेब कोठे' यांच्या ८८व्या जयंतीनिमित्त १९, १३ व ९ वर्षाखालील गटाच्या जिल्हा निवड बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन रविवार १० ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता सुशील रसिक सभागृह, सूर्या हॉटेल जवळ, मुरारजी पेठ येथे केले आहे. १९ वर्षाखालील गटातील प्रथम येणाऱ्या चार मुले व मुलींची निवड नांदेड येथे होणाऱ्या तर १३ वर्षाखालील २ मुले व मुलींची निवड कोल्हापूर येथे होणाऱ्या राज्य स्पर्धेसाठी करण्यात येणार आहे. १ जानेवारी २००६ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेले खेळाडू सहभाग घेऊ शकतात. निवड झालेल्या प्रत्येक खेळाडूंना रु. १ हजार मेडल व 'स्व. विष्णुपंत तात्यासाहेब कोठे' स्मृती चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. या स्पर्धेत एकूण २५ हजार रुपयापर्यंतचे चषक, मेडल्स व रोख बक्षिसे देण्यात येणार अशी माहिती राज मेमोरियल इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका रोहिणी सुरा यांनी दिली. निवड झालेल्या सर्व खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेची प्रवेश फी रक्कम देण्यात येणार असुन आयोजकांकडून निवासाची व्यवस्था मोफत करण्यात आल्याबाबतची माहिती संस्थेचे सचिव व आंतरराष्ट्रीय पंच सुमुख गायकवाड यांनी सांगितले आहे. इच्छुक खेळाडूंनी अधिक माहितीसाठी उदय वगरे (८८८८०४५३४४), प्रशांत पिसे (९१५६८१५९६३) अथवा अतुल सोनके ९६५७९४८९४९ यांच्याकडे संपर्क साधावा, असे आवहन सोलापुर डीस्ट्रीक्ट चेस असोसिएशनचे अध्यक्ष खा. धैर्यशील मोहिते पाटील व सोलापूर चेस अकॅडमीचे अध्यक्ष महेश धाराशिवकर यांनी केले आहे.


## महत्वाचे...




### वक्तृत्व स्पर्धेत शंकरलिंग प्रशालेचे यश

**वळसंग, दि. ३ ऑगस्ट-**

दक्षिण सोलापूर इंग्रजी अध्यापक मंडळाकडून घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत शंकरलिंग प्रशालेचे विद्यार्थी नववी आणि दहावी गटात वैष्णवी कलशेट्टी द्वितीय क्रमांक, पाचवी आणि सहावी गटात वैभवी जाधव द्वितीय क्रमांक, सातवी आणि आठवी गटात साक्षी भैरामडगी उत्तेजनार्थ यांनी यश मिळविले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे श्री शंकरलिंग देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष श्रीशैल दुधगी, चेअरमन शिवशरण थळंगे, संचालक विश्वनाथ थळंगे, शिवशरण प्याटी, रामेश्वर बिज्जरगी, प्रकाश दुधगी, मल्लिकार्जुन थळंगे, रमेश दुधगी मुख्याध्यापक विरेश थळंगे, पर्यवेक्षक शिवानंद घोडके आदींनी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शन केलेले शिक्षक तथा दक्षिण सोलापूर इंग्रजी अध्यापक मंडळाचे अध्यक्ष श्रीमंत भोसले, शिक्षक मल्लिनाथ गौडगाव, शिवराज अष्टगी यांचे अभिनंदन केले. सूत्रसंचालन बसवराज दुधगी यांनी केले तर आभार तानाजी जमादार यांनी मानले.





### पंढरपूर सिंहगड कॉलेजच्या सात विद्यार्थ्यांची 'कॉग्निझंट' कंपनीत निवड

**पंढरपूर, दि.३ ऑगस्ट-**

सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनियरींग, कोर्टी, पंढरपूर येथील सात विद्यार्थ्यांची कॉग्निझंट कंपनीमध्ये निवड झाली असून, त्यांना प्रतिवर्षी ४ लाख रुपयांचे पॅकेज मिळाले असल्याची माहिती प्राचार्य डॉ. कैलाश करांडे यांनी दिली. माळेवाडी, अकलुज येथील ओम प्रकाश फुले, अहिल्यानगर येथील सार्थक प्रसाद नांदे, जित्ती (ता.मंगळवेढा) येथील ज्ञानेश्वर दत्तात्रय पाटील, पंढरपूर येथील अमृता आण्णासो घाडगे, पंढरपूर येथील हरिप्रिया नारायण कुलकर्णी, पंढरपूर येथील उमामा नवोमन बेद्रेकर, श्रीपूर येथील प्रणाली प्रशांत पिसाळ या विदयार्थ्यांची कॉग्नीझंट कंपनीमध्ये निवड झाली आहे. प्राचार्य डॉ. करांडे, प्लेसमेंट ऑफीसर डॉ.समीर कटेकर, उपप्राचार्य डॉ.स्वानंद कुलकर्णी, डॉ. चेतन पिसे, डॉ. भालचंद्र गोडबोले, डॉ. श्याम कुलकर्णी, डॉ. श्रीगणेश कदम, डॉ. संपत देशमुख, डॉ. अल्ताफ मुलाणी, डॉ. बाळासाहेब गंधारे, डॉ. अतुल आराध्ये, डॉ. दिपक गानमोटे, डॉ. सोमनाथ कोळी, डॉ. सुभाष पिंगळे, डॉ.अनिल निकम, डॉ. शिवशंकर कोंडूरु, डॉ. यशवंत पवार, डॉ. सत्यवान जगदाळे, प्रा. अभिजित सवासे यांनी अभिनंदन केले.




### मातंग समाजाने संघटित झाले पाहिजे : संपर्कप्रमुख वसंत देडे

**अक्कलकोट, दि. ३ ऑगस्ट-**

मातंग समाजात उच्चशिक्षित संघटित झाले पाहिजे मातंग समाजास वर्गवारी अबकड प्रमाणे आरक्षण मिळावे. समाज बांधवांनी शिक्षण घ्यावे संघटित व्हावे समाजाची उन्नती शिक्षणाशिवाय होणार नाही, असे प्रतिपादन लहुजी शक्ती सेना सोलापुर जिल्हा संपर्क प्रमुख वसंत देडे यांनी केले. हसापुर येथे शाखेची स्थापना करण्यात आली. यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर लहुजी शक्ती सेनेचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष महादेव महाराज भोसले, जिल्हाध्यक्ष नागेश जाधव, जिल्हा युवक अध्यक्ष सोमनाथ कसबे, राजेश जगताप, रवि वाघमोडे, नंदकुमार जगदाळे, हसापुर शाखा अध्यक्ष अनिल झंपले, उपाध्यक्ष लखन पाटोळे आदि उपस्थित होते. पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष महादेव महाराज भोसले यांनी रशियातही लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांनी शिवरायाचा इतिहास सांगून जगाला वेड लावल्याचे गौरवोद्गार काढले. शिवसेनेचे माजी उप जिल्हाप्रमुख सुनिल कटारे यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी कुमार म्हेत्रे, श्रीशैल म्हेत्रे, व्हनप्पा म्हेत्रे, पृथ्वीराज नाईकनवरे, अविनाश देडे, शिवाजी वाघमारे, कृष्णा पाटोळे, बलभीम पाटोळे, सिद्धार्थ नाईकनवरे, खंडू पाटोळे, आकाश नाईकनवरे, प्रशांत पाटोळे, बाबुशेख मशाक शेख, गणेश पाटील, अमोल शिंदे, सागर घटकांबळे, बाबुराव सुभेदार, शिवाजी वाघमारे, सुनील घटकांबळे, लक्ष्मण घटकांबळे, तुकाराम पाटोळे, परशुराम म्हेत्रे, दत्तात्रेय गायछोडे, पोलीस पाटील दिगंबर सोनकांबळे उपस्थित होते.

## निधन वार्ता..

### डी. टी. माने



**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

येथील छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजचे माजी प्राचार्य व सांगोला तालुक्यातील वाकी शिवणी गावचे सुपुत्र धोंडीराम तातोबा उर्फ डी. टी. माने( वय ९३) यांचे रविवारी पुण्यात निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी असा परिवार आहे. कोल्हापूर विद्यापीठाची पहिली डॉक्टरेट त्यांनी कमवा आणि शिका योजनेतून मिळविली होती. तसेच संत साहित्याचे ते गाढे अभ्यासक होते.

### ब्रह्मा शहा



**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

आर्यनंदी सोसायटी येथील रहिवासी,ज्येष्ठ फोटोग्राफर अनिल शहा यांच्या मातोश्री ब्रह्मा किशोर शहा (वय ८०) यांचे शनिवारी २ऑगस्ट रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे.

# अक्कलकोटमध्ये अतिक्रमणावर हातोडा

### ४१ गाळेधारकांनी स्वत:च काढले अतिक्रमण गाळे

### सर्वात मोठी कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३ ऑगस्ट-**

४ जेसी बी पोकलेन दोन ४ हायवा १४ टॅक्टर न पाचे ९० कर्मचारी १२५ पोलीस १० पोलीस अधिकारी आदी मोठ्या प्रमाणत यंत्रणा फौज फाटा राबवित बसस्थानक मागील अतिक्रमण गाळे काढण्यात आली.

४० गाळेधारकांची ४१ गाळे स्वतःहुन अतिक्रमण काढली ज्या ठिकाणी अतिक्रमण काढण्यात आले तेथे पुन्हा अतिक्रमण होणार नाही याची काळजी . नगरपालिका घेण्याची दृष्टीने कार्यवाही चालू असत्याची माहिती मुख्याधिकारी रमाकांत डाके यांनी दिली. अक्कलकोट शहरात बहुधा प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणात अतिक्रमण काढण्यासाठी यंत्रणा राबवली गेली. तहसिलदार विनायक मगर यांनीही



बसस्थानक मागील अतिक्रमण केलेल्या ७० गाळेधारकांनी नपाने नोटीस दिली होती. हा वाद थेट मुंबई उच्च न्यायालयात गेला गाळेधारकाच्या विरोधात नगरपालिका बाजुने निर्णय आला. याबाबत नपाने प्रसिद्धी करण देऊन योग्य फौजफाटा पोलीस बंदोबस्त घेऊन अतिक्रमणावर हातोडा फिरवला.

यावेळी अलिक्रमण काढताना पाहणी केली पोलीस निरिक्षक राजेद्र टाकणे यांच्या सह १० पोलीस अधिकारी याच्या सह मोठ्या प्रमाणात पोलीस कर्मचारी अतिरिक्त शस्त्रधारी पोलीस दल यावेळी घटनास्थळी उपस्थित होते.




### पंढरपूर न.प.ला ३२ हजार वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट : मुख्याधिकारी रोकडे

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि. ३ ऑगस्ट-**

पंढरपूर नगरपरिषदेला हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र या अभियानांतर्गत यावर्षी सुमारे ३२ हजार ५०० वृक्ष लागवड करण्याचे उद्दिष्ट देण्यात आल्याची माहिती पालिकेचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली. दरम्यान पंढरपूर नगर पालिकेकडून हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र व माझी वसुंधरा अभियानांतर्गत वृक्ष लागवडीचा संकल्प करून १ ऑंगस्ट २०२५ पासून प्रत्यक्ष वृक्षारोपण अभियानास सुरवात केली आहे. राज्य शासनाकडून हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र तसेच माझी वसुंधरा आदी अभियानाचे आयोजन करण्यात आलेले आहे.या अभियाना अंतर्गत १ ऑंगस्ट २०२५ रोजी पंढरपूर शहरातील पद्मावती उद्यान कॉर्नर ते बडोदा बँक ते स्टेशन रोड येथील रस्ता दुभाजकांमध्ये वृक्ष लागवड करण्यात आली. पालिकेचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी हरित महाराष्ट्र,समृद्ध महाराष्ट्र व माझी वसुंधरा अभियानांतर्गत पंढरपूर शहरामध्ये विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्याचे नियोजन केले आहे. या वृक्षलागवड कार्यक्रमाच्या प्रारंभा वेळी पालिकेचे मुख्याधिकारी महेश रोकडे, उपमुख्याधिकारी रवींद्र सूर्यवंशी, नगर अभियंता प्रकाश केसकर, पाणीपुरवठा अभियंता राजकुमार काळे, लेखापाल करुणा शेळके, लेखापरीक्षक प्रशांत पवार, आरोग्य अधिकारी शरद वाघमारे, उपनगर अभियंता सुमित पाटील, भांडार विभाग प्रमुख विजय शहाणे, स्वच्छता निरीक्षक नाना गोरे, उद्यान विभाग प्रमुख सुवर्णा हाके, चिदानंद सर्वगोड,अनिल अभंगराव, चेतन चव्हाण, ईश्वरकट्टी, कृष्णकांत कुलकर्णी व इतर कर्मचारी यांनी वृक्ष लागवड केली.

# सांगोला विद्यामंदिरमध्ये वक्तृत्व स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२ ऑगस्ट-**

सांगोला विद्यामंदिर प्रशाला आणि ज्यु.कॉलेजमध्ये लोकमान्य बाळगंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथी आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त विविध गटांमध्ये वक्तृत्व स्पर्धा घेत दोन्ही महापुरुषांना अभिवादन करण्यात आले. स्पर्धेच्या प्रारंभी संस्थाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांच्या शुभहस्ते लो.टिळक, अण्णाभाऊ साठे व गुरुवर्य कै.बापूसाहेब झपके यांच्या प्रतिमांना पुष्पहार समर्पण करत पूजन करण्यात आले.



यावेळी इयत्ता पाचवी-सहावी गटातून श्रावणी लवांडे प्रथम, संस्कृती बेहेरे द्वितीय, दिव्या सावंत तृतीय, इयत्ता सातवी-आठवी गटातून संस्कृती लोंढे प्रथम, ईश्वरी घोरपडे व भक्ती गुळमिरे द्वितीय, गौरी लवटे तृतीय, इयत्ता नववी-दहावी गटातून सृष्टी वाघमारे प्रथम, सिद्धी उकळे द्वितीय, सलवा खतीब तृतीय, इयत्ता अकरावी बारावी गटातून स्नेहल बोधगिरे प्रथम, तृप्ती गेळे द्वितीय, सृष्टी खंडागळे तृतीय क्रमांक पटकावला. स्पर्धे वेळी आशितोष नष्टे, कविता राठोड, स्वाती चांदणे, सिताराम राऊत, दादासाहेब वाघमोडे, चंद्रकांत ढोले, शैलजा झपके, अनिता घोंगडे, उमेश नष्टे, इसाक मुल्ला, माधुरी पैलवान, सुप्रिया गायकवाड यांनी परीक्षक म्हणून काम केले. यशस्वी स्पर्धकांचे संस्थाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, खजिनदार शंकरराव सावंत, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके, सदस्य विश्वेश झपके, प्राचार्य अमोल गायकवाड, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, पर्यवेक्षक प्रदीप धुकटे, उत्तम सरगर, काकासाहेब नरूटे, ज्येष्ठ शिक्षक चिंतामणी देशपांडे, शिवशंकर तटाळे, उन्मेष आटपाडीकर यांनी अभिनंदन केले. स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी वांङःमय विभागातील धनाजी चव्हाण, सू-याबा आलदर, अर्चना कटरे, राधा रिटे, मेहेर ढवळे, प्रशांत रायचुरे, दत्तात्रय पाटील, संध्या तेली, श्रीकृष्ण वाघमारे, रूपाली सरगर, वसंत गुळमिरे, दत्तात्रय कांबळे, उत्सव विभागाचे तानसिंग माळी, बाळराजे सावंत, नरेंद्र होनराव यांनी परिश्रम घेतले.

### हुमा मेडिकल जवळील शटर चोरीस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि. ३ ऑगस्ट-**

शहरातील सात रस्ता परिसरातील हुमा मेडिकलजवळून चोरट्याने ७ हजार किंमतीचे लोखंडी शटर चोरून नेल्याप्रकरणी तिघांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत शेहनाज इम्तीयाज शेख (रा. योमल अपार्टमेंट, गेंट्याल चौक, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन बिलाल इक्बाल शेख, जैद इक्बाल शेख व अज्ञात इसम यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २० जून रोजी हुमा मेडिकलच्या बाजूस शेहनाज शेख यांनी ८ फुट लांबीचे व ९ फुट रूंदीचे ७ हजार रुपये किंमतीचे लोंखडी शटर ठेवलेले होते. ते लोखंडी शटर बिलाल शेख, जैद शेख व एका अनोळखी व्यक्तीने चोरून नेले. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार पापडे पुढील तपास करीत आहेत.

## बार्शीत डॉ. यादव यांचा सप्टेंबरमध्ये नागरी सत्कार

### सत्कार समितीची स्थापना; स्वागताध्यपदी डॉ. सुनीलकुमार लवटे

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३ ऑगस्ट-**

बार्शी भूषण डॉ. बबनराव यादव यांच्या वैद्यकीय, शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल भव्य नागरी सत्काराचे आयोजन करण्यात येत आहे. सप्टेंबर २०२५ मध्ये होणाऱ्या या सोहळ्यासाठी बार्शीतील नागरिक सत्कार समितीच्या माध्यमातून एकत्र येत असून, महाराष्ट्रातील नामवंत व्यक्तींच्या हस्ते हा सत्कार संपन्न होणार आहे.



डॉ. बी. वाय. यादव यांचा जन्म वरकुटे (मूर्तीचे) येथे झाला. कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांच्या बोर्डिंगमधून शिक्षण घेत त्यांनी मिरजेच्या वैद्यकीय महाविद्यालयातून एम.एस.पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. देश-विदेशात वैद्यकीय क्षेत्रात संधी उपलब्ध असताना, मामासाहेबांना दिलेल्या वचनानुसार त्यांनी बार्शीला परत येऊन सेवेचा वसा घेतला. १९८१ मध्ये डॉ. यादव यांनी श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्षपद सांभाळले. वैद्यकीय क्षेत्रात डॉ. यादव यांनी बार्शीत आरोग्यमंदिर या सहा खाटांच्या छोट्या रुग्णालयापासून सुरुवात केली. आज त्याच रुग्णालयाचे रुपांतर ३५० खाटांच्या ट्रॉमा युनिटसह सुसज्ज 'जगदाळे मामा हॉस्पिटल'मध्ये झाले आहे. बार्शी कॅन्सर हॉस्पिटल, रामभाई शहा रक्तपेढी, भगवंत देवस्थान, इंडियन रेडक्रॉस सोसायटी यासारख्या संस्थांच्या उभारणीत त्यांचा मोलाचा वाटा आहे. वयाची ८० वर्षे पूर्ण केलेल्या डॉ. यादव यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या पुढाकाराने नागरी सत्कार समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीचे स्वागताध्यक्ष डॉ. सुनीलकुमार लवटे, ज्येष्ठ विचारवंत, साहित्यिक आणि लेखक, यांनी तमाम बार्शीकरांना या सोहळ्यात सहभागी होण्याचे आणि आपले योगदान देण्याचे आवाहन केले आहे. सप्टेंबर २०२५ मध्ये होणारा हा सत्कार सोहळा होणार असून, नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

## बार्शीतील न. प. सफाई कर्मचाऱ्यांची सुट्टी रद्द

### एनडीएमजेने दिला आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३ ऑगस्ट-**

बार्शी नगरपरिषदेने सफाई कर्मचाऱ्यांची दर बुधवारी असणारी साप्ताहिक सुट्टी जून २०२५ पासून रद्द केल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. नॅशनल दलित मूव्हमेंट फॉर जस्टीस (एनडीएमजे) या संघटनेने हा निर्णय तात्काळ मागे घ्यावा, अन्यथा नगरपरिषदेसमोर आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

एनडीएमजेने आपल्या निवेदनात म्हटले की, सुट्टी रद्द करण्याचा कोणताही लिखित आदेश किंवा कारण देण्यात आलेले नाही. हा कर्मचाऱ्यांवरील अन्याय आहे. आज, सफाई



कर्मचारी दिनी, एनडीएमजे तालुका अध्यक्ष सनी गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली मुख्याधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले. यात सुट्टी पुन्हा सुरु करण्याची मागणी करण्यात आली आहे. निवेदनावर शहर अध्यक्ष ॲड. प्रसन्नजीत नाईकनवरे, तालुका सचिव सुर्या मस्के, खजिनदार रोहित लोंढे, विधी सल्लागार ॲड. स्वप्नील खंडागळे, ॲड.. मिलिंद बनसोडे, कार्याध्यक्ष अमित गायकवाड, संघटक समाधान चौधरी, प्रसिद्धी प्रमुख लखन बनसोडे, शहर उपाध्यक्ष धीरज भोसले, शहर सचिव सुमीत खुरंगुळे, शहर खजिनदार मिलिंद भालेराव, शहर कार्याध्यक्ष अजय वाघमारे, शहर विधी सल्लागार ॲड. सचिन किरतकुहवे, ॲड. अक्षय बिडबाग, शहर समन्वयक प्रमोद गायकवाड, शहर संघटक श्रीकांत कांबळे, शहर प्रसिद्धी प्रमुख सचिन लोकरे आणि सदस्य कपील बोकेफोडे, धनंजय बोकेफोडे, जय शिरामे यांच्या सह्या आहेत.

# राष्ट्रीय महामार्गातील बाधित शेतकऱ्यांना न्याय

### दिपकआबा साळुंखे-पाटील यांच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ३ ऑगस्ट-**

सांगोला तालुक्यासह सोलापूर जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांना गेली १० ते १२ वर्षे त्यांच्या भूसंपादित जमिनीचे मोबदले न मिळाल्याने प्रचंड आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत होता. अखेर माजी आ.दिपकआबा साळुंखे पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यासंदर्भात ठोस निर्णय घेऊन बाधित शेतकऱ्यांच्या जमिनीचा मोबदला मिळण्यासाठी सक्षम अधिकारी नसल्याने ही मोबदला मिळण्याची प्रक्रिया पार पाडण्यासाठी उपस्थित सचिवांना तात्काळ सक्षम अधिकाऱ्यांच्या नेमणुका करून वेळेत सुनावण्या घेऊन शेतकऱ्यांना काळ मर्यादा देऊन निर्धारित वेळेत त्यांचा मोबदला देण्यासंबंधी संबंधित अधिकाऱ्यांना आदेश देण्यात आले आहेत.

मुंबईतील मंत्रालयातील दालनामध्ये नुकत्याच झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीला महसूल विभागाचे मुख्य सचिव विकास खर्गे, सहा.सचिव मिलिंद म्हैसकर, ड.रितेश कुलकर्णी तसेच सोलापूरचे जिल्हाधिकारी व पुणे विभागीय आयुक्त हे व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे उपस्थित होते. या निर्णयामुळे सांगोला तालुक्यासह सोलापूर जिल्ह्यातील साधारणत: १२ ते १५ हजार लाभार्थी शेतकऱ्यांना याचा प्रत्यक्ष फायदा होणार आहे व बाधित शेतकऱ्यांची वर्षानुवर्षेची प्रतीक्षा संपणार आहे. या निर्णयामुळे दिपकआबा साळुंखे पाटील यांचे बाधित शेतकरी वर्गातून कौतुक होत आहे.



भूसंपादन होऊनही वर्षानुवर्षे मोबदला न मिळाल्याने शेतकरी वेठीस धरले गेले होते. हा केवळ आर्थिक नव्हे तर सामाजिक अन्याय होता. माझी ही आग्रही मागणी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सकारात्मकपणे मान्य केली आणि तातडीने निर्णय घेऊन ही प्रक्रिया पार पाडण्यासाठी स्वतंत्र लवाद नेमून तात्काळ वेळेत सुनावण्या घेऊन सक्षम अधिकाऱ्याची नेमणूक करून निर्धारित काळ मर्यादेमध्ये शेतकऱ्यांच्या खात्यावर लवकरात लवकर थेट मोबदला जमा करण्याच्या सूचना दिल्या. हा निर्णय म्हणजे शेतकऱ्यांच्या हक्कासाठी दिलेल्या लढ्याचे यश आहे.

\- माजी आ.दिपकआबा साळुंखे पाटील

## पिलीवच्या कोळी-कुंभार गल्लीत गटारीचे पाणी रस्त्यावर

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. ३ ऑगस्ट-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कोळी-कुंभार गल्लीतील गटार नादुरुस्त असल्याने गटारीतील घाण पाणी रस्त्यावर वाहत आहे. या भागात घाणीचे साम्राज्य पसरले असुन डासांचे प्रमाण वाढले आहे. यामुळे या भागातील नागरिक ,लहान मुले यांना डेंग्यू, मलेरीया यासारख्या रोगांचा प्रादुर्भाव होत आहे. तक्रार करूनही त्याकडे दुर्लल केले जात असल्याने संताप व्यक्त होत आहे.

**तक्रार करुनही बेदखल**

ग्रामपंचायतीवर गेल्या दोन वर्षापासुन प्रशासकीय राजवट आहे. यामुळे याठिकाणी नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. पिलीव येथील नागरिक या घाणीच्या सामा्ज्याला अक्षरशः वैतागले आहेत. याबाबत त्यांनी वरचेवर ग्रामपंचायतीचे ग्राम विकास अधिकारी तसेच प्रशासक यांच्याकडे वारंवार तक्रार करुनही कोणीही याची दखल घेत नाहीत. याबाबत सोमनाथ संजय मोरे व इतर नागरीक सुरज कस्तुरे ,रेखा घेरडे ,कमल कोळी ,नितीन कपने ,मल्हारी कोळी ,राजाराम कुंभार, नंदा कोळी ,ज्ञानेश्वर घेरडे आदी नागरिकांनी याबाबत पिलीव ग्रामपंचायतीचे प्रशासक व ग्राम विकास अधिकारी यांना रितसर निवेदन देऊन आठ दिवसाच्या आत या भागातील प्रश्न मार्गी न लावल्यास आपण ग्रामपंचायत समोरच आंदोलन करु असा इशारा दिला आहे.


खरेतर लोकशाही मध्ये गावातील किंवा प्रभागातील प्रश्न व समस्या सोडविणयासाठी लोकप्रतिनिधी आवश्यक आहेत .पण दुर्दैवाने याठिकाणी दोन वर्षापासुन प्रशासकीय राजवट असल्याने नागरिकांना प्रचंड अडचणीचा सामना करावा लागत आहे.

## महत्वाचे...

### सोलापूर रेल्वे स्थानकावर आग; प्रवाशांच्या प्रसंगावधानाने अनर्थ टळला

**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट -**

सोलापूर रेल्वे स्थानकावरील पार्सल विभागाच्या बाजूला असलेल्या मुख्य केबलला शनिवारी शॉट सर्किट मुळे आग लागली.



रेल्वे प्रशासनाने वेळी दखल घेतल्यामुळे पुढील अनर्थ टळला विभागीय रेल्वे व्यवस्थापक डॉ. सुजित मिश्रा यांनी लगेचच पाहणी केली. रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्म क्रमांक एक वरील भिंतीच्या वरून वीजपुरवठा करणारे मुख्य केबल आहे. पार्सल विभागाच्या बाजूला असलेल्या या केबल मधून दुपारी बारा वाजता धूर येण्यास सुरुवात झाली. त्यानंतर अचानक जाळ लागला हा प्रकार लक्षात येताच तेथून जाणाऱ्या प्रवाशांनी स्थानकावरील तिकीट तपासणी टीसी यांना कल्पना दिली. टीसीनी याची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिली. कर्मचाऱ्यांनी तात्काळ वीजपुरवठा होणाऱ्या केबलचे मुख्य बटन बंद केले, त्यानंतर तेथे असलेल्या अग्निशमन यंत्राने आगीवर मारा करून केबलला लागलेली आग विजवली. स्थानकावरील एक तास वीजपुरवठा बंद करण्यात आला होता. आग लागल्याची माहिती मिळतात लोहमार्ग पोलीस आणि अग्निशामक दलाच्या जवानांनी धाव घेत आठ ते दहा अग्निरोधकाच्या माध्यमातून ही आग विजवली. या घटनेत कोणतीही जीवित हानी झाली नसून प्लॅटफॉर्म क्रमांक एक वरील काही महत्वाची उपकरणे जळून खाक झाली आहेत.

### सांगोल्यात माजी सैनिकांसाठी डीबीटी महा. नोंदणीचे आयोजन

**सांगोला,दि.३ ऑगस्ट -**

दि.१३ ऑगस्ट रोजी स.११ वा. माजी सैनिक विश्रामगृह, सांगोला येथे डीबीटी-महा. अंतर्गत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर येथून कल्याण संघटक आप्पासाहेब कोडग येणार आहेत. तरी ज्या माजी सैनिक पेन्शनर, फॅमिली पेन्शनर यांनी रजिस्ट्रेशन केलेले नाही आणि ज्यांचे रजिस्ट्रेशन क्लॅरिफिकेशन नाही व रजिस्ट्रेशन करूनही त्याची एक कॉपी जिल्हा सैनिक कार्यालय, सोलापूर येथे जमा केलेली नाही आणि जे माजी सैनिक मृत्यू झालेले आहेत आणि त्यानंतर त्यांची फॅमिली (पत्नी) ही मृत्यू झालेली आहे, अशा कुटुंबियांनी त्यांचे जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय येथे नोंदणी केलेली नाही त्या कुटुंबीयांनी व नातेवाईकांनी आपले सर्व डॉक्युमेंट घेऊन उपस्थित राहावे. तसेच पेन्शन संबंधी, एज्युकेशन संबंधी आणि सैनिक कल्याणकारी अनेक योजना व सुविधांसंबंधी कुणाच्या काही अडीअडचणी असतील अशा तालुक्यातील माजी सैनिक पेन्शनर व फॅमिली पेन्शनरने वेळात वेळ काढून उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.



### नसिरभाई शेख मित्रमंडळातर्फे उपळाई (ठो) शाळा नंबर २ ला शैक्षणिक साहित्याचे वाटप

**बार्शी, दि.३ ऑगस्ट-**

तालुक्यातील उपळाई (ठो) येथील युवा उद्योजक व जे आर इलेक्ट्रिकसचे मालक नसिरभाई शेख यांनीआपल्या वाढदिवसानिमित्त प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नंबर २ उपळाई (ठो) येथील सर्व म्हणजे २७७ विध्यार्थ्यांना पॅड व पट्टी या उपयोगी शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. विध्यार्थ्यांना उपयोगी साहित्याचे वाटप करुन सामाजिक बांधिलकी जपल्याबद्दल नसिरभाई शेख व मित्रमंडळाचा शाळेच्यावतीने मुख्याध्यापक अनिल काळे यांनी सत्कार केला. यावेळी शाळेतील शिक्षक प्रभाकर काटे, रामचंद्र बरचे, आनंद घाडगे, हरिभाऊ दळवी, श्रीमती सुवर्णगौरी शिंदे,श्रीमती मीरा गरड, श्रीमती दिपाली गोरे, श्रीमती प्रिया गडदे इत्यादी शिक्षक तसेच नसिरभाई शेख मित्रमंडळाचे सदस्य, आण्णासाहेब लुंगसे, प्रशांत जामदार, दयानंद साबळे, अशोक ठोगे यांचेसह अनेक सदस्य उपस्थित होते.

# मंगळवेढ्यात एकाच दिवशी दोन भीषण अपघात; तिघांचा मृत्यू

### अन्य दोघे जखमी

### बैठकीस निघालेल्या सासू, सुनेचा या अपघातात बळी

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि.३ ऑगष्ट -**

मंगळवेढा शहराजवळील बायपास रोडवर दामाजी कारखाना चौकात उभ्या असलेल्या एका ट्रकला कांदा भरुन वेगाने आलेल्या ट्रकने पाठीमागून जोराची धडक देवून स्कूटीवरुन बैठकीसाठी निघालेल्या सासू,सुनेच्या अंगावर ट्रक पलटी होवून त्यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी अज्ञात ट्रक चालकाविरुध्द मंगळवेढा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला आहे. दरम्यान रविवार हा मंगळवेढ्याच्या दृष्टीने घातवार ठरला असून आज दोन विविध अपघात होवून त्यामध्ये तिघांचा जागीच मृत्यू तर अन्य दोघेजण जखमी झाले आहेत.

पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,दि.३ रोजी सकाळी ७.४५ वाजता मंगळवेढा शहराजवळील बायपास रोडवरुन दामाजीकारखाना चौका जवळून कर्नाटककडे कांदा भरुन निघालेला के.ए.०१ ए.६२९१



या ट्रकवरील अज्ञात चालकाने भरधाव वेगात येवून कारखाना चौकात रोडवर उभ्या असलेल्या एच.आर.३८ ए.सी.३६७२ या ट्रकवर जोरात आदळल्याने टीव्हीएस स्कूटी क्रमांक एम.एच.१३ बी.एम.३०८४ वरुन सार्वजनिक बांधकाम विभागातील सेवानिवृत्त कर्मचारी तथा सासूबाई शालिनी पांडुरंग तासगावकर (वय ५६) व सुनबाई रेणूका विजय तासगावकर (वय ३८) या सासू, सुना (रा.धर्मगाव रोड दुर्गामाता मंदिर) सकाळी ७.४५ वाजता डोके हॉस्पिटलजवळ बैठकीसाठी निघाल्या होत्या. पाठीमागून वेगाचे वाहन येत असल्याचे लक्षात येताच त्यांनी बाजूला गाडी घेवून थांबल्या होत्या. त्यावेळी कांद्याचा ट्रक दुसऱ्या ट्रकवर आदळल्याने तो पलटी होवून त्यांच्या अंगावर पडल्याने गंभीर जखमी होवून दोघींचे शरीर पुर्णपणे छिन्नविछीन्न होवून जागीच मयत झाल्याचे दिलेल्या फिर्यादीत विजय पांडुरंग तासगावकर यांनी म्हटले आहे. या प्रकरणी अज्ञात चालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




दुसऱ्या घटनेत मरवडे हद्दीतील हॉटेल सह्याद्री समोर यातील फिर्यादी गोपाळ सोलनकर (रा.शिरढोण ता.चडचण) यांचे चुलते तथा मयत दयानंद तुकाराम सलगर (वय ५३) हे मोटर सायकल क्रमांक एम.एच.१३ सी.आर.०२०५ वरुन शोभाबाई सलगर,जयश्री बंडगर यांना महूदकडे घेवून जात असताना समोरुन येणाऱ्या आयशर टेम्पो क्रमांक एम.एच.२० ई.एल.७६१० वरील अज्ञात चालकाने गाडीला धडक दिल्याने यामध्ये दयानंद सलगर हे गंभीर जखमी होवून मृत पावले तर शोभाबाई सलगर,जयश्री बंडगर यांना जखमी करणेस व मोटर सायकलचे नुकसान करणेस कारणीभूत ठरल्याने आयशर टेम्पोच्या अज्ञात चालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान या अपघातापुर्वी येथे अनेक अपघात झाले असून मरवडे ग्रामस्थांनी येथे गतीरोधक बसविण्याची मागणी केली आहे.

## 'जनसेवे'तर्फे १०० मुलींच्या नावे ५ हजारांची ठेव

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.३ ऑगस्ट -**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त महाराष्ट्र राज्य जनसेवा संघटना, माळशिरस तालुका लहुजी शक्ती सेना, लहुजी साम्राज्य अकलुज यांच्यावतीने १०० मुलींच्या नावे बँक ठेव पत्र, विद्यार्थ्यांना वह्या, नगरपरिषद महिला सफाई कर्मचाऱ्यांना साडी तर तालुक्यातील समाज बांधवांना अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यांचे वाटप करण्यात आले.

जनसेवा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ.धवलसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सम ाजपयोगी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी १०० मुलींच्या नावाने प्रत्येकी ५



हजार रु.बँक ठेवपत्र, विद्यार्थ्यांना ५ हजार वह्या, नगर परिषदेच्या सफाई महिला कर्मचारी यांना साडी, तालुक्यातील समाज बांधवांना जयंती साजरी करण्यासाठी अण्णाभाऊ साठे यांच्या २१ पुतळ्यांचे वितरण हृदयरोग तज्ञ डॉ.एम.के.इनामदार यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी माजी जि.प.सदस्य शरद मोरे, जनसेवेचे आण्णासाहेब इनाम दार, आण्णासाहेब शिंदे, सतिश पालकर, रणजितसिंह देशमुख, नवनाथ साठे, सुधीर रास्ते, मयुर म ाने, बबनराव शेंडगे, विठ्ठल इंगळे, अत्यंत लहान वयात उत्कृष्ठ असे अनेक सुबक शिल्प साकारणारे युवा पिढीचे आदर्श सुरज जगताप यांना युवा शिल्परत्न पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले.

## विवाहितेचा पैशांसाठी छळ, सासरच्या चौघांविरुद्ध गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि ३ ऑगस्ट -**

शहरातील एका विवाहित महिलेने आपल्या पतीसह सासरच्या चौघाविरुद्ध बार्शी पोलीस ठाण्यात मानसिक आणि शारीरिक छळ, तसेच आर्थिक अपहाराच्या गंभीर तक्रारी नोंदवल्या आहेत. पीडितेने सादर केलेल्या फिर्यादीत विवाहानंतर तिच्यावर परपुरुषांशी जबरदस्तीने संबंध ठेवण्याचा दबाव टाकल्याचा धक्कादायक आरोप करण्यात आला आहे. तक्रारीनुसार सासरे आणि विवाह जमवणारे नातेवाईक यांनी तिला व तिच्या कुटुंबियांना जिवे मारण्याची धमकी दिली. पती, सासू, सासरे आणि नणंद या चौघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## ॲड. गजशिव यांना बिझनेस ॲवार्ड

**बार्शी, दि. ३ ऑगस्ट-**

बार्शीचे ॲड.विवेक गजशिव यांना महाराष्ट्राची प्रसिद्ध अभिनेत्री प्राजक्ता माळी यांच्या हस्ते नाशिक येथे रिसिल डॉट इन या संथेकडून विझिनरी बिझनेस लिडर ऑफ द इअर' या महाराष्ट्र ॲवार्डने सन्मानित करण्यात आले.

यावेळी ॲड. गजशिव यांनी गरीब परिस्थितून केलेला प्रवास आणि व्यवसायातून केलेली प्रगती यामुळे हा राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात आला. व्यवसायात प्रिन्स क्रिएटिव बिझनेस ग्रुपला हा मिळालेला पहिलाच पुरस्कार असल्याचे गजशिव यांनी सांगितले. यापूर्वी सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना कोलंबो विद्यापीठाकडून डॉक्टरेट पदवी बहाल करण्यात आली आहे. शिवाय राज्यस्तरीय



डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार, मानवतावादी बहुउद्देशीय मंडळ संचलित राज्यस्तरीय राजमाता जिजाऊ-क्रांती ज्योती समाजभूषण पुरस्कार, राज्यस्तरीय वीर शिवछत्रपती महाराष्ट्ररत्न पुरस्कार, राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार, आंबेडकरी योद्धा पुरस्कार, राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार, भिमयोद्धा पुरस्कार, बार्शी युथ आयकॉन पुरस्कार अशा विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

## एकता महिला मंचतर्फे श्रावणसरी 'जल्लोष मैत्रिणींचा' कार्यक्रम उत्साहात




**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि. ३ ऑगस्ट-**

श्री गुरुकुल वेदाश्री पर्यटन स्थळ रामलिंग येडशी येथे एकता महिला मंचच्या वतीने श्रावण सरी २०२५ जल्लोष मैत्रिणींचा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी क्रांतिज्योती सावित्रीबाई यांच्या प्रतिमेचे पूजन डॉ. ओमप्रकाश शेटे अध्यक्ष आयुष्म ान भारत मिशन महाराष्ट्र समिती यांच्या व अन्य मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले त्यानंतर उपस्थित मान्यवरांचा सत्कार व सन्मान एकता महिला मंचच्या वतीने करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे डॉ. ओमप्रकाश शेटे बोलताना म्हणाले की,एकता म हिला मंचच्या माध्यमातून श्रावणसरी हा कार्यक्रम महिलांसाठी आयोजित केला. यामध्ये महिलांनी फेर धरले, फुगड्या खेळल्या, झोका खेळळ्या, पथनाट्य केली, एकपात्री नाटकं केली,भारुड रचली तसेच अन्य विविध प्रकारच्या उपक्रम राबवून महिलांनी श्रावणसरी २०२५ जल्लोष मैत्रिणींचा हा कार्यक्रम साजरा केला. यावेळी कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती डॉ. ओम प्रकाश शेटे आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समिती, डॉ सोनिया प्रशांत पवार (सरपंच), मकरंद पाटील, तसेच एकता महिला मंचचे प्रभाकर क्षीरसागर, शालन दसवंत लक्ष्मी सुतार,प्रभावती साबळे, भाग्यश्री पावले, प्रमिला जाधव, इरशाद शेख,पल्लवी भालेराव, सुशीला सोनवणे, सविता गायकवाड, नुरजहा शेख, वंदना घोडके, तेजश्री घेमाड, जास्मिन शेख, सीना भोसले,मैना भोसले, स्वाती शिंदे,शीतल पाटील,स्वाती चौधरी,राणी पाटील, सोनाली भराटे,सत्यभामा माळी,स्वाती सातपुते,प्रमिला जगदाळे,तारामती काळदाते,पूजा मोहिते, स्वाती चव्हाण, सीमा चव्हाण, गीता लंगोटे,सारिका सुतार,पूजा भोसले,पूजा दराडे,प्रगती गोफन,राधा नाईकवाडी व एकता महिला मंच बार्शी तालुक्यातील सदस्य यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. सूत्रसंचालन व प्रास्ताविक व आभार शीतल सुरवसे यांनी केले

## बार्शीत घरातून ५० हजारांचा ऐवज लंपास

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ३ऑगस्ट-**

शहरातील मंगळवार पेठ, टेकडी परिसरात एका सेवानिवृत्त व्यक्तीच्या घरात मध्यरात्री घडलेल्या चोरीच्या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. चोरट्याने घराचा दरवाजा उघडून घरात प्रवेश करत तब्बल ५० हजार रुपयांचे दागिने व रोख रक्कम चोरून नेल्याची घटना घडली आहे.

याप्रकरणी गुंडु महेबूब शेख (वय-७०, रा. मंगळवार पेठ, टेकडी, बार्शी) यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. फिर्यादीत म्हटले की, मी व माझी पत्नी सकीना एकत्र राहतो. घर पत्रा शेडचे असून, मी ३० जुलै रोजी रात्री ११ वाजता जेवण करुन आम्ही झोपलो. मात्र रात्री ३ वाजण्याच्या सुमारास पत्नी लघुशंकेसाठी उठली असता दरवाजा उघडा दिसला व घरातील कपडे, भांडी अस्ताव्यस्त दिसले. तिने मला उठवले असता चोरी लक्षात आली. शेख यांनी सांगितले की, घरातील आतल्या खोलीतील पत्र्याची पेटी, ज्यामध्ये ७ हजार रोख रक्कम, मनीमंगळसूत्र (२० मण्यांचे) व चांदीचे पैंजण होते, ती गायब होती. पेटीसह संपूर्ण ऐवज चोरीस गेला असून, एकूण अंदाजे ५० हजार रुपयांचा ऐवज चोरट्यांनी लंपास केला आहे.

## पांगरी येथे भक्ती व पर्यटनाचा अनोखा संगम श्री निलकंठेश्वर मंदिर

**तभा वृत्तसेवा । रामदास पवार**
**वैराग, दि. ३ ऑगस्ट-**

बालाघाटच्या कुशीत वसलेले व प्रभु रामचंद्राच्या भक्तीसाठी स्वयंभू प्रकट झालेले श्री निलकंठेश्वराचे हे पवित्र स्थान म्हणजे भक्तांसाठी श्रावणातील भक्तीमयपर्वणीच असते. बार्शी तालुक्यातील पांगरीपासुन पुणे-लातुर राज्यमार्गावर २ किलोमीटर अंतरावर बालाघाटाच्या पर्वतरांगाच्या पायथ्याला स्वयंभु श्री.निलकंठेश्वराच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी वाढत आहे. निसर्गाच्या सानिध्यात व श्री प्रभु रामचंद्रांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या ह्या मंदिरात भाविकांना पर्यटन आणि भक्ति असा दुहेरी लाभ मिळतो.त्यामुळे भक्तांसह शालेय सहलींसाठी विद्यार्थ्यांची निलकंठेश्वर



**श्रावण विशेष**

पहिली पसंती ठरत आहे.

हे निलकंठेश्वराचे मंदिर हेमाडपंथी असुन हे प्रचंड व अखंड शिलांनी बनवलेले आहे.सुमारे ३१ वर्षापुर्वी राजस्थानी कलाकारांकडुन या शिलामंदिरास सुबक कलाकतींनी सजवण्यात आले आहे.या मंदिराच्या वैभवात प्रत्येकवर्षी भर पडत आहे. पुरातन काळात हा भाग दंडकारण्य म्हणुन ओळखला जात असे अशी आख्यायिका सांगितली जाते. रावणाने मायावी हरणाच्या रूपात येऊन सीतेचे अपहरण करून पळवल्यानंतर प्रभु रामचंद्र सीतेचा शोध घेत घेत दंडकारण्यात फिरत फिरत या ठिकाणी आले होते.येथील निसर्गरम्य व नयनरम्य सौंदर्याने प्रभु श्रीरामांना मोहिनी घातली. या वातावरणामुळे प्रभु रामचंद्रांची शिव पुजा करण्याची इच्छा झाली.त्याच क्षणी पृथ्वीच्या उदरामधुन शिवलिंग प्रकट झाले, यामुळे या स्थानास स्वयंभु निलकंठेश्वर असे नांव पडले अशी अख्यायिका सांगितली जाते.मंदिराच्या ऊत्तरेस उंच डोगर असुन डोगरावर नंदी आहे तो नंदी प्रत्येकवर्षी फक्त गहुभरच शिवलिंगाच्या दिशेने पुढे सरकतो ज्यावेळी नंदीदेव निलकंठेश्वरांच्या मंदिरात पोहोचेल तेव्हा जगबुडी होऊन सर्व जग पाण्याखाली येईल अशीही आख्यायिका येथील नंदीसंदर्भात अनेक वर्षांपासुन बुजुर्गांम धुन सांगितली जाते.निलकंठेश्वर मंदिरामधील मुख्य लिंगावर एक छिद्र असुन त्यातुन सतत पिंडावर पाणी पाझरत असते.भाविकांत जागृत स्थान म्हणुन ख्याती पसरली आहे.मंदिराच्या समोरूनच पुणे लातुर राज्य मार्ग गेला असुन मंदिरासमोरूनच निलकंठा नदी वाहत असुन या मुळे तर मंदिराच्या सौदर्यात अधिकच भर पडली आहे . मंदिर सर्व बाजुंनी झाडांनी वेढलेले आहे.तसेच सगळीकडे हिरवाईची चादर पसरलेल्या डोंगरावर मंदिर असल्यामुळे मंदिरात जाताना मन प्रसन्न होऊन जाते.मंदिराच्या दक्षिण दिशेला मूख्य प्रवेशदार असुन तेथे भाविकाच्या खर्चातुन दिव्यभव्य असे प्रवेशदार बांधण्यात आले आहे.मंदिरात महाशिवरात्रीस अखंड हरिनाम सप्ताह ,दसरा,गुढी पाडव्याला तसेच प्रत्येक महिन्याच्या पौणिमेला मोठी यात्रा भरते. श्रावण महिन्यात व प्रत्येक सोमवारी पुजाअर्चा किर्तन हरिजागर आदी कार्यक्रम होतात.






**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## पत्नी नांदण्यास येत नसल्याने तरुणाने घेतला गळफास

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट -**

पत्नी नांदण्यास येत नसल्याने तरूणाने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना रविवारी सकाळी आठच्या सुमारास उघडकीस आली. अमर लहू मुळे (वय ३५, रा. नान्नज, ता. उत्तर सोलापूर) असे आत्महत्या करण्यात आलेल्या तरूणाचे नाव आहे.अमर मुळे याची पत्नी गेल्या काही दिवसापासून माहेरी गेली होती.

ती परत सासरी नांदण्यास यावी म्हणून अमर याने वारंवार पत्नीला सांगितले होते. तरीही पत्नी नांदण्यास येत नव्हती. त्याच रागाच्या भरात अमर याने रविवारी सकाळी आठच्या पूर्वी वांगी तांडा येथील जंगलात लिंबाच्या झाडाला काळ्या रंगाच्या दोरीने गळफास घेतला. ही बाब अमरच्या नातेवाईकांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी अमर यास गळफासातून सोडवून बेशुध्दावस्थेत उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. राजेंद्र सैनी यांनी अमर यास मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### ▶▶ महत्वाचे...

### देवस्थानाच्या वादातून चाकूने वार

**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

पानमंगरूळ (ता. अक्कलकोट) येथे देवस्थानाच्या वादातून एकावर चाकू व तलवारीने वार करून जखमी करण्यात आले. सुभाष बाळप्पा बिराजदार (वय ५५, रा. म्हैसलगी, ता. अक्कलकोट) असे जखमीचे नाव आहे. २ ऑगस्ट रोजी नऊच्या सुमारास सुभाष बिराजदार हे पानमंगरूळ रोडवर असताना देवस्थानच्या वादातून बसवराज कलप्पा हंद्राळ व इतर ५ जणांनी मिळून चाकू व तलवारीने मारहाण केली. यामध्ये बिराजदार यांच्या दोन्ही पायास जबर मार लागल्याने उपचारासाठी त्यांना सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### शेतीच्या वादातून झालेल्या मारहाणीत दोघे जखमी

**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

आचेगाव (ता. दक्षिण सोलापूर) येथे शेतीच्या वादातून झालेल्या मारहाणीत दोघे जखमी झाले. सिकंदर गफूरसो करनाचे (वय ४५), गफूर मौला करनाचे (वय ६५, रा. आचेगाव) अशी जखम ींची नावे आहेत. २ ऑगस्ट रोजी रात्री हंजगी गावात शेतीच्या रस्त्याच्या वादातून सद्दाम मुल्ला व समीर शेख यांनी त्यांच्या ५ साथीदारांसह मिळून करनाचे यांना काठीने, कोयत्याने, बीअरच्या बाटलीने, लाथाबुक्क्याने मारहाण केली. या म ारहाणीत करनाचे हे दोघे जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### शेटफळ येथे वृध्दास मारहाण

**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

शेतीच्या वादातून शेटफळ येथे वृध्दास म ारहाण करण्यात आली. चांगदेव चंद्रकांत खडके (वय ६०, रा. शेटफळ, ता. मोहोळ) असे जखमी वृध्दाचे नाव आहे. २ ऑगस्ट रोजी रात्री शेटफळ चौकातील दुध डेअरीसमोर शेतीतील वादातून उत्तरेश्वर पांडुरंग खडके, सुमित उत्तरेश्वर खडके यांनी चांगदेव खडके यांना प्लास्टिक पाईप व लाथाबुक्क्याने मारहाण केली. यामध्ये चांगदेव खडके हे जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### गोविंद पर्व कारखाना राणा शिपिंग कंपनीकडे सुपूर्त

जिल्ह्यातील, करमाळा - राजुरी येथील गोविंद पर्व कारखाना अखेर राणा शिपिंग कंपनीकडे अधिकृतरीत्या सुपूर्त करण्यात आला आहे. ज्यामुळे स्थानिक रोजगार निर्मिती आणि औद्योगिक मूल्यवर्धनाला चालना मिळण्याची अपेक्षा आहे. हा कारखाना सेवानिवृत्त शिक्षक, आदिनाथ साखर कारखान्याचे माजी संचालक लालासाहेब जगताप यांनी जिल्हा बँकेकडून कर्ज घेऊन सुरू केला होता. मात्र तांत्रिक अडचणींबरोबरच चुकीच्या व्यवस्थापनामुळे हा कारखाना बंद पडला आणि जिल्हा मध्यवर्ती बँकेचे कोट्यवधी रुपये थकीत राहिले होते. कर्जवसुलीसाठी जिल्हा बँकेने राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाच्या (एनसीएल टी) मुंबई खंडपीठात याचिका दाखल केली होती. निकाल बँकेच्या बाजूने लागल्यावर रिझोल्यूशन प्रोफेशनलची नियुक्ती करण्यात आली. गेल्या आठ महिन्यांपासून सुरू असलेल्या कायदेशीर प्रक्रियेनंतर राणा शिपिंग कंपनीने निविदा रक्कम भरून कारखाना विकत घेतला. सर्व तांत्रिक आणि प्रशासकीय अडचणी दूर केल्यानंतर सर्व कागदपत्रांसह कारखान्याचा ताबा १७ जुलै २०२५ रोजी राणा शिपिंगकडे हस्तांतरित करण्यात आला.

# साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त शानदार मिरवणूक

- विविध आकर्षक देखाव्याच्या माध्यमातून दिला सामाजिक संदेश
- सुमारे ५५ मंडळांचा सहभाग; डॉल्बीच्या तालावर थिरकली तरुणाई






**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

उत्साह पूर्ण वातावरणात जयघोष करत साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंती महोत्सवाची दिमाखदार मिरवणुकीने सांगता करण्यात आली. महापुरुषांच्या जीवन कार्यावर आधारित आकर्षक अशा प्रबोधनात्मक देखाव्याच्या माध्यमातून सामाजिक संदेश देण्यात आला. डॉल्बीच्या तालावर तरुणाई थिरकली. उत्साहाला उधाण आल्याचे दिसून आले.

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंती महोत्सवास गुरुवार दि. १ ऑगस्ट रोजी सार्वजनिक मंडळांच्या वतीने प्रतिमेची मनोभावे प्रतिष्ठापना करून प्रारंभ करण्यात आला होता. त्यानंतर आज रविवारी दि. ३ ऑगस्ट २०२५ रोजी उत्साह पूर्ण वातावरणात शानदार मिरवणुकीने या महोत्सवाची सांगता करण्यात आली. यंदा मिरवणुकीसाठी रात्री बारा वाजेपर्यंतची परवानगी देण्यात आली. मध्यवर्ती जयंती महोत्सव समितीच्या वतीने या निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. येथील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन करून या मिरवणुकीची सुरुवात रविवारी दुपारी दोन वाजता करण्यात आली. मध्यवर्ती जयंती महोत्सव समितीच्या मार्गदर्शनाखाली ही भव्य मिरवणूक पार पडली. सुमारे ५५ मंडळांनी या मिरवणुकीत सहभाग नोंदविला.यावेळी प्रमुख अधिकारी आणि पदाधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती. या मिरवणुकीत विविध सामाजिक संदेश देणारे देखावे सादर करण्यात आले होते. याप्रसंगी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यासाठी समाज बांधव, विविध सामाजिक संस्था, संघटना व पक्ष पदाधिकाऱ्यांची मोठी गर्दी झाली होती.दरम्यान, विविध मंडळाच्या वतीने साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे, वस्ताद लहुजी साळवे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार कार्याचे प्रबोधनात्मक देखावे साकारण्यात आले होते. या मिरवणुकीत साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन कार्यावर आधारित भव्य दिव्य विविध देखावे सादर करण्यात आले होते. डॉल्बीच्या चित्त थरारक व कलरफुल विद्युत रोषणाईत तरुणाईने विविध गीतावर ठेका धरला. बुधवार पेठ, मातंग वस्ती, वीर फकीरा चौक, जुना बोरामणी नाका, लष्कर, विजापूर नाका, देगाव, पांढरी वस्ती, अशोक चौक, फॉरेस्ट यासह विविध परिसरातील मंडळांनी सहभाग नोंदविला. ही मिरवणूक साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक मार्गे, रामलाल चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, चार हुतात्मा पुतळा, मेकॅनिकी चौक मार्गे छत्रपती शिवाजी चौक येथे या मिरवणुकीची सांगता झाली.

या मिरवणुकीत साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे मध्यवर्ती जयंती महोत्सव समितीचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी मंत्री उत्तमप्रकाश खंदारे, महोत्सव समितीचे अध्यक्ष शांतीलाल साबळे, सुरेश पाटोळे, गोविंद कांबळे, विशाल लोंढे, महादेव भोसले, माजी गट नेते आनंद चंदनशिवे, युवराज पवार, महेश लोंढे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### या मंडळांनी घेतला मिरवणुकीत सहभाग

या मिरवणुकीत बिल्डर युवा प्रतिष्ठान : अण्णाभाऊंना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देण्यात यावा अशा मागणीचा देखावा लक्षवेधक होता. कै. शरद भोसले सामाजिक संस्था : सोलापूर विमानतळाला साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे असे नाव देण्याची मागणीचा तर यू.के. मित्र परिवार. संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील अण्णाभाऊंच्या योगदानाचा देखावा सादर केला. डी. कंपनी मंडळ : उठ मातंगा जागा हो.. घे हाती क्रांतीची मशाल, जी. के सामजिक संस्था – श्री सिद्धरामेश्वर महाराजांच्या यात्रेत मातंग समाज सात नंदीध्वजांपैकी सहावी व सातवी काठी घेऊन, ऐक्य व श्रद्धेचे दर्शन, आर.सी ग्रुप : बाबासाहेबांच्या झुंजार लेखणीस फकीरा अर्पण करताना देखावा, मीएन.पी. सामाजिक संस्था बुद्धाची शपथ या कथेचा संदर्भ देत तथागत गौतम बुद्ध यांना अण्णाभाऊंनी केलेल्या वंदनाचा देखावा, –एस.एफ. फाउंडेशनचा सातारा येथील रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी महाविद्यालयात अण्णाभाऊंनी दिलेल्या कला वाद आणि जीवन वाद या व्याख्यानाचा देखावा, एम.जे. युवा प्रतिष्ठान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि अण्णाभाऊ साठे यांचे उच्चार यांची सांगड घालून, खुर्चीवर बसलेले आणि हातात फकिरा हे पुस्तक असलेले अण्णाभाऊंचा देखावा सादर केला होता. तसेच इतर मंडळांनी लक्षवेधक देखावे सादर केले होते.

### सहभागी मंडळाचा सत्कार

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे मध्यवर्ती जयंती महोत्सव समिती आणि क्रांतिवीर लहुजी शक्ती सेना आणि इतर संघटनांच्या वतीने या मिरवणुकीत सहभागी झालेल्या मंडळाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

## श्रावण शनिवारी गौडगाव मारुती मंदिरात गर्दी



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.३ ऑगस्ट-**

गौडगांव बु। येथील श्रीक्षेत्र दक्षिणमुखी श्री जागृत मारुतीचे दर्शन घेण्यासाठी श्रावणमासच्या दुसऱ्या शनिवारी सकाळपासूनच भाविक भक्तांनी 'जय बजरंग बली' व 'मारुतीचा जय जयकारचा गजर करीत गर्दी केली होती.

शनिवार व मंगळवार पहाटे ५ वाजता रुद्राभिषेक, होमहवन व शनिपूजासह अशा विविध धार्मिक विधी पार पडले. भक्तांनी मोठी गर्दी केली होती. दिवसभरात हजारो भाविक भक्तांनी श्री चे दर्शन घेतले. दुपारच्या आरतीचा मान बार्शीचे वल्लभ सोमाणे यांना मिळाला. तर श्री जागृत मारुती अन्नछत्र मंडळात कुंभारी (ता.द. सोलापूर) येथील किरण कुलकर्णी यांच्याकडून महाप्रसाद देण्यात आला. महाराष्ट्र, कर्नाटक,आध्रप्रदेशातून आलेल्या भाविक भक्तांनी महाप्रसाद घेतला. यावेळी मंदिर समितीचे अध्यक्ष श्रीकांत खानापुरे, सचिव सिद्राम वाघम ोडे, प्रकाश मेंथे, चौडप्पा सोलापुरे, बिराप्पा पुजारी, शांतया स्वामी, परमेश्वर सुतार, प्रकाश सनकळ, भारत ननावरे, श्रीशैल कुंभार, आमसिद्ध कोरे, श्रीमंत सवळतोट, श्रीमंत म्हेत्रे, मल्लिनाथ मेंत्रे आदींनी परिश्रम घेतले.

## रेल्वेखाली सापडून वृध्दाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

कंबर तलावाजवळ रेल्वे गाडीखाली सापडून वृध्दाचा मृत्यू झाला.

रमेश भगवान वाघमारे (वय ७२, रा. आंबेडकर शाळेच्या मागे, फॉरेस्ट, रेल्वे लाईन, सोलापूर) असे मरण पावलेल्या वृध्दाचे नाव आहे. २ ऑगस्ट रोजी रात्री दहाच्या सुमारास कंबर तलावाजवळ रेल्वे ट्रॅक अपलाईन किमी क्र. ४५७/११ जवळ रमेश वाघमारे हे जखमी अवस्थेत मिळून आले. कोणत्या तरी रेल्वे गाडीच्या धडकेने वाघमारे हे जखमी झाले- ले मिळून आल्याने सदर बझार पोलिस ठाण्यातील पोलिस हवालदार आर एन मनोहर यांनी वाघमारे यांस शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. प्रतिक माने यांनी वाघमारे यांस मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.



## वीजेचा धक्का लागून दोघांचा मृत्यू

### रविवारी सकाळी ११ ची सुनिलनगर येथील घटना





**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट -**

शहरातील अक्कलकोट रोड एमआयडीसी परिसरातील सुनिल नगरात घराच्या गच्चीवरील जाहिरातीचा बोर्ड काढून बाजूला ठेवत असताना सर्व्हिस वायरच्या विजेचा धक्का लागून दोघांचा मृत्यू झाला.

ही घटना रविवारी सकाळी ११ च्या सुमारास घडली. चंद्रशेखर नारायण दोंतूल (वय ४२, रा. विठ्ठल नगर, एमआयडीसी, सोलापूर) आणि गंगाधर ताटी (वय ४०, रा. सुनिल नगर, एमआयडीसी, सोलापूर) अशी मरण पावलेल्यांची नावे आहेत.

सुनिल नगर येथील अशोक पोगूल यांच्या घराच्या गच्चीवर जाहिरातीचा बोर्ड लावण्यात आला होता. रविवारी सकाळी ११ च्या सुमारास चंद्रशेखर दोंतूल व गंगाधर ताटी हे दोघे पोगुल यांच्या घराच्या गच्चीवर असलेला जाहिरातीचा बोर्ड काढत होते. त्यावेळी विद्युत मंडळाच्या सर्व्हिस वायरच्या वीजेचा धक्का या दोघांच्या हाताला लागल्याने त्यामध्ये शॉक लागून दोघेही गच्चीवर पडून बेशुध्द झाले. त्यामुळे दोघांना नागरीकांनी बेशुध्दावस्थेत उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. यावेळी डॉ. ओंकार तलकोक्कूल यांनी दोघांनाही मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## प्रिसिजन वाचन अभियानाचं मॉडेल महाराष्ट्रभर राबवणार

▸ डॉ. किरण कुलकर्णी यांचा निर्धार




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

सचिव पातळीवरील अधिकारी एखाद्या साहित्यिक कार्यक्रमाला उपस्थित राहतात, हे विरळाचं, पण असे घडले सोलापुरात . प्रिसिजन वाचन अभियानाच्या निमित्ताने डॉ. किरण कुलकर्णी या कर्तव्यनिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्याने केवळ उपस्थितीच नाही, तर साहित्य आणि भाषेविषयीची जाणिव आणि बांधिलकी स्पष्टपणे मांडली.

एखादा शासकीय अधिकारी कवी किंवा साहित्यिक असू नये का? हा प्रश्न उपस्थित करत त्यांनी ठामपणे सांगितले की, अशा अधिकाऱ्यांची संख्या कमी आहे, ही आपल्या समाजाची उणीव आहे. सोलापूरमध्ये सुरु असलेला प्रिसिजन वाचन अभियान हा कार्यक्रम केवळ सोलापुरापुरता मर्यादित न ठेवता संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचवावा, यासाठी मी स्वतः येथे आलोय, असे त्यांनी आवर्जून सांगितले. हे अभियान अभ्यासपूर्ण पद्धतीने संपूर्ण महाराष्ट्रात सादर करता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मराठी भाषेच्या प्रगतीसाठी आणि टिकवण्यासाठी त्यांनी महत्त्वाचे मुद्दे मांडले. मराठी ही केवळ राज्यभाषा नाही, तर अभिजात भाषा आहे. जगभरातील ७४ देशांमध्ये मराठी भाषिक आहेत आणि १७ देशांमध्ये मराठी भाषेच्या संवर्धनासाठी अनेक योजना चालू आहेत. भाषेचं जतन आणि संवर्धन हे प्रत्येक भाषाप्रेमीचं कर्तव्य आहे, असं त्यांनी सांगितलं. केंद्र सरकारच्या भाषिणी ॲपचा उल्लेख करत, त्यांनी जुन्या शब्दसंपत्तीच्या संवर्धनावर भर दिला. दिवाळी अंक १९०९ पासून सुरू आहेत, विश्वकोश हा मराठी भाषेचा मानबिंदू आहे. ही परंपरा जपणं आवश्यक आहे, असंही त्यांनी नमूद केलं.

सोलापूर हे फक्त चादरीचं नव्हे, तर वाचणाऱ्यांचे गाव व्हावं, असा प्रेरणादायी संदेश युनिक फिचर्सचे संचालक आनंद अवधानी यांनी केलं. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. किरण कुलकर्णी आणि युनिक फिचर्सचे प्रकाशक आनंद अवधानी यांचा डॉ. सुहासिनी शहा यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचं सुत्रसंचालन आणि आभारप्रदर्शन माधव देशपांडे यांनी केलं. या कार्यक्रमासाठी सोलापुरातील साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Precision PRINTS
सस्नेह निमंत्रण
४१वा वर्धापन दिन...
सन्माननीय वाचक

सप्रेम नमस्कार,
गेली ४१ वर्षे 'सोलापूर तरुण भारतने' सोलापूर जिल्ह्यासह मराठवाडा, प.महाराष्ट्र तसेच कर्नाटकात आपल्या राष्ट्रीय विचारांचा ठसा उमटविला आहे.
वाचक, हितचिंतक व जाहिरातदार यांच्यामुळेच हे साध्य झाले आहे.
मराठवाडा, सोलापूर तसेच नागपूर, मुंबई, पुणे, जळगाव येथेही तरुण भारतच्या माध्यमातून राष्ट्रीय विचार पोहचवित आहोत.
अत्याधुनिक तंत्रज्ञानासह 'प्रिसिजन प्रिंटस्‌ने' कमर्शिअल प्रिंटींग क्षेत्रात आपला ठसा उमटविला आहे.
दै. सोलापूर तरुण भारत, प्रिसिजन प्रिंटस् आदिंचा

॥ वर्धापन दिन ॥

आपले स्नेहांकित
सोलापूर तरुण भारत मिडिया लिमिटेड
श्री. दिलीप यशवंत पेठे (मुख्य समूह संपादक) | श्री. विवेक घळसासी (अध्यक्ष) | श्री. प्रशांत माने (मुख्य संपादक)
संचालक मंडळ, तरुण भारत व प्रिसिजन प्रिंटस् परिवार

✻ स्थळ ✻
बुधवार दि. ६ ऑगस्ट २०२५, सायं. ६ ते ९ पर्यंत
दि सोलापूर इंडस्ट्रियल को-ऑप. इस्टेट सोसायटी फंक्शन हॉल, तरुण भारत प्रेसच्या मागे, होटगी रोड, सोलापूर.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# श्रीमद्भागवत कथा-चित्तशुध्दीचे साधन : हभप डॉ. जयवंत बोधले महाराज

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ३ ऑगस्ट-**

श्रीमद्भागवत कथा हे चित्तशुद्धीचे, तसेच पापविनाशाचे एक अत्यंत प्रभावी आणि दिव्य माध्यम आहे. मात्र, या पावन कथेचा लाभ केवळ श्रवणानेच पूर्ण होत नाही, तर श्रवणाबरोबर मननदेखील तितकेच आवश्यक आहे, असे स्पष्ट मार्गदर्शन श्रीगुरु डॉ. जयवंत महाराज बोधले यांनी आज श्रावणमास प्रवचनमालेच्या नवव्या सत्रात दिले. कलियुगात चित्तशुद्धीच्या हेतूसाठी भागवत कथेव्यतिरिक्त दुसरा कोणताही पर्याय नाही. चित्त शुद्ध झाले की ज्ञानप्राप्ती होते आणि त्या ज्ञानातूनच मोक्षसिद्धी प्राप्त होते. 'चित्त' या शब्दामध्ये असलेले 'चित' हेच खरे चैतन्य, परमात्मतत्त्व दर्शवते. परंतु, जेव्हा या 'चित' मध्ये अपूर्ण 'त' जोडले जाते, तेव्हा ते 'चित्त' म्हणजेच 'संसार' बनते आणि संसार म्हणजेच बंधन व दुःख. या दुःखमूलक संसारातून मुक्ती हवी असेल, तर चित्तशुद्धी करणे आवश्यक ठरते आणि ती श्रीमद्भागवत कथेमुळेच साध्य होते, असे डॉ. महाराज तात्त्विक भाष्याच्या माध्यमातून विशद करतात.


श्रावणमास प्रवचनमाला
भाग - ९

भागवत कथेचा प्रभाव जीवनावर अत्यंत मंगलकारी असतो. ती ऐकल्याने जीवन प्रसन्न, पवित्र आणि रोगमुक्त होते. श्रद्धेने कथा श्रवण केल्यास अंतःकरणातील सर्व दोष आपोआप नष्ट होतात. याच भागवत कथेच्या अनुक्रमात सनतकुमारांनी नारदांना आत्मदेव व गोकर्ण यांची पवित्र कथा सांगितली आहे. तुंगभद्रेच्या तीरी 'उत्तम' नावाच्या गावात 'आत्मदेव' नावाचा एक निष्ठावान ब्राह्मण वास करत होता. तो धर्मनिष्ठ, कर्मशील होता. परंतु, त्याची पत्नी 'धुंधुली' ही व्रात्य, वाणीने कठोर, निंदक, भांडखोर व कृपण स्वभावाची होती. संतान न मिळाल्यामुळे आत्मदेव दुःखी होता. त्यासाठी त्याने विविध व्रते, उपासना केली. एका महात्म्याच्या कृपेने त्याला संततीप्राप्तीचा दिव्य प्रसाद मिळाला. पण धुंधुलीने त्या प्रसादाचे महत्त्व न समजता तो गायीला खाऊ घातला आणि आपल्या बहिणीचा मुलगा स्वतःचा म्हणून स्वीकारला. त्या मुलाचे नाव 'धुंधुकारी' ठेवण्यात आले. दुसरीकडे, गायीच्या पोटातून जन्मलेला बालक - ज्याची कानं गायीसारखी होती. त्याचे नाव 'गोकर्ण' ठेवण्यात आले. गोकर्ण हा ज्ञानी, सदाचारी, पांडित्यसंपन्न होता तर धुंधुकारी हा दुराचारी व असंयमी निघाला. धुंधुकारीच्या दुष्कृत्यांमुळे वैतागून आत्मदेव अरण्यवासाला निघून जातो. त्याठिकाणी गोकर्ण आपल्या वडिलांना उपदेश देतो - बाबा, या असार संसारात गुंतून काही लाभ नाही. हा त्रिगुणमय संसार दुःखाचे मूळ आहे. 'मी देह आहे' असा मोह टाकून द्यावा. हे शरीर म्हणजे व्याधींचे भांडार आहे. प्रत्येक इंद्रिय मर्यादित आहे. म्हणून, ममत्वाचा त्याग करुन वैराग्याचा स्वीकार करावा. लोकिक धर्मापेक्षा आत्मकल्याण करणाऱ्या शाश्वत धर्माचा आश्रय घ्यावा. संतसेवा करावी, भगवद्भक्ती करावी आणि नित्य भागवताचे श्रवण करावे. गोकर्णाचा हा उपदेश अत्यंत तात्त्विक असून, धर्माचे जीवनातील स्थान अधोरेखित करणारा आहे, असे प्रतिपादन डॉ. जयवंत महाराज करतात. धर्म म्हणजे केवळ उच्चार करण्याचा विषय नाही; तो आचरणात उतरवावा लागतो. हेच जीवनाचे खरे सार आहे. पुढे, धुंधुकारीलाही गोकर्णाने सांगितलेली भागवत कथा ऐकून मुक्ति प्राप्त होते, अशी रसगर्भ आणि अध्यात्मपूर्ण कथा डॉ. जयवंत महाराज रसाळ शैलीत सांगतात. या गोष्टीच्या माध्यमातून, भागवत कथा केवळ श्रवणापुरती न ठेवता तिचे चिंतन, मनन किती आवश्यक आहे, हे महाराज अत्यंत मार्मिक रीतीने उलगडून सांगतात.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : सोमवार | दिनविशेष - |
| दि. ४ ऑगस्ट २०२५ | श्रावणी सोमवार |
| विक्रम संवत् २०८२ | शिवामूठ - तीळ |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - श्रावण | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. दशमी (११.४१) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वर्षा | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - अनुराधा (०९.११) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - ब्रह्म (०७.०३) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - गर (११.४१) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : अपेक्षित मित्रांची मदत मिळेल. भावनेपेक्षा कर्तव्य महत्त्वाचे ठरेल. प्रवासाचा योग संभवतो.

**वृषभ** : जास्त ताण घेऊ नका. अभ्यासाचा बाऊ न न करता विद्यार्थ्यांनी अभ्यास करावा.

**मिथुन** : मनाचा दाखविलेला मोठेपणा नातेसंबंधातील तेढ कमी करणारा ठरेल.

**कर्क** : एखादी मौल्यवान वस्तूची खरेदी सर्वांच्या संमतीने होणे शक्य. घरामध्ये पूर्वी ठरलेला शुभ समारंभ पार पडेल.

**सिंह** : मोठ्या व्यवहारातून पुरेशी काळजी घेत वाटचाल करायची आहे. हितशत्रूंचा काही प्रमाणात त्रास होणे शक्य.

**कन्या** : आपल्या लहानसहान इच्छा:आकांक्षाना पूर्ण होण्यासाठी आवश्यक ती आवक झाल्याने तुम्ही खूश असाल.

**तुळ** : एकाच वेळी नोकरी आणि घर या दोन्ही गोष्टींवर लक्ष केंद्रित करावे लागल्याने तुमच्यावर एकप्रकारचा दबाव येईल. नोकरीत बडती मिळण्याची शक्यता.

**वृश्चिक** : धंदा व्यवसायात कामाचा व्याप वाढेल. घरामध्ये छोट्या समारंभाच्या निमित्ताने प्रियजनांची गाठभेट होईल.

**धनु** : कोणताही टोकाचा विचार किंवा अतिरेकी कृती आपल्याच पायावर दगड पाडून घेणारी ठरेल. सद्गुरुची आराधनाने मन शांत होईल.

**मकर** : संततीच्या दृष्टीने येणाऱ्या शुभवार्ता अभिमानास्पद ठरतील. मात्र, त्यांचे आरोग्याचे प्रश्नाबाबत वेळीच लक्ष द्या.

**कुंभ** : इतरांना न जमणारी कामे तुम्ही यशस्वीरीत्या हाताळाल. त्यामुळे वरिष्ठांची आपल्यावर मर्जी राहील. आनंदात जीवन जगाल. धन लाभ होईल.

**मीन** : एकत्रित होणाऱ्या सहली आनंददायक ठरतील. मुलांच्या हट्टापायी चैनीच्या वस्तूसाठी खर्च करावा लागेल. जीवनात यशस्वी व्हाल.

# शिंदे युवा सेनेच्या शहर प्रमुखांसह २१ जणांचा राजीनामा

## जिल्हा संपर्कप्रमुख शिवाजी सावंत समर्थनार्थ राजीनामासत्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

स्थानिक स्तरावरील पदाधिकाऱ्यांच्या निवडी थेट मुंबईतून केल्या जात असल्याने शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे जिल्हा संपर्कप्रमुख शिवाजी सावंत यांनी राजीनामा दिला. त्यांच्या सन्मान आणि समर्थनार्थ पक्षाच्या २१ पदाधिकाऱ्यांसह मी युवा सेना शहर प्रमुख पदाचा राजीनामा दिला आहे, अशी माहिती युवा सेना शहरप्रमुख समर्थ मोटे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सोलापूर जिल्ह्याचे शिवसेना संपर्कप्रमुख शिवाजी सावंत यांनी अत्यंत प्रामाणिकपणे पक्षाने दिलेले काम केले आहे. त्यांनी मोठ्या हिमतीने शिवसेना येथे उभारली. त्यांनाच पक्षाकडून डावलण्यात आले. बाहेरच्या पदाधिकाऱ्यांनी हस्तक्षेप केला. सावंत यांना विश्वासात न घेता स्थानिक स्तरावरील पदाधिकाऱ्यांच्या निवडी थेट मुंबईतून केल्या जात असल्याने अखेर सावंत यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. त्यामुळे सावंत यांच्या विचारांचे समर्थक म्हणून आम्ही सर्व २१ पदाधिकारी राजीनामा देत असल्याचे समर्थ मोटे यांनी यावेळी सांगितले. सावंत यांनी राजीनामा दिल्याने आम्ही कुणाच्या नेतृत्वाखाली काम करायचे ? असा प्रश्न यावेळी मोटे यांनी उपस्थित केला. आम्ही पक्षाच्या पदाचे राजीनामे दिले असले तरी शिवसैनिक म्हणून निष्ठेने काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

युवासेना शहरप्रमुख समर्थ मोटे, उपजिल्हाप्रमुख सुनील निंबाळकर, अनिकेत सूळ, सोशल मीडिया उपजिल्हाप्रमुख देविदास लिंबोळी, सोशल मीडिया शहर प्रमुख अनुपमसिंग बायस यांच्यासह युवा सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी राजीनामा दिले असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या पत्रकार परिषदेस माजी उपमहापौर दिलीप कोल्हे, आशिष परदेशी आणि राजीनामा दिलेले पदाधिकारी उपस्थित होते.

**पंढरपुरात उद्या बैठक**

पदाधिकाऱ्यांच्या राजीनाम्यांच्या पार्श्वभूमीवर पक्ष निरीक्षकांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये सोमवार दि. ४ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वाजता पंढरपूर येथे पदाधिकाऱ्यांची बैठक होणार आहे. या बैठकीत पक्ष निरीक्षक चर्चा करणार आहेत. या बैठकीत नेमका काय निर्णय होतो? हे पाहून त्यानंतर दोन दिवसात राजीनामा दिलेल्या सर्व पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन पुढील दिशा आणि निर्णय घेण्यात येणार असल्याचे माजी उपमहापौर दिलीप कोल्हे यांनी स्पष्ट केले.




# मल्लिकार्जुन हायस्कूलमध्ये पालक-शिक्षक सहविचार सभा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

श्री मल्लिकार्जुन हायस्कूल हत्तुरे नगर येथे पालक-शिक्षक सहविचार सभा ज्येष्ठ शिक्षक मारुती माने यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. प्रमुख अतिथी धरेप्पा हत्तुरे, अण्णाराया तुप्पद, पालक प्रतिनिधी इरण्णा भरडे, प्रीतम गायकवाड यांच्या हस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यप्रसंगी वंदना कोरे यांनी प्रार्थनेचे गायन केले. अनिलकुमार गावडे यांनी अहवाल वाचन व प्रशालेत राबवत असलेल्या सर्व उपक्रमाविषयी माहिती दिली. गंगाराम घोडके यांनी क्रीडा अहवाल, परमेश्वर चांदोडे यांनी स्काऊट गाईड अहवालाचे वाचन केले. याप्रसंगी वंदना कोरे, वनिता जांभळे, अमर हरके, स्वाती चवरे आदी पालकांनी प्रशालेतील विविध उपक्रमाचे कौतुक केले. सभेस भारत राऊत, गुरुसिद्धप्पा पाटील, दत्तात्रेय आगरखेड, प्रकाश चिवडशेट्टी, विद्याधर हुलगेरी, अमरनाथ कदारे, संतोष स्वामी आदी उपस्थित होते. प्रास्ताविक प्रतीक्षा बिडवे यांनी केले. सूत्रसंचालन सुकेशनी गंगोडा यांनी केले. अनिता हौदे यांनी आभार मानले.

# हॅपी थॉट्सचे रविवारी शिबिर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

तेजज्ञान फाऊंडेशन (हॅपी थॉट्स) यांच्या वतीने रविवार १० ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता संपूर्ण लक्ष्य शिबिराचे आयोजन जोडबसवणा चौकातील मार्कंडेय कॉम्प्युटर्स येथे आयोजित करण्यात आले आहे.



या शिबिरात भयमुक्त व तणावमुक्त जीवन कसे जगावे, चुकीच्या सवयीपासून मुक्ती कशी मिळवावी, भूतकाळ माणि भविष्यातील चिंतापासून मुक्ती, वर्तमानात जगण्याची कला, सहज, सरळ, शक्तिशाली, समृद्ध जीवन आणि मधुर नातेसंबंध आदी महत्वाच्या विषयावर विचार नियमचे रचनाकार सरश्री यांचे व्हिडिओ प्रोजेक्टरद्वारे मार्गदर्शन होणार आहे. या शिबीराचा सोलापूरकरांनी लाभ घ्यावा, असे तेजज्ञान फाऊंडेशनतर्फे आवाहन करण्यात आले आहे.



# ब्राह्मण महासंघातर्फे अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथी निमित्ताने व साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे या महापुरुषांना अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या वतीने अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी शहराध्यक्ष प्रमोद तम्मंनावर, संपदा जोशी, महिला आघाडी अध्यक्षा, अमृता गोसावी, प्रदेश पदाधिकारी,कार्याध्यक्ष निशिकांत खेडकर, उपाध्यक्ष बजरंग कुलकर्णी, श्री विजय कुलकर्णी, संतोष पंतोजी, स्मिता पाठक, संदीप कुलकर्णी (सोशल मीडिया) व अद्वैत खेडकर आदी उपस्थित होते.

# आसरा चौकात मारहाणीत तरूणी जखमी

**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

मला का बघतोस असे विचारणा करणाऱ्या तरूणीस सहा जणांनी मारहाण करून जखमी केले.

नगमा आसिफ नदाफ (वय २१, रा. हत्तुरे वस्ती, विमानतळाजवळ) असे जखमी तरूणीचे नाव आहे. ३ ऑगस्ट रोजी दुपारी १२ च्या सुमारास राहत्या घरातून नगमा नदाफ ही चालत आसरा चौकात आली असता राजेश कोठे वाचनालयजवळ तू माझ्या मागे का येतो व मला का बघतोस असे विचारल्याने रागाच्या भरात मौला इब्राहीम मुजावर व इतर ५ जणांनी मिळून दगडाने व हाताने मारहाण केली. यामध्ये नगमा हीच्या सर्वांगास मुका मार लागल्याने तिला उपचारासाठी शासकीय रुग्णालयाल दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.



# जात पडताळणीची प्रकरणे निकाली काढा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

समाजकल्याण कार्यालय जातपडतातळणी समितीकडे सोलापूर शहरातील विद्यार्थ्यांचे प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्यात यावेत अशी मागणी सोलापूर शहर काँग्रेसचे उपाध्यक्ष संजय गायकवाड यांच्या वतीने समाजकल्याण येथील जात पडताळणी समितीचे अध्यक्ष मंजुषा मिसकर यांना देण्यात आले. गेल्या अनेक महिन्यांपासून विद्यार्थ्यांची जातपडताळणी प्रकरणे प्रलंबित आहेत. यामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण, प्रवेश प्रक्रिया, स्पर्धा परीक्षा, शिष्यवृत्ती यावर परिणाम होत आहे. यामुळे विद्यार्थ्यांना मानसिक आणि आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे. यावेळी संजय गायकवाड सोलापूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी उपाध्यक्ष, नागेश मायकल, सुभाष वाघमारे, अंकुश बनसोडे, व्यंकटेश बोमेन, आनंद संभारंभ उपस्थित होते.



# सेंट थॉमस स्कूलमध्ये वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

जागतिक पर्यावरण दिनापासून सुरू झालेल्या वृक्षारोपण मोहिमेअंतर्गत सेंट थॉमस स्कूलने शाळेच्या परिसरात अनेक झाडे लावली. या मोहिमेची सुरुवात सोलापूर ग्रामीण पोलीस आयुक्त अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. शाळेला २५ वर्षे पूर्ण होणार असल्याने मुख्याध्यापक फादर रॉबिन शिक्षक विद्यार्थी व पालक या चालू शैक्षणिक वर्षात १००० झाडे शाळेच्या परिसरात लावण्याचा नियोजन केले आहे. पर्यावरण संवर्धनासाठी आईच्या नावे एक झाड हा उपक्रम यशस्वीपणे राबवण्यात येत आहे. गेल्या दोन महिन्यात २२५ झाडे लावले आहेत विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण प्रती जागरूकता आणि आई विषयी प्रेम वाढण्यास मदत होते. असे रॉबिन यांनी सांगितले.

# पालिकेतील कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता लागू करा

## उपायुक्तांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

महापालिकेतील कर्मचाऱ्यांना शासनाप्रमाणे महागाई भत्ता लागू करुन थकीत फरक द्यावा यासह विविध मागण्यांची पूर्तता करणारी कामगार हितांची घोषणा येत्या स्वातंत्र्य दिनानिमित्त कार्यक्रमात महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी करावी, अशी मागणी सोलापूर महापालिका कामगार संघटना कृती समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

कृती समितीचे अध्यक्ष तथा कामगार नेते अशोक जानराव यांच्या नेतृत्वाखाली महापालिका उपायुक्त तैमूर मुलाणी यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. विविध मागण्यांच्या घोषणा यावेळी देण्यात आल्या.



दि.६ मार्च २०२५ प्रमाणे रोजंदारी कंत्राटी कामगारांच्या किमान वेतनदारामध्ये वाढ करून साप्ताहिक सुट्टीचे वेतन (पगारी सुट्टी) द्यावी. महापालिकेतील आरोग्य निरीक्षक, मुख्य आरोग्य निरीक्षक यांना इतर महापालिकेप्रमाणे पेट्रोल अलाऊस द्यावा. बालवाडी शिक्षिका, सेविका यांना सरसकट १० हजार प्रमाणे मानधन द्यावे. झाडूयाले, बिगारी, सफाई गार सेवकांना पदोन्नतीने जमादार पदी नेमणुक करावी, आदी मागण्यांचा निवेदनात समावेश आहे. कृती समितीच्या निवेदनातील विविध मागण्या महापालिका आयुक्तांपर्यंत पोहोचवण्यात येतील. त्यावर त्यांच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन यावेळी उपायुक्त मुलाणी यांनी दिले.

याप्रसंगी प्रदीप जोशी, अजय क्षीरसागर, बाली मंडेपू, कामगार क्रांती युनियनचे अध्यक्ष लिंबराज जेठीथोर, अनिल जगझाप, दत्ता तुळसे, दत्ता गायकवाड, भारत क्षीरसागर, प्रकाश सोनवणे उपस्थित होते.

# विडी घरकुलमधून दुचाकीची चोरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

शहरातील विडी घरकुल परिसरातील प्रगती चौक येथे घरासमोर पार्क केलेली २० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरट्याने चोरून नेली.

याबाबत अरिफ अहमद खाजाभाई शेख (वय ५१, रा. प्रगती चौक, विडी घरकुल, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २७ जुलै रोजी सायंकाळी अरिफ शेख यांनी त्यांची एमएच १३ पी ४२२३ ही घरासमोर हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार भांगे पुढील तपास करीत आहेत.

# राष्ट्र उन्नतीसाठी तंत्रशिक्षण गरजेचे

## सिद्धेश्वर वूमन्स पॉलिटेक्निकमध्ये प्रा. गजानन धरणे यांचे अभिभाषण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

मुलगी शिकली तर घर सुशोभित होते; शिक्षणामुळे केवळ कुटुंबच नव्हे तर संपूर्ण समाज उज्ज्वल होतो. या संस्थेचे मुख्य ध्येय मुलींचे सक्षमीकरण, सैद्धांतिक ज्ञानासोबतच व्यावहारिक कौशल्यामध्ये निपुणता प्राप्त करून देणे आणि राष्ट्र उन्नतीसाठी तंत्रशिक्षण गरजेच असल्याचे मत प्राचार्य प्रा. गजानन धरणे यांनी व्यक्त केले.

श्री सिद्धेश्वर देवस्थान ट्रस्ट संचालित, चार वेळा एनबीए मानांकन प्राप्त श्री सिद्धेश्वर वूमन्स पॉलिटेक्निक येथे प्रथम वर्षाच्या विद्यार्थिनी व पालकांसाठी प्रवेशोत्तर अभिमुखीकरणप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुचेता चौधरी यांनी केले. प्रवेशप्रमुख प्रा. श्रीशैल मळेवाडी यांनी प्रास्ताविक केले. सिद्धेश्वर देवस्थान ट्रस्टच्या शहराच्या विकासासाठी सुरू असलेल्या २६ प्रकल्पांची, त्यापैकी १६ शैक्षणिक प्रकल्पांची माहिती दिली. प्राचार्यांनी मागील वर्षातील शैक्षणिक, प्रशिक्षण व नोकरी, क्रीडा, सांस्कृतिक आणि तांत्रिक स्पर्धातील यशाचा आढावा घेतला. प्राचार्य प्रा. धरणे म्हणाले, दरवर्षी सिव्हिल, इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स व टेलिकम्युनिकेशन या सर्व शाखांमधील विद्यार्थिनी मोठ्या संख्येने प्लेसमेंट मिळवतात. मात्र, मागील वर्षी विशेष बाब म्हणजे आयटी



व कॉम्प्युटर शाखेतील फक्त द्वितीय वर्षाच्या विद्यार्थिनींनाही बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये ४ ते ५.५ लाख वार्षिक पॅकेजसह प्लेसमेंट मिळाले. सुरक्षित व तांत्रिकदृष्ट्या सक्षम वातावरणामुळे प्रत्येक वर्षी सर्व प्रवेश जागा उच्च गुणवत्तेच्या विद्यार्थिनींनी भरल्या जात असल्याचे त्यांनी अभिमानाने सांगितले. पालकांना आपल्या कन्यांचा सर्वांगीण विकास होईल याची खात्री त्यांनी दिली. यावेळी सर्व शाखांचे विभागप्रमुख प्रा. प्रमोद शिवगुंडे, प्रा. नवनाथ माने, प्रा. प्रतिभा पाटील, प्रा. स्वाती मणियाल, संचालक मंडळ सदस्य डॉ. नीता आळंगे व प्रा. श्रेयस आळंद तसेच प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकारी प्रा. प्रमोद मेनसे, क्रीडा प्रमुख प्रा. स्वयंप्रकाश व्यास उपस्थित होते. प्रथम वर्ष प्राध्यापक प्रा. प्राजक्ता सप्तश्वा, प्रा. प्रीती केशेट्टी, प्रा. मंदाकिनी आसबे, प्रा. रवीकिरण पतंगे, प्रा. ऐश्वर्या पाटील, प्रा. लिगाडे, प्रा. कापसे आदींची उपस्थिती लाभली.प्रा. आकाश चटके यांनी आभार मानले.



# केंद्रस्तरीय शिक्षण परिषदेत 'एक पेड मां के नाम' उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट-**

येथील वसुंधरा महाविद्यालय येथील परिसरात वृक्षारोपण करून शिक्षण परिषद यांनी हरित महोत्सव साजरा केला. मनपा केंद्र शाला क्रं.२८ च्यावतीने केंद्रस्तरीय शिक्षण परिषदमध्ये मनपा प्रशासनाच्या वतीने शैक्षणिक विषयांच्या अनुषंगाने कार्यशाळा घेण्यात आली. कार्यशाळेत रजनी राऊळ पर्यवेक्षिका मनपा प्राथ शिक्षण मंडळ सोलापूर, परमेश्वर सुतार केंद्रीय मुख्याध्यापक यांनी रोप लावून मार्गदर्शन केले. यावेळी अंबादास पांढरे मुख्याध्यापक स्वामी विवेकानंद प्रशाला, पोपट उमाप केंद्रीय मुख्याध्यापक रामवाडी, इको क्लबचे डॉ. मनोज देवकर, गौरीशंकर नारायणे, जनार्दन चव्हाण, केंद्रांतर्गत ५० शाळांचे मुख्याध्यापक व सहशिक्षक या कार्यशाळेत उपस्थित होते सर्वांच्या उपस्थितीत वृक्षारोपण करण्यात आले. अमृत वृक्ष ॲप या शासनाच्या वेबसाईटवर देखील नोंद करण्यात आले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महत्वाचे...



## गौडगाव येथे पिक विमा कंपनीची कार्यशाळा

**बार्शी, दि. ३ ऑगस्ट-**

तालुक्यातील गौडगाव येथे भारतीय कृषी विमा कंपनी यांच्यामार्फत गौडगांव येथे शेतकऱ्यांना मार्गदर्शक व पीकविमा पाठशाळा व कार्यशाळा घेण्यात आली. विमा कंपनीचे तालुका प्रतिनिधी सत्यजित भोसले व पीकविमा सल्लागार विशाल कराड यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले व सर्व शेतकऱ्यांना पीकविमा भरण्यासाठी माहिती दिली. तसेच खरीप हंगाम २०२४ मधील पीक विम्यापासून वंचित शेतकऱ्यांना दहा ते पंधरा दिवसांच्या आत पीकविमा जमा होईल, असे शेतकऱ्यांना तालुका विमा प्रतिनिधी यांनी सांगितले. कार्यशाळेसाठी राहुल भड, पांडुरंग पाटील, काका भड, सतीश यादव, सतीश भड, बालाजी भड, राजाभाऊ बोंगाणे, संतोष भड, पद्माकर भड, पिंटू भड, पिंटू माने आदी शेतकरी उपस्थित होते.



## राजा माने यांची मोडनिंबच्या वेताळ साहेब देवस्थानला भेट

**मोडनिंब, दि. ३ ऑगस्ट-**


सोलापूर जिल्ह्यातील मोडनिंब (ता.माढा) येथील ग्रामदैवत श्री वेताळ साहेब देवस्थानला डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटना महाराष्ट्रचे संस्थापक अध्यक्ष, प्रतिबिंब प्रतिष्ठान अध्यक्ष, महाराष्ट्र शासनाच्या शंकरराव चव्हाण पत्रकार कल्याण निधी समितीचे सदस्य राजा माने यांनी भेट दिली व दर्शन घेतले. याप्रसंगी मोडनिंब प्रेस क्लब अध्यक्ष प्रथमेश पवार, पत्रकार रमेश शिरसाट, पत्रकार युवराज रणसिंग, उद्योजक राहुल गडेकर, अजित खडके, सुदर्शन कोळी, जयंत पवार, पुजारी उज्वल गुरव उपस्थित होते.



## अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त मोहोळमध्ये ६६ जणांचे रक्तदान

**मोहोळ, दि. ३ ऑगस्ट-**

लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त मोहोळ येथे ६६ जणांनी रक्तदान करण्यात आले. या शिबीराचे उद्घाटन मोहोळचे सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक किरण पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पोलीस गोपनीय विभागाचे गोपाळ साखरे, दलित स्वयंसेवक संघाचे राज्य उपाध्यक्ष मिलिंद अष्टूळ, राज्य सरचिटणीस दिनेश माने, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) चे माजी नगरसेवक दत्ता खवळे, खंदारे, मुस्ताक शेख, माजी उपनगराध्यक्ष प्रमोद डोके, लहुजी शक्ती सेनेचे भैया काळे, राजाभाऊ अष्टूळ, नागेश खिलारे, उमेश कांबळे, नागनाथ खवळे, बबलू नाडेकर,महादेव गायकवाड, सोमनाथ अष्टूळ, बाळासाहेब जाधव, किसन घोलप, सनी रणदिवे, प्रथमेश कांबळे उपस्थित होते.



## विविध मागण्यांसाठी अखिल महाराष्ट्र वडार समाजाच्यावतीने रॅली

**टेंभुर्णी, दि.३ ऑगस्ट-**

अखिल महाराष्ट्राचा वडार समाजाचा वतीने पोलीस ठाण्याचा समोर रॅली काढून आंदोलन करण्यात आले. सकाळी ११ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळ्यास पुष्पाहार अर्पण करून रॅली सुरुवात करण्यात आली. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पुतळ्यास अभिवादन करून टेंभुर्णी पोलीस ठाण्यासमोर मोर्चेकारी बसून मागण्यांचे निवेदन दिले. वडार समाजाचे नेते राजकुमार धोत्रे यांचा नेत्रात्वाखाली हा मोर्चा काढण्यात आला होता. यावेळी अनिल पवार, गणेश देवकर, सागर पवार, रमेश पवार, घोडगे मामा, रामभाऊ वाघमारे, महेंद्र सोनावणे, श्रीकांत मासुळे, प्रकाश ननवरे, समाधान पवार, भरत दळवी, तानाजी पवार, रामभाऊ बनपट्टे, विकास बंदपट्टे, गणेश धोत्रे, महावीर वाजाळे, सुनील ओव्हाळ, कालिदास पवार, सनी पवार, बाळू जाधव, अनिल आरडे, शंभू पवार, शिवाजी पवार, मानेगाव पिंटू चौगुले उपस्थित होते. यावेळी मागण्यांचे निवेदन मंडल अधिकारी सुजित शेळवणे यांनी स्वीकारले. यावेळी पोलिसांनी बंदोबस्त चोख ठेवला होता.

# निमित्त वाढदिवसाचे; वेध स्थानिक निवडणुकीचे

### पंढरपुरात राजकीय वातावरण तापू लागले

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३ ऑगस्ट-**



आमदार अभिजीत पाटील यांच्या वाढदिवस कार्यक्रमात झालेल्या राजकिय वक्तव्यावरून वाढदिवसाचे निमित्त असले तरी निशाण्यावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका असल्याचे स्पष्ट झाले आहे. आमदार पाटील गट हा परिचारक गटापुढे निश्चितच आव्हान उभे करणार असल्याचे या निमत्ताने समोर आले आहे.

निवडणूकींच्या तोंडावर आमदार पाटील आणि माजी आमदार परिचारक यांच्या मधील सुरु झालेले वाकयुध्द अधिक तीव्र होणार असल्याची चर्चा देखील येथील राजकीय वर्तुळात चांगलीच रंगली आहे. आमदार अभिजीत पाटील यांचा वाढदिवस मोठ्या जल्लोषात साजरा झाला. यावेळी बोलताना गेल्या वर्षी वाढदिवसावेळी आपण चार महिन्यातच आमदार होतो असे वक्तव्य केले होते आणि जनतेच्या प्रेमामुळे आपण आमदार झालो. तर दुसऱ्या बाजूला आमदार झाल्यानंतर एका व्यक्तव्याने दीड वर्षे सभागृहाच्या बाहेर निलंबित होण्याची वेळ आल्याचे देखील आपण पाहिल्याची जहरी टिका माजी आमदार प्रशांत परिचारक यांचे नाव न घेता आमदार पाटील यांनी त्यांच्यावर केली. दरम्यान ऐवढ्यावरच आमदार पाटील थांबले नाहीत तर येणाऱ्या सणांसुदी काळामध्ये काही गोष्टी घडणार आहेत. त्यामुळे काही गोष्टींचे उत्तर आपणाला सेवेतून, आपल्या कामातून आणि कार्यकर्तुत्वातून द्यावयाचे असल्याचा गर्भित इशारा देखील यावेळी बोलताना त्यांनी दिला. आमदार पाटील यांच्या एकंदरीतच कालच्या भाषणावरुन परिचारक यांच्याशी त्यांनी आता उघड़पणे संघर्षास सुरुवात केल्याचे दिसून आले. माजी आमदार भारत भालके यांच्या निधनानंतर पंढरपूर तालुक्यात परिचारकांच्या विरोधकांमध्ये जी पोकळी निर्माण झाली होती ती भरुन काढण्याचे काम आता आमदार पाटील यांनी सुरु केल्याचे त्यांच्या काही दिवसांपासून सुरु झालेल्या परिचारकांच्या विरोधातील वक्तव्यांवरुन स्पष्ट झाले.

**तालिका अध्यक्षांच्या खुर्चीवर विराजमान होण्याची संधी**

पहिल्या अधिवेशनात ५५, दुसऱ्या अधिवेशनात ६० विषयांवर तर पावसाळी अधिवेशनात ११७ विषयांवर बोललो.विशेष म्हणजे आपण सगळ्यांनी निवडून दिले त्यामुळे आपल्या सगळ्यांच्या मुळेच विधानसभेत तालिका अध्यक्षाच्या खुर्चीवर आपण आपल्या सगळ्यांचा सेवक म्हणून सेवा बजाविण्याचे काम देखील करण्याची संधी मिळाल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले.

**शासनाने संधी दिल्याने काम करता आले**

आरोग्य कमिटीवर काम करण्याची शासनाने संधी उपलब्ध करुन दिली आहे. आपणाला आमदार होवून अजून एक वर्षे पुर्ण व्हायचे आहे. मात्र शासनाकडून ही संधी मिळाल्यामुळे आजपर्यंत आपण एक कोटींहून अधिकचा मुख्यमंत्री सहाय्यता निधी आपल्या मतदार संघातील सर्वसामान्य लोकांना मिळवून देण्याचे काम केल्याची माहिती आमदार पाटील यांनी यावेळी बोलताना दिली.

## भारत विकास परिषदेतर्फे बार्शीत मंगळवारी व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३ ऑगस्ट-**



भारत विकास परिषद बार्शी शाखेच्या वतीने मंगळवार दि. ५ ऑगस्ट रोजी सायंकाळी सहा वाजता स्वातंत्र्यवीर सावरकरांचे हिंदुत्व आणि राजकारणातील सध्याची स्थिती या विषयावर प्रसिद्ध अभिनेते शरद पोंक्षे यांचे व्याख्यान होणार असल्याची माहिती परिषदचे अध्यक्ष संतोष जोशी यांनी दिली.

येथील यशवंतराव चव्हाण सभागृहात हे व्याख्यान होणार आहे. सकल हिंदू समाजाला जागृत करण्यासाठी व एकत्र आणण्यासाठी हा प्रयत्न आहे. तरी या व्याख्यानाचा लाभ नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन भारत विकास परिषदेच्या पदाधिका-यांनी केले आहे.

# अरणच्या आयुर्वेदिक शिबीरात १४७ जणांची तपासणी

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.३ ऑगस्ट-**



अरण (ता. माढा) येथे जिल्हा परिषद व आयुष विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या आयुर्वेदिक शिबिरात १४७ जणांची तपासणी करण्यात आली.

आयुष्यमान आरोग्य मंदिर अरण (ता. माढा) येथे हे आयुर्वेदिक शिबिर घेण्यात आले. आयुर्वेद हा आयुष्याचा वेद आहे, त्याचा अंगीकार करा तो पुढील पिढीपर्यंत पोचवा, आयुर्वेद आणि अध्यात्म एकच आहे. आचार विचार सांभाळले की रुग्ण लवकर बरा होतो. स्वस्थ माणसाच्या स्वास्थ्याचे रक्षण आयुर्वेद करतो असे प्रतिपादन डॉ. विवेकानंद पाटील यांनी केले. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य भारत शिंदे, शिवाजी कांबळे, अ‍ॅड. विजय शिंदे, सहायक कुष्ठरोग अधिकारी डॉ. शेगर, जिल्हा आयुष अधिकारी डॉ. विलास सरवदे, वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रदीप पाटील, सरपंच सुरत्नप्रभा ताकतोडे आदी उपस्थित होते. शिबिरात स्नेहन-स्वेदन, रक्तमोक्षण, अग्निकर्म, विद्यकर्म, नस्य, जानुबस्ती यासारख्या पारंपरिक आयुर्वेदिक उपचार पद्धतींचा लाभ नागरिकांनी घेतला. शिबिरात १४७ रुग्णांनी सहभाग नोंदवला. माजी सभापती भारत शिंदे, माजी सभापती शिवाजी कांबळे, यांनी विचार व्यक्त केले.

यावेळी डॉ. घोडके, डॉ. अर्चना घोडके, सावता रणदिवे, राजाभाऊ भंगीरे, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. आशुतोष सावरे, डॉ. सुप्रिया शेळके, डॉ. योगिता माने आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. प्रदीप पाटील यांनी केले. सूत्रसंचालन परमेश्वर सुरवासे यांनी केले. आरोग्य सहाय्यक सुनील लादे, बिराजदार, सय्यद, व्यवहारे यांचे योगदान लाभले.

## 'आपुलकी'कडून मेडशिंगी येथे सायकल वाटपासह वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ३ ऑगस्ट-**



सांगोल्यातील आपुलकी प्रतिष्ठानच्या वतीने मेडशिंगी, ता.सांगोला येथील दे.भ.कै.संभाजीराव शेंडे विद्यालयात ४ ते ६ कि.मी. अंतर चालत येणाऱ्या ६ गरजू विद्यार्थ्यांना सायकल भेट देण्यात आल्या.

यावेळी बोलताना प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र यादव म्हणाले, आपुलकी प्रतिष्ठानच्या वतीने यावर्षी मोठ्या प्रमाणात गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य तसेच जुन्या परंतु सुस्थितीत असलेल्या सायकल जमा करून त्या दुरुस्त करून वाटप करण्यात येत आहेत. कुटुंबातील अडीअडचणीमुळे शिक्षणापासून कोणीही वंचित राहू नये यासाठी प्रयत्न चालू असल्याचे सांगितले. यावेळी संस्थाध्यक्ष अरुणभाऊ शेंडे यांनी सांगोला तालुक्यात आपुलकी प्रतिष्ठानचे चालू असलेले काम कौतुकास्पद असल्याचे सांगून शाळेतील विद्यार्थ्यांना सायकल तसेच शैक्षणिक साहित्य दिल्याबद्दल आपुलकीचे आभार मानले. यावेळी शाळेच्या प्रांगणात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमाला प्राचार्या पारेकर, आपुलकी प्रतिष्ठानचे सदस्य अनिल इंगवले, डॉ.बंडोपंत लवटे, डॉ.मच्छिंद्र सोनलकर, चंद्रशेखर कवडे, अमर कुलकर्णी, सुनील मरडे, उपसरपंच सोनलकर यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.संजय मुंढे यांनी केले.

# सांगोला महाविद्यालयात अण्णाभाऊ साठे जयंती



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ३ ऑगस्ट-**

सांगोला येथील सांगोला महाविद्यालयात साहित्यरत्न शाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेस प्र.प्राचार्य डॉ.सुरेश भोसले यांचे हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.

अण्णाभाऊ साठे यांनी लोककला आणि साहित्याच्या माध्यमातून उपेक्षितांचे दुःख चव्हाटयावर मांडून त्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. तसेच विद्यार्थ्यांनी त्यांच्या जीवनामध्ये अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचे अवलोकन करावे असे मत डॉ. सुरेश भोसले यांनी यावेळी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे आयोजन आय.क्यु.ए.सी. कोऑर्डीनेटर डॉ.राम पवार यांच्या मागदर्शनाखाली डॉ. सदाशिव देवकर, बाबासो इंगोले यांनी केले. यावेळी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.



## वैरागमध्ये सिंगल युज प्लास्टिक वापरावर बंदी

**वैराग, दि. ३ ऑगस्ट-**

वैराग शहरामध्ये सिंगल युज प्लास्टिकवर पूर्णपणे बंदी घालण्यात आलेले आहे. सिंगल युज प्लास्टिकचे संकलन, वाहतूक आणि वापर करताना आढळल्यास कायदेशीर कारवाई आणि पहिल्या वेळेस रु. ५००० / रुपये दंड, दुसऱ्या वेळेस रु. १०,०००/- रुपये दंड आणि तिसऱ्या वेळेस रु. २५,०००/- दंड व सहा महिन्याची करावास आकारण्यात येईल असे मुख्याधिकारी विद्या पाटील यांनी सांगितले. तसेच शहरातील सर्व व्यापारांना सिंगल इस प्लास्टिकचा वापर विक्री न करण्याचे आवाहन केले आहे. प्लास्टिक निर्मूलन पथकामार्फत वैराग शहरांमध्ये सिंगल युज प्लास्टिक बंदी बाबत मोहीम राबविण्यात आली. या कारवाईमध्ये २५ किलो सिंगल युज प्लास्टिक जप्त करण्यात आले आणि पाच हजार रुपये दंड आकारण्यात आला. या कारवाईमध्ये मुख्याधिकारी विद्या पाटील, हर्षल पवार, अजित चौरे, प्रियंका चव्हाण,मनीषा कदम, ध्रुव साबळे, हसनअली शेख, सचिन पानबुडे, चंद्रकांत साळवे, इसाक तांबोळी, दीपक हुच्चे, रामचंद्र प्रभळकर या पथकाने कारवाई केली.



## कटफळ येथे वृक्षारोपणासह जलतारा योजनेचे भूमिपूजन

**वेळापूर, दि.३ ऑगस्ट-**

पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या मिशन विकसित गाव अंतर्गत आज रोजी कटफळ गाव येथे वृक्षारोपण व जलसंधारणामधील जलतारा या प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यात आले. वृक्षारोपणासाठी इंडेक्स कंपनी व मुकुल माधव फाउंडेशन यांच्याकडून २०० विविध प्रकारची रोपे देण्यात आली. सदर वृक्षारोपण सांगोला पोलीस स्टेशनचे पी. आय. विनोद घुगे, पंचायत समिती सांगोलाचे गटविकास अधिकारी उमेशचंद्र कुलकर्णी, विस्तार अधिकारी पुकळे, फिनोलेक्स कंपनी व मुकुल माधव फाउंडेशनचे समन्वयक संतोष शेलार यांचे हस्ते करण्यात आले. श्री पांडुरंग विद्यालय कटफळ, जिल्हा परिषद शाळा कटफळ यांच्या विद्यार्थ्यांनी गावामधून वृक्षदिंडी काढून जनजागृती केली. कार्यक्रमाचे आयोजन ग्रामपंचायत कटफळ, जय हिंद क्रिकेट क्लब यांच्याकडून करण्यात आले होते.



## पंढरपुरात महसूल सप्ताहास प्रारंभ; लाभार्थ्यांना विविध प्रमाणपत्रांचे वितरण

**पंढरपूर दि. ३ ऑगस्ट-**

येथील तहसिल कार्यालयात आज महसूल सप्ताहाचा शुभारंभ करण्यात आला. तालुक्यातील महसूल कार्यालयीन अधिकारी व कर्मचारी यांना वर्षभरातील कामगिरीबाबत पुरस्कार देण्यात आले. तसेच तालुक्यातील लाभार्थ्यांना विविध प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.यावेळी नायब तहसिलदार व्ही.व्ही. बुचके, उत्कृष्ट मंडळ अधिकारी आर.बी. वाघमारे, उत्कृष्ट सहायक महसूल अधिकारी डी. के. गावदरे, उत्कृष्ट ग्राम महसूल अधिकारी आर.बी. लोखंडे, उत्कृष्ट महसूल सहायक विजय झोरे, उत्कृष्ट शिपाई बी.एम. शिंदे, उत्कृष्ट महसूल सेवक, शिवा सलगर, उत्कृष्ट पोलीस पाटील, बालाजी माने यांना उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, तहसिलदार सचिन लंगुटे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडण्याबाबतची कार्यवाही करणेचे निर्देश यावेळी देण्यात आले. तालूक्यातील तहसिलदार व नगर भूमापन अधिकारी अशा प्रकरणांवर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम कलम १५५ खालील प्रकरणांबाबत निर्णय घेऊन एकूण २२ आदेश पारित करून ७/१२ दुरूस्ती करून संबंधित खातेदार यांना वाटप करण्यात आले. त्याचबरोबर शासनाने तयार केलेले ई-हक्क पोर्टलवर सेतु सुविधा केंद्रामार्फत नोंदवून त्यानंतर तहसिलदारांकडे पाठविण्यात यावीत याबाबत मार्गदर्शन करण्यात आले व कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.



# वखारिया विद्यालयातील मुलींकडून सैनिकांना राख्यांची भेट

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३ ऑगस्ट-**

उपळे दुमाला येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित वखारिया विद्यालयातील मुलींकडून भारतीय सैनिकांना रक्षाबंधन म्हणून राख्या पाठविण्यात आल्या.

विद्यालयातील सहशिक्षिका श्रीमती तवले आणि रोहिणी डोईफोडे यांच्या मार्गदर्शनात विद्यालयातील मुलींनी स्वतःच बनवलेल्या राख्या सीमेवर तैनात असलेल्या भारतीय सैनिकांना पाठवण्यासाठी मुख्याध्यापक दयानंद रेवडकर यांच्याकडे सोपविण्यात आल्या. रेवडकर यांनी त्या ताबडतोब पाठविण्याची व्यवस्था केली.

या कार्यक्रमास सर्व शिक्षक सदाशिव सोनके, रमेश लंकेश्वर, डी.डी.राऊत, अनिल वैद्य, एन.एन. महाले, विलास शिंदे, मकरंद जगदाळे, शंकर शिंदे, दादासाहेब धनके, सेवक मिलिंद सुरवसे उपस्थित होते. या प्रसंगी मुख्याध्यापक रेवडकर यांनी विद्यार्थीनींचे कौतुक केले. प्रकल्प प्रमुख म्हणून रोहिणी डोईफोडे यांनी काम पाहिले.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## 'विहिंप' समरसता आयामतर्फे लोकशाहीरांना अभिवादन

**सोलापूर, दि.३ ऑगस्ट -**

विश्व हिंदू परिषद (समरसता आयाम) तर्फे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा मंत्री संजयकुमार जमादार, विभाग सहमंत्री विजयकुमार पिसे, अमित सारोळकर, अविनाश माने, चंद्रकांत कुलकर्णी हे उपस्थित होते. यावेळी माजी मंत्री उत्तमप्रकाश खंदारे, काँग्रेस प्रदेश उपाध्यक्ष सुरेश पाटोळे, सामाजिक कार्यकर्ते सतीश बगाडे, पत्रकार मुकुंद उकरांडे यांची प्रमुख उपस्थिती होती.



### महत्वाचे...



## महसूल सप्ताहानिमित्त पंढरपूर तालुक्यात वृक्षारोपण

**पंढरपूर, दि.३ ऑगस्ट -**

महसूल सप्ताह निमित्त दि. ३ ऑगस्ट रोजी पंढरपूर तालुक्यात तहसीलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी सुशील संसारे यांच्या हस्ते पाणंद रस्त्याच्या दुतर्फा वृक्ष लागवड करण्यात आली. यावेळी लोणारवाडीचे मंडल अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, माजी सरपंच व ग्रामस्थ, ग्रामरोजगार सेवक, नरेगा तांत्रिक अधिकारी, अव्वल कारकून उपस्थित होते. वृक्षरोपण केल्यानंतर त्या रोपांचे संगोपन करण्याच्या सूचना तहसीलदार लंगुटे व गटविकास अधिकारी संसारे यांनी दिल्या. तसेच करकंब, भोसे, जळोली, रांजणी येथे सरपंच, मंडळ अधिकारी, तलाठी, कृषी सहाय्यक ग्रामसेवक, ग्राम रोजगार सेवक व ग्रामस्थ यांच्या हस्ते महसूल सप्ताहनिमित्त तहसीलदार यांच्या सूचनेनुसार पानंद रस्त्याच्या दुतर्फा वृक्ष लागवड करण्यात आली.



## तोंडले येथे स्नेहमेळाव्यात ३२ वर्षांनंतर जमले माजी विद्यार्थी

**वेळापूर, दि.३ ऑगस्ट-**

तोंडले (ता. माळशिरस) येथे ३२ वर्षानंतर हनुमान विद्यालय प्रशालेतील सन १९९२-९३ मधील दहावीच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा झाला. यानिमित्त जुने मित्र पुन्हा एकत्र आल्याने जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. प्रमुख पाहुणे म्हणून श्रीनिवास इनामदार, हनुमंतराव पवार, श्री.पलसे सर, श्री.देशमुख सर, श्री.बागल सर, श्री.आसबे सर, श्री.ननवरे सर उपस्थित होते. माजी मुख्याध्यापक एम. आर. मगर अध्यक्षस्थानी होते. यावेळी सर्व गुरुजनांचा सत्कार करण्यात आला. माजी विद्यार्थ्यांनी आपली ओळख करून देत आणि शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला. विविध मनोरंजक खेळ झाले. छगन मोरे ही विद्यार्थिनी दुबईहून आली होती. माजी विद्यार्थ्यांतर्फे सध्याच्या सर्व विद्यार्थ्यांना स्नेहभोजन देण्यात आले. नवनाथ कोडग यांनी सूत्रसंचालन केले. प्रमोद जगताप यांनी आभार मानले.



## पिलीव मंडलाधिकारी एकतपुरे यांना उत्कृष्ट मंडलाधिकारी सन्मान

**पिलीव, दि. ३ ऑगस्ट-**

पिलीव (ता. माळशिरस) चे मंडलाधिकारी विजय एकतपूरे यांना उत्कृष्ट काम केल्याबद्दल महसूल दिनानिमित्त प्रभारी जिल्हा अधिकारी कुलदीप जंगम यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील व इतर मान्यवर उपस्थित होते. मंडलाधिकारी एकतपुरे यांना उत्कृष्ट मंडलाधिकारी म्हणुन सन्मानीत करण्यात आले बद्दल पिलीव येथील महाईसेवा केंद्र चालक, तलाठी ,पत्रकार व ग्रामस्थांच्यवतीने सत्कार करण्यात आला यावेळी महाईसेवा केंद्रांचे लक्षमण करे, अमोल भैस , पाटील, कोपनर तसेच तलाठी अमोल कांबळे, रणखांब, नाईकनवरे, लोखंडे मॅडम, पत्रकार दामोदर लोखंडे, संजय पाटील, दत्तुपंत भैस, अण्णा कोपनर, शैलेश झिंजे, संदीपान बोडरे, कोतवाल कांबळे यांच्या सह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## पिलीव गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी काळे

**पिलीव, दि.३ ऑगस्ट -**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील अष्टविनायक गणेश मित्र मंडळाच्या गणेशोत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची निवड संस्थापक अविनाश जेऊरकर यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत करण्यात आली.



या बैठकीत सर्वानुमते बिनविरोध निवडी करणयात आल्या यामध्ये अध्यक्षपदी तन्मय काळे, उपाध्यक्षपदी विजयकुमार देशमुख व अक्षय माने, सचिव किरण घोरपडे, ओंकार मोरे तर खजिनदारपदी अमोल गांधी, ढोल पथक प्रमुखपदी सनी भंडलकर, प्रमोद पोपळमाने ,मिरवणूक प्रमुखपदी दत्ता काळे व विशाल साठे ,सौरभ काळे ,ताशा प्रमुख तुषार करडे ,चिवळया माने यांच्या सर्वानुमते बिनविरोध निवडी करणयात आल्या यावेळी अविनाश जेऊरकर, प्रकाश जाधव, डव्होकेट वैभव मथवडे, श्याम उपाध्ये,अमोल गांधी,गणेश सुर्यवंशी, तुषार जाधव,कैलास फाळके, अमोल लोखंडे, महेश गाढवे,आरोह जेऊरकर तसेच मंडळाचे आजी ,माजी पदाधिकारी, हितचिंतक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदरचे मंडळ हे वेगवेगळ्या पद्धतीचे सार्वजनिक उपक्रम तसेच मिरवणूकीवेळी झांज पथकाचे आयोजन करते .

# मोडनिंब येथे महादेवी हत्तीणीसाठी स्वाक्षरी अभियान

### दोन हजार नागरिकांनी केल्या सह्या

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.३ ऑगस्ट-**

नांदणी मठातील लाडकी हत्तीण महादेवी उर्फ माधुरी हिला गुजरातमधील वनतारा येथे हलवल्यानंतर मोडनिंब (ता. माढा) परिसरात जनआक्रोश उसळला आहे. तिच्या परतीसाठी मोडनिंब येथील दत्त चौकात सकाळी ९ वाजता स्वाक्षरी अभियान राबविण्यात आले. या अभियानात अवघ्या काही तासांत सुमारे दोन हजार नागरिकांनी सह्या करत आपला पाठिंबा दर्शविला.



ग्रामस्थ व सकल जैन समाजाच्या वतीने राबविण्यात आलेल्या या उपक्रमास स्थानिक पातळीवर मोठा प्रतिसाद मिळाला. महिलाही मोठ्या संख्येने उस्फूर्त प्रतिसाद नोंदवला.माधुरी परत आलीच



पाहिजे असा आवाज ठिकठिकाणी उमटत आहे.महादेवी हत्तीण अनेक वर्षांपासून नांदणी मठात होती. भाविकांसह स्थानिक नागरिकांशी तिची जिव्हाळ्याची नाळ होती. अचानक झालेल्या स्थलांतरामुळे अनेकांच्या भावना दुखावल्या असून, या स्वाक्षरी अभियानाच्या माध्यमातून शासनाकडे आणि संबंधित विभागांकडे हत्तीणीच्या घरवापसीची जोरदार मागणी करण्यात आली आहे. स्वाक्षरी अभियानाच्या माध्यमातून शासनाकडे आणि संबंधित विभागांकडे हत्तीणीच्या पुनःस्थापनाची मागणी करण्यात येणार असून, स्थानिक पातळीवर याला मोठा प्रतिसाद मिळत आहे. यावेळी निलेश गुरसाळकर, विशाल महता, सतीश शहा, सारंग शहा, गटप्रमुख दिपक सुर्वे, राष्ट्रवादीचे कैलास तोडकरी, मनसेचे प्रशांत गिड्डे, राजेश निंबाळकर, डॉ. योगेश गिड्डे, दिलीप पालिया, मोहन मोरे, अजित खडके, धीरज पुरवत,आप्पा पाटील आदी उपस्थित होते.

## शिवाजी महाविद्यालयातील विद्यार्थी बनले लोकप्रतिनिधी

### युवा संसद उपक्रम संपन्न

### जनसामान्यांच्या प्रश्नांना फोडली वाचा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.३ ऑगस्ट-**

भारतीय संविधान आणि भारतीय लोकशाहीविषय युवकांना अनुभव मिळविण्याकरीता श्री शिवाजी महाविद्यालयामधील राज्यशास्त्र विभागाच्यावतीने राष्ट्रीय युवा योजने अंतर्गत युवा संसद कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

उद्घाटनप्रसंगी कला शाखा समन्वयक डॉ. बिरा पारसे, डॉ. वशिष्ठ गुरमे आणि राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. पंडित लावंड आदी उपस्थित होते. डॉ. लावंड म्हणाले, लोकशाहीची मुळे मजबूत करण्यासाठी, शिस्तीच्या निकोप सवयी रुजविण्यासाठी तसेच भिन्न विचारांविषयी सहिष्णुता विकसित करण्यासाठी युवा संसद उपक्रमाची



नितांत गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. त्याबरोबरच डॉ. पारसे आणि डॉ. गुरमे यांनी युवा संसद उपक्रमात मार्गदर्शन केले. प्रास्ताविक प्रा. समाधान लोंढे यांनी केले.

भारतीय संसदीय शासन पद्धतीमधील लोकप्रतिनिधी सभागृहाची प्रतिकृती निर्माण करून सभेचे अध्यक्षस्थान कु. अदिती गुंड हिने भूषविले. सत्ताधारी गट आणि विरोधी गटात विद्यार्थ्यांची विभागणी करण्यात आली. यावेळी शेती मालास हमी भाव द्यावा, शेतकरी पीक विमा रक्कमेची कशामुळे वाढ झाली, शेतकरी कर्ज माफ कधी करण्यात येणार, रॅगिंग कायद्यातील त्रुटी दुरुस्ती कधी होणार आहे, लाडकी बहीण योजनेमुळे राज्यात आर्थिक टंचाई निर्माण झाली आहे का, महिला सुरक्षा कायदा सक्षम कसा करणार आहात, तृतीयपंथीयांच्या हिताची नवीन योजना तयार करावी अशी अनेक प्रश्नांचा भडीमार विरोधी गटाने केला. तर सत्ताधारी गटाकडून प्रश्नांची समर्पक उत्तरे देऊन स्वच्छ कारभारचे आश्वासन दिले.

### फताटेवाडी येथे बेशुध्दावस्थेत मिळालेल्या व्यक्तीचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट -**

फताटेवाडी (ता. दक्षिण सोलापूर) येथील एनटीपीसी येथील मेन रोडच्या बाजूला बेशुध्दावस्थेत मिळालेल्या व्यक्तीचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. राजकुमार विठ्ठल येळसंगी (वय ४५, रा. झळकी, ता. आळंद, जि. कलबुर्गी, कर्नाटक) असे मरण पावलेल्या व्यक्तीचे नाव आहे. २ ऑगस्ट रोजी सायंकाळी एनटीपीसी येथील मेन रोडच्या बाजूला बेशुध्द आवस्थेत राजकुमार येळसंगी हे मिळून आले होते. त्यांना वळसंग पोलिस ठाण्यातील हवालदार ए एम यादव यांनी उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. प्रतिक माने यांनी येळसंगी यास मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.



## रेश्मा गोतसुर्वे स्मृतीदिनी आचेगांव येथे वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा,**
**आचेगांव दि. ३ ऑगस्ट -**

माजी तंटामुक्त अध्यक्ष सोसायटी संचालक भगवान गोतसुर्वे यांच्या पत्नी रेश्मा गोतसुर्वे यांच्या प्रथम पुण्यस्मरणदिनानिमित्त आचेगांव (ता. दक्षिण सोलापूर) येथे ट्री गार्डसह वृक्षारोपण करण्यात आले.

शावरसिद्ध प्रशाला, साने गुरुजी मागासवर्गीय वसतिगृह, बौद्ध स्मशानभूमी व तका समाजमंदिर परिसरात सौमित व कुंजल गोतसुर्वे यांच्या वतीने 'एक पेड मेरे माँ के नाम' उपक्रमातून हे वृक्षारोपण झाले. यावेळी प्रशालेचे मुख्याध्यापक इब्राहिम बिराजदार, अशोक पाटील, बलवान गोतसुर्वे, विकास सुर्वे, भगवान गोतसुर्वे, बनसिद्ध गुरव, बलवान गोतसुर्वे, अनिल पाटील, संजय गोतसुर्वे, मारुती गोतसुर्वे, दर्शन गोतसुर्वे, मनोज गोतसुर्वे, जितेंद्र गोतसुर्वे, भारत सोनकांबळे, पांडुरंग सुर्वे, विशाल सुर्वे, जयंती अध्यक्ष राम गोतसुर्वे, अरुण थोरात, इस्माईल शेख, करण गजधाने, संघर्ष शिंदे, सनी देवरे, धनंजय गायकवाड, विजय वाघमारे, सुधाकर गोतसुर्वे, शिवाजी गोतसुर्वे, अभिषक गोतसुर्वे, सौमित गोतसुर्वे, खाजेंद्र भणजे, निरंजन गोतसुर्वे आदीसह सर्व नातेवाईक, शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.



## करजगी बँकेत विमा योजनेची जनजागृती

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.३ ऑगस्ट-**

तालुक्यातील करजगी ग्रा.पं. येथे बँक ऑफ महाराष्ट्र, वैनगंगा ग्रामीण बँक यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय विमा योजना अंतर्गत प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना आणि प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना व अन्य योजना संदर्भात जनजागृत िकार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

या प्रसंगी राष्ट्रीय विमा योजना संदर्भात बँकेचे अधिकारी वर्ग व सभेचे अध्यक्ष अँड.दयानंद उंबरजे यांनी अतिशय सोप्या पद्धतीने आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमचे अध्यक्ष म्हणून भाजपा तालुका कायदा सैल अध्यक्ष अँड. दयानंद उंबरजे बँक ऑफ इंडिया जिल्हा मॅनेजर राम वारखडे व बँक ऑफ महाराष्ट करजगी शाखेचा मॅनेजर महेश पाटील,उपसरपंच शब्बीर पटेल व पंचक्रोशीतील हिळ्ळी,शावळ, घुंगरेगाव व करजगी महिला बचत गट चे सी आर पी तसेच सर्व सदस्य व गावातील प्रतिष्ठित नागरिक बहु संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शब्बीर पटेल, प्रस्तावना फुलारी मॅडम सी आर पी, तर आभार प्रदर्शन सौ. प्रतिभा यळमेली ( ग्रा.प सदस्य) यांनी केले.

### घरगुती कारणावरून पत्नीला मारहाण

**सोलापूर, दि. ३ ऑगस्ट**

घरगुती कारणावरून पत्नीला पती व इतर दोन जणांनी मिळून मारहाण केल्याने पत्नीला उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सुजाता विजयकुमार बिराजदार (वय ३८, रा. संख, ता. दक्षिण सोलापूर सध्या रा. चिखळगी, ता. मंगळवेढा) असे जखमी पत्नीचे नाव आहे. १ ऑगस्ट रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास राहत्या घरी घरगुती कारणावरून सुजाता हिचा नवरा व इतर दोन जणांनी मिळून दगडाने व लाथाबुक्क्याने मारहाण केली. यामध्ये सुजाताच्या सर्वांगास मुका मार लागल्याने उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## अग्निहोत्रामुळे विश्वाला शांती मिळते

### राज्यमंत्री मिसाळ यांची शिवपुरी आश्रमाला भेट

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३ ऑगस्ट**

अग्निहोत्र हे केवळ अनुष्ठान नसून, ते विश्वशांतीचा संदेश देणारे आणि मानवी जीवनात सकारात्मक ऊर्जा निर्माण करणारे एक प्रभावी माध्यम असून श्री स्वामी समर्थ महाराज यांच्या पावन व आध्यात्मिक नगरीतून अशा उपक्रमांचा प्रचार आणि प्रसार अधिक मोठ्या प्रमाणावर व्हावा, अशी अपेक्षा राज्याच्या नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी व्यक्त केली.

राज्यमंत्री मिसाळ यांनी शिवपुरी येथील आश्रमास भेट दिली. यावेळी त्यांनी आश्रमातील विविध उपक्रमांची माहिती घेतली. विशेषतः अग्निहोत्राच्या प्रयोगाबाबत सविस्तर माहिती जाणून घेतली.



अग्निहोत्र केव्हा करावे, कसे करावे, याचे फायदे काय आहेत. यासंबंधी त्यांनी जागरूकता दाखवत, हा केवळ सूर्योदय आणि सूर्यास्ताच्या वेळी केला जाणारा विधी नाही, तर मानसिक समाधान आणि पर्यावरण रक्षणाचेही प्रभावी साधन साधन असल्याची त्यांनी सांगितली. या प्रसंगी शिवपुरी विश्व फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. पुरुषोत्तम राजीमवाले व त्यांचे धर्मपत्नी डॉ. गिरीजा राजीमवाले यांनी राज्यमंत्री मिसाळ यांचे तसेच त्यांच्या सहकाऱ्यांचे स्वागत केले. त्यांनी फाउंडेशनच्या उपक्रमांबाबत सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाची सुरुवात राज्यमंत्री मिसाळ यांच्या हस्ते व्याहुर्थी होमाने झाली. त्यानंतर गजानन महाराज यांच्या पादुकांचे दर्शन घेण्यात आले, तसेच श्रावणमासानिमित्त शिवमंदिराचे दर्शन घेतले. यावेळी आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी नगरसेवक मीलन कल्याणशेट्टी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमानंतर डॉ. राजीमवाले यांनी राज्यमंत्री मिसाळ यांचा सत्कार केला. यावेळी भाजप शहर मंडल अध्यक्ष प्रदीप पाटील, मोहन डांगरे, अण्णा वाले, सृष्टी डांगरे, शिवशरण जोजन, नन्नू कोरबू, डॉ. गणेश थिटे, धनंजय वाळुंजकर, परमेश्वर माळी, विनोद मोरे आदी उपस्थित होते.

# वावडी स्पर्धेत मारुती तोरणे प्रथम

### रोहित, विराज व शुभम यांची बाजी तर स्नेहल पाटील ठरल्या हिरकणीच्या मानकरी

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. ३ ऑगस्ट -**

वावडी व हिरकणी महोत्सव संयोजन समितीच्या वतीने निमगाव येथे झालेल्या वावडी स्पर्धेत मोठ्या गटात मारुती तोरणे याने प्रथम तर रोहित मगर, विराज मगर व शुभम साठे यांनी अनुक्रमे द्वितीय तृतीय आणि चतुर्थ क्रमांक मिळविला. महिलांसाठी आयोजित करण्यात आलेल्या हिरकणी महोत्सवात स्नेहल गणेश पाटील टेंभुर्णी या हिरकणी महोत्सवाच्या प्रथम



क्रमांकाच्या मानकरी ठरल्या. बक्षिस विजेत्यांना सिनेअभिनेत्री, नृत्यांगना, हिंदवी पाटील व मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

यावेळी सोलापूर विद्यापीठाच्या सिनेट सदस्या पद्मजादेवी मोहिते पाटील, माजी सभापती राजलक्ष्मी माने पाटील, वृषाली माने पाटील उपस्थित होत्या. वावडी बनविणे व उडवणे हा खेळ मगराचे निमगाव या ठिकाणी श्रावण महिन्यात नागपंचमी निमित्त खेळला जातो अगदी ५ फुटापासून ते ३० फुटापर्यंत उंचीच्या वावड्या बनविल्या जातात व श्रावण महिन्यात नागपंचमीनिमित्त त्या आकाशात उंच उडविल्या जातात. ही शिवकालीन परंपरा आहे. सन २०२५ च्या वावडी स्पर्धेत लहान गटात प्रवीण शिंदे, शिवतेज मोरे उमरगा, सत्यजित मगर, सर्वज्ञ अष्टपुत्रे व अवधूत जाधव यांनी बाजी मारली. मध्यम गटात गौरव कदम, वेदांत कस्तुरे, महादेव गाडेकर, शुभम मगर, निहाल शेख, सुदर्शन पवार यांनी बक्षीसे पटकाविली. महिलांसाठी आयोजित हिरकणी महोत्सवात हॉट पॅनच्या विजेत्या पल्लवी मगर, प्रियंका थोरात, रूपाली जाधव, संध्या वसव व कल्पना मगर ठरल्या. हॅन्ड मिक्सर अनुजा मगर, अश्विनी जगताप, शारदा सरगर, वैष्णवी कुंभार यांना मिळाले. पैठणीच्या मानकरी स्वीटी पांढरे, सुप्रिया मेंगाने, माधुरी मगर ठरल्या तर मयुरी मगर व दिपाली कांबळे गॅस शेगडीच्या विजेत्या ठरल्या. सुरुवातीस सिने अभिनेत्री नृत्यांगना हिंदवी पाटील यांचा सन्मान शशांक जाधव व साक्षी जाधव यांच्या हस्ते करण्यात आला.

> शिवकालीन वावडीची एक आगळीवेगळी कला व परंपरा निमगावने महोत्सवाच्या माध्यमातून जतन केली आहे. याबद्दल मनस्वी आनंद तर आहेच परंतु याचबरोबर ग्रामीण भागातील गोरगरीब, शेतमजूर महिलांनाही स्पर्धेच्या माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध होत आहे याचा अभिमान वाटतो. महाराष्ट्र शासन देखील याची दखल घेईल व पुढील वावडी महोत्सवासाठी राज्याचे सांस्कृतिक मंत्री या कार्यक्रमास आवर्जून येतील व शासनाच्या माध्यमातून या कलेसाठी प्रोत्साहन दिले जाईल.
>
> **- राम सातपुते, माजी आमदार**